एम. ए. अर्थशास्त्र

सत्र - III (CBCS)

भारतातील कामगार संघटना व औद्योगिक संबंध

विषय कोड - 99461

© UNIVERSITY OF MUMBAI

प्रा. सुहास पेडणेकर
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

प्रा. रवींद्र द. कुलकर्णी,
प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

प्रा. प्रकाश महानवर
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

प्रकल्प समन्वयक : **प्रा. राजश्री पंडित**
सहाय्यक प्राध्यापक आणि सहाय्यक संचालक,
प्रभारी वाणिज्य विभाग प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०००९८.

अभ्यास समन्वयक व संपादक : **डॉ. गोपाल एकनाथ घुमटकर**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र),
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०००९८.

लेखक : **डॉ. काशिनाथ आर. चव्हाण**
उपप्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, लांजा,
जिल्हा - रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१६७०१.

: **हरिभाऊ समा खरात**
सहाय्यक प्राध्यापक,
चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त),
न्यु पनवेल, जि. रायगड - ४१०२०६.

: **अतुल कृष्णा घाडगे**
शेठ एन. के. टी. टी. टी कॉलेज ऑफ कॉमर्स आणि
शेठ जे. टी. टी. कला महाविद्यालय, ठाणे (पश्चिम) ४००६०१.

जुलै २०२२, प्रथम मुद्रण,

प्रकाशक
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

अक्षरजुळणी
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई

अनुक्रमणिका

क्रमांक	अध्याय	पृष्ठ क्रमांक
मॉड्युल १ : कामगार संघटनांचे अर्थशास्त्र		
घटक १	कामगार संघटनांचे अर्थशास्त्र - १	१
घटक २	कामगार संघटनांचे अर्थशास्त्र - २	१३
मॉड्युल २ : औद्योगिक संबंध		
घटक ३	औद्योगिक संबंध - १	२५
घटक ४	औद्योगिक संबंध - २	३३
मॉड्युल ३ : भारतातील औद्योगिक संबंध		
घटक ५	भारतातील औद्योगिक संबंध - १	५०
घटक ६	भारतातील औद्योगिक संबंध - २	६४
मॉड्युल ४ : भारतातील औद्योगिक संबंधांमधील राज्यांची भूमिका		
घटक ७	भारतातील औद्योगिक संबंधांमध्ये राज्याची भूमिका - १	७४
घटक ८	भारतातील औद्योगिक संबंधांमध्ये राज्याची भूमिका - २	८७

*****

Trade Unions and Industrial Relations in India

Number of Credits: 6
Pattern of Evaluation: Standard

Preamble: This course attempts to provide a basic conceptual understanding of the economics of trade unions and industrial relations in India. The syllabus also includes the empirical relevance of theories with suitable examples from a practical industrial relations viewpoint. Such an attempt will be strengthened to enable familiarity with relevant data along with their limitations.

Module 1: Economics of Trade Unions: (9 Hours)
Meaning, Concept, Evolution and Role of Trade Unions.Approaches to the Origin of Trade Unions. Bargaining Theory of Wages, Impact of unions on productivity and wages, Employment Security and Efficiency, Unorganised sector

Module 2: Industrial Relations: (12 Hours)
Definition and scope of industrial relations, Approaches to Industrial Relations: Macro Approaches- System Approach and Class Conflict Approach, Micro Appraches-Taylorism,Fordism and Post-Fordism, Neo-Fordism, Pluralism, Human Relations School and OrganisationalBehaviour Approach.

Module 3: Industrial Relations in India: (15 Hours)
Trade Unions and Workers: Industrial Sociology of workers in India, History, growth and structure of trade unions, Independent and white collar unions in India. Trade Unions and Contract Workers. Employer's Organisations: Role of managerial class in industrial relations. Industrial conflict: Forms of conflict, strikes, lockouts, absenteeism, employee turnover, causes and consequences of and trends in industrial disputes.

Module 4: Role of the State in Industrial Relations in India: (12 Hours)
Labour Policy in India: Pre and Post-Reform scenario, Impact of Globalisation- Tripartism, Labour Legislation affecting industrial relations: Statutory and Non-Statutory measures to settle industrial disputes. Workers Participation in Management. Voluntary Retirement Schemes, Social Security Measures, Unemployment Insurance. Occupational Safety and Health Management Systems.India and the ILO.

References:

Essential Readings

1. Amin, Ash (Ed.), Post-Fordism-A Reader, Blackwell, Oxford, 1994 (Module 2)
2. Government of India, Ministry of Human Resource Development, Report of Second National Commission on Labour, 2002 (Module 3, 4)
3. Hicks J.R., The Theory of Wages, Clarendon Press, Oxford, 1932 (Module1)
4. Monappa, Arun, Industrial Relations, Tata McGraw Hill, New Delhi, 2005. (Module 4)
5. Pencavel, John, Labour Markets under Trade Unionism: Employment, Wages and Hours, Basil Blackwell, Cambridge, Massachusetts, 1991 (Module 1)
6. Ramaswamy, E.A. and Uma Ramaswamy, Industry and Labour, Oxford University Press, Bombay 1981 (Module 3)
7. Rees, Albert, The Economics of Trade Unions, University of Chicago Press, Chicago, 1973 (3rd Edition) (Module 1)
8. Roy. J. Adams (eds.), Comparative Industrial Relations, Harper Collins Academic, London, 1991. (Module 2, 4)

मॉडयुल १ : कामगार संघटनांचे अर्थशास्त्र

१

कामगार संघटनांचे अर्थशास्त्र - १

घटक संरचना

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ कामगार संघटनेचा अर्थ

१.३ कामगार संघटनेची संकल्पना

१.४ कामगार संघटनांची उत्क्रांती

१.५ कामगार संघटनांची भूमिका

१.६ कामगार संघटनांच्या उगमाचे दृष्टीकोन

१.७ सारांश

१.८ प्रश्न

१.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- कामगार संघटनांचा अर्थ आणि संकल्पना जाणून घेणे.
- कामगार संघटनांच्या उत्क्रांतीचा अभ्यास करणे.
- कामगार संघटनांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
- कामगार संघटनांच्या उत्पत्तीच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

१.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

कामगारांना कायद्याच्या चौकटीत राहून विविध सुविधा पुरविणे, हे उद्योजकांचे कर्तव्य असते. अनेक उद्योजक समस्यांना त्यांच्या हक्काच्या सोई सुविधा पुरवून कामाचे ठिकाण आनंददायी बनविण्याचा प्रयत्न करतात. परंतु काही उद्योग आणि उद्योगसंस्था अधिक नफा कमविण्याच्या उद्देशाने याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात. अशावेळी श्रमिक एकत्र येऊन संघटना स्थापन करतात. अशा प्रकारच्या संघटना स्थापन करण्याचा हक्क त्यांना कायद्यान्वये प्राप्त झाला आहे.

श्रमिक किंवा कर्मचारी आपल्या कामाच्या ठिकाणचे वातावरण व एकंदर स्थिती योग्य असावी, अनुकूल सुविधा प्राप्त व्हाव्यात, योग्य वेतन मिळावे या व अशा इतर अनेक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी एकत्रित येऊन संघटना स्थापन करतात. उद्योजकांच्या बरोबर करार व अटी मान्य करण्यासाठी वाटाघाटीद्वारे प्रश्न सोडवले जातात. कामगारांना असुरक्षित अशा किंवा अयोग्य अशा वातावरणापासून संरक्षण देण्याचे कार्य या संघटना पार

पाडतात. एखाद्या उद्योगांमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व संघटना करते. उद्योजक आणि कर्मचाऱ्यांमध्ये होणारे सर्व संवाद आणि वाटाघाटी सामान्यपणे संघटनांच्या माध्यमातून होतात. कर्मचाऱ्यांत शिस्त राखणे याचे दायित्व आणि जबाबदारी संघटनांना घ्यावी लागते. यामध्ये उद्योजक आणि कर्मचारी यांच्यात सुसंबद्ध आहे का ? ते पाहणे आणि तो राखला जाईल याकडे लक्ष देणे हा प्रमुख उद्देश असतो. कर्मचाऱ्यांकडून बेशिस्तीचे वर्तन होऊन कामगार - उद्योजकांचे संबंध बिघडल्यास तसेच शांतता व सुव्यवस्थेला बाधा आल्यास अशा वेळी संघटना संबंधित कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करू शकतात.

व्यापार व श्रम संघटनांचे कायदे विविध देशात भिन्नभिन्न स्वरूपात नियमित केले गेले आहेत. प्रत्येक देशातील कायद्याच्या आधारे संघटनेची स्थापना करीत असताना त्या देशातील संस्था स्थापनेची प्रक्रिया व पद्धती यांचा अवलंब करून तेथील कायद्याच्या आधारे संघटनेची नोंद करावी लागते. देशातील कायद्याच्या आधारे स्थापन केल्या जाणाऱ्या संबंधित देशातील कामगार संघटनांना कायद्याने दिलेले लाभ प्राप्त होतात. हे कायद्याच्या अनुषंगाने मिळालेले लाभ व हक्क याबरोबरच संघटनांना कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काही कर्तव्येदेखील पार पाडावी लागतात. सामूहिक सौदा शक्ती हे कामगार संघटनांचे मुख्य ध्येय असते. भारतात व्यापारामध्ये अथवा व्यवसायामध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तींना कामगार संघटना स्थापन करता येते.

सद्यस्थितीत विविध संघटित क्षेत्रांमध्ये कनिष्ठ वर्गातील श्रमिकांनी आपली सौदा शक्ती वाढविण्यासाठी संघटनांची स्थापना केली आहे. सार्वजनिक क्षेत्रांमध्ये ही प्रवृत्ती अधिक दिसून येते. १९७७ मध्ये नागपूर येथे पहिली व्यापार संघटना सुरू झाली तर पहिला कारखानदारी कायदा १८८१ मध्ये पारित करण्यात आला. १९१९ मध्ये मद्रास येथे सुरू झालेली श्रमिक संघटना ही भारतातील पहिली संघटना होय.

१.२ कामगार संघटनांचा अर्थ व व्याख्या (MEANING AND DEFINITION OF TRADE UNIONS)

१.२.१ अर्थ (Meaning):

कामगार संघटना या मुख्यत्वे कर्मचाऱ्यांच्या संस्था आहेत. कर्मचाऱ्यांची उद्योजकांकडून पिळवणूक होऊ नये याकरिता त्यांना संरक्षण देणे व त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे अशा उद्देशाने संघटनांची स्थापना केली जाते. सामूहिक सौदा शक्तीच्या आधारे अशा संघटनाना विशिष्ट व्यापार किंवा उद्योगांमध्ये कामगारांना वेतनासंबंधीचे लाभ, कामाची परिस्थिती, सामाजिक व राजकीय स्थितीत सुधारणा इत्यादी लाभ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतात.

१.२.२ व्याख्या (Definitions):

संघटनांच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. सेल योडर यांच्या मते, "कामगार संघटना ही कर्मचाऱ्यांची निरंतर, दीर्घकालीन संस्था असून सभासदांच्या कामकाजासंबंधी हिताचे रक्षण करण्याच्या विशिष्ट हेतूने स्थापन करून त्या चालवल्या जातात."

२. ब्रिटिश ट्रेड युनियन कायदा १९५३ नुसार, "ट्रेड युनियन ही कामगारांची संघटना असून कामगार आणि मालक यांच्यामधील संबंधांचे नियमन करण्याच्या उद्देशाने कोणताही व्यापार अथवा व्यवसाय चालवताना त्यावर प्रतिबंधात्मक इलाज आणि सभासदांना देखील लाभ प्राप्त करून देणे याकरिता स्थापन करण्यात आल्या आहेत."

३. सिडनी व ब्रिअट्रीस वेब यांच्या मते, "मजूरी मिळविणाऱ्या व्यक्तींनी आपली काम करण्याची परिस्थिती टिकवून ठेवण्याच्या किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली एक नियमित स्वरुपाची संघटना म्हणजे कामगार संघटना होय."

(Sydney and Beatrice webb - Trade union is a continuous association of wages errors for the purpose maintaining and improving the condition of their working lives.)

४. व्ही. व्ही. गिरी यांच्या मते, "सामूहिक कृतीद्वारे आपले हितसंबंध प्रस्थापित करण्यासाठी व ते अबाधित ठेवण्यासाठी कामगारांनी स्थापन केलेली संघटना म्हणजे कामगार संघटना होय."

(V. V. Giri. - Trade union are voluntary organisations of workers formed to promote and protect their interests by collective actions)

५. ए. सी. जोन्स. यांच्या मते, "कामगार संघटना ही मालकांची, सहभागीदारांची किंवा स्वतंत्रपणे काम करणाऱ्या कामगारांची संघटना नसून ती मुख्यत्वे वेतन मिळविणाऱ्या कामगारांची संघटना आहे."

(A. C. Jones. - A trade union is essentially and organisation of employees, not of the employers nor the independence workers.)

६. एस. डी. पुणेकर. यांच्या मते, "कामगार संघटना ही उद्योगातील व्यक्तींची एक नियमित संघटना असते. मग ती उद्योजक असोत अथवा स्वतंत्रपणे काम करणारे कामगार असोत ते ज्या व्यापार, उद्योगांचे प्रतिनिधित्व करतात त्यामधील सदस्यांच्या हितसंबंधांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने अशा संघटनेची स्थापना केली जाते."

७. लेस्टर यांच्या मते, "कामगार संघटना ही कर्मचाऱ्यांची संघटना आहे. अशा या संघटनेचा संघटनेतील सदस्यांच्या रोजगाराची स्थिती कायम ठेवणे अथवा त्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे हा हेतू असतो."

(According to Lester, A trade union is an association of employees designed primary to maintain or improve the condition of employment of its members.)

वरील व्याख्याच्या आधारे कामगार संघटनांच्याबाबत पुढील वैशिष्टये आढळून येतात.

१. कामगार संघटना या ऐच्छिक स्वरूपाच्या संघटना असून अशा संघटनांची स्थापना सामुहिक कृतीच्या आधारे त्यांच्या हितांची जोपासना करण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून केली जाते.

२. यामध्ये कर्मचारी आणि उद्योजक यांचे संयोजन असते.

३. हे संयोजन कायमचे किंवा तात्पुरते असू शकते.

४. कामगार संघटनांची शिखर संस्था असू शकते ज्यामध्ये दोन किंवा अधिक संघटनांचा समावेश असेल.

५. कामगार संघटनांच्या अंतर्गत कर्मचाऱ्यांमध्ये व मालकांमध्ये, कर्मचारी व कर्मचारी यांच्यामध्ये तसेच उद्योजक व उद्योजक यांच्यामध्ये संबंधाचे नियमन केले जाते.

१.३ कामगार संघटना संकल्पना (CONCEPT OF TRADE UNIONS)

कामगार संघटना या कर्मचाऱ्यांच्या संघटना आहेत, ज्या कर्मचाऱ्यांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी स्थापन झाल्या आहेत. या संघटना राजकीय प्रतिष्ठा किंवा स्थान असलेल्या बहुउद्देशीय संस्था आहेत. औद्योगिक लोकशाहीच्या त्या प्राथमिक पातळीवरील संस्था असून कर्मचाऱ्यावर भांडवलदारांकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या संस्था आहेत. सामूहिक सौदा शक्तीच्या आधारे कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण या संघटना करतात. खरे तर संघटन याचा अर्थ "ते काय करते" असा आहे. तर संघटनावाद याचा अर्थ "ते काय आहे" म्हणजे वस्तुस्थिती काय आहे हे निर्देशित होते. समूह मानसशास्त्रामुळे कामगार संघटना उदयास येतात असे सर्वसाधारण विवेचन आढळते. कामगारांना भेडसवणाऱ्या समस्यांशी संबंधित समजुतीतून समूहाच्या आधारे कामगारांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा एक सामान्य कार्यक्रम असे संबोधन कामगार संघटनांबद्दल केले जाते. कामगार संघटना या अशा कार्यक्रमांच्या आयोजनाचे केंद्र आहेत. कामगारांना त्यांच्या शक्ती एकवटण्यासाठी त्यांना संधी प्राप्त करून देण्याचे कार्य या संघटना करतात. समाज संघटनेत बदल घडवून आणण्यासाठी कामगार वर्गाच्या कार्यात्मक संघटनेचे ते केंद्रबिंदू आहेत. कामगारांच्या ऐच्छिक प्रयत्नातून कामगार संघटना विकसित होतात. त्यांचा हेतू स्पर्धेला आळा घालणे, सौदेबाजीची स्थिती बळकट करणे आणि आपल्या कामाची स्थिती सुधारणे हा असतो.

कामगार संघटना व्यवस्थापकीय हुकुमशाहीवर मात करण्यासाठी, वैयक्तिक पातळीवर कामगारांचे सक्षमीकरण करण्यासाठी तसेच कामाच्या स्थितीचे नियमन आणि सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून देणारी संस्था म्हणून देखील ओळखली जाऊ शकते. संघटना कामगारांच्या हक्कासाठी संघर्ष करतात. व्यवस्थापकाकडून कामगारांचे शोषण

होऊ नये याकरिता कामगार संघटना महत्त्वाची भूमिका बजावतात. वर्षानुवर्षे चालत आलेले मालक आणि नोकर असे व्यवस्थापन आणि कामगार यांच्यामधील संबंध मालक आणि कर्मचारी असे बदलले आहेत. “कामगारांना कामावर घ्या आणि त्यांचे शोषण करा” (Hire and fire) अशा प्रकारचे व्यवस्थापनाचे धोरण कामगार संघटनांच्या हस्तक्षेपामुळे सुधारले गेले.

संघटनेच्या स्थापनेशिवाय कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्क वैयक्तिक पातळीवरच मिळू शकतील. कारण त्यांची सौदाशक्ती कमकुवत असते आणि ते खालच्या पातळीवरच राहतील. परंतु संघटनेच्या माध्यमातून ते एकत्रितपणे आपल्या खऱ्या मागण्यांसाठी दबाव आणू शकतात आणि समाजात त्यांचे स्थान सुधारू शकतात.

१.४ कामगार संघटनांची उत्क्रांती (ENVOLUTION OF TRADE UNIONS)

अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे आर्थिक क्षेत्रात खूप बदल घडून आले. या बदलामुळे जुनी समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था संपुष्टात आली. त्यातून ज्या समस्या निर्माण झाल्या, त्यात कामगार वर्गाची समस्या ही महत्त्वाची समस्या होती. औद्योगिक क्रांतीमुळे गृह उद्योग बंद पडले व त्याची जागा यंत्र उत्पादन पद्धतीने घेतली. यामुळे मालक व कामगार यांचे संबंध सलोख्याचे राहिले नाहीत. कारखानदारी पद्धतीत प्रचंड प्रमाणात उत्पादन झाल्याने त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबंध राहिले नाहीत. मालक वर्गाला मोठया प्रमाणात फायदा होऊ लागला. मात्र त्याचवेळी मालक वर्गाने कामगारांच्या हालअपेष्टांची दखल घेतली नाही, ते कामगारांची पिळवणूक करू लागले. त्यामुळे मालक व कामगार यांच्यामधील संबंध दुरावत गेले. कामगारांच्या परिस्थितीकडे मालकांनी सहानुभूतीने पाहिले नाही, त्यामुळे या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी कामगार वर्गाला स्वतः प्रयत्न करावे लागले. सर्व कामगार आपल्या न्याय्य हक्कांच्या मागण्यासाठी एकत्र आले. आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी संघटना स्थापन करण्यास सुरुवात केली.

औद्योगिकदृष्टया प्रगत असलेल्या सर्वच देशात संघटना ही प्रभावी शक्ती म्हणून उदयास आली. विकसनशील देशात सुद्धा जसजशी प्रगती होत गेली तसतशी कामगार संघटनांमध्ये वाढ होत गेली. पूर्वी सरकार आणि भांडवलदार यांचा कामगार संघटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन अनुकूल नव्हता. कामगार संघटना आपल्या सदस्यांना आर्थिक मागण्यांसाठी भांडणे / संप करायला लावत आणि त्यामुळे उद्योगधंद्यात विस्कळीतपणा येतो, असे भांडवलदारांना वाटत असे. सरकारची भूमिका सुद्धा तटस्थ होती. परंतु कालांतराने कामगार संघटनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत गेला. कामगार संघटना आपल्या न्याय्य मागण्यांसाठी व हक्कांसाठी झगडत असतात. तसेच देशाच्या औद्योगिक प्रगतीच्या आधारे देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावतात, हे सिद्ध झाले आहे. कामगार संघटनांच्या उत्क्रांतीचे टप्पे अभ्यासणे या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

ब्रिटिशांनी १६०० च्या दशकात भारतीय उपखंडात वसाहत सुरू केली आणि ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीप्रमाणेच भारतात कारखाने आणि गिरण्या उभारण्यास सुरुवात केली.

ब्रिटीशांना भारतात औद्योगिकीकरण सुरू करणे योग्य वाटण्याचे मुख्य कारण म्हणजे भारतात उद्योग उभारण्यासाठी नैसर्गिक संसाधने आणि जमीन यासह स्वस्त आणि गरीब कामगारांची मुबलकता होती. १८५१ मध्ये मुंबईत सूतगिरणीची स्थापना झाली आणि बंगालमध्ये १८५५ मध्ये पहिली ज्यूट मिल सुरू झाली. ब्रिटनप्रमाणेच भारतातही कामगारांची परिस्थिती वाईट होती. कामाचे तास, मजुरी आणि हद्दपार करण्याच्या धोरणांसारख्या शोषणात्मक आणि दयनीय कामाच्या अटींमुळे मजूरांचे स्थिती अधिकच दयनीय झाली. यामुळे सर्व कामगारांनी एकत्र येऊन या सर्वाचा तीव्रपणे निषेध केला. १८७७ मध्ये अचानक मजुरी कमी केल्यामुळे नागपूर येथील एम्प्रेस मिलच्या मजुरांनी संप पुकारला. अशाप्रकारचा संघटनावाद हा त्या काळात एक नवीन घटना असल्याने नवीन कामगार संघटनांना कायदेशीर आणि नियमन करण्यासाठी कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता. कामगार वर्गामध्ये वाढता असंतोष आणि अशांतता तसेच मालक वर्गाशी होणारी सतत भांडणे, अशा परिस्थितीची चौकशी आणि निराकरण करण्यासाठी काही पावले उचलली गेली.

१. कारखाना आयोग (फॅक्टरीज कमिशन)१८७५:

कारखाना आयोग, हा पहिला आयोग १८७५ मध्ये स्थापन केला गेला. या आयोगाने कारखान्यांच्या परिस्थितीची योग्य चौकशी केली आणि हा आयोग याबाबतीत काही कायदेशीर मर्यादा आवश्यक असल्याच्या निष्कर्षापर्यंत पोहोचला. पुढे कारखाना कायदा १८८१ पारित करण्यात आला.

२. कारखाना आयोग, १८८५:

कारखानदार आणि कामगारांच्या प्रश्नासंदर्भात हा दुसरा आयोग १८८५ मध्ये स्थापन करण्यात आला आणि त्या चौकशीच्या आधारे १८९१ मध्ये दुसरा कारखाना कायदा मंजूर करण्यात आला.

३. रॉयल कमिशन ऑन लेबर, १८९२:

या आयोगाने कारखान्यांमध्ये कामाच्या तासांवर मर्यादा लादल्या. कारखाना आयोग आणि कारखाना कायद्यांमुळे भारतातील कामगार वर्गाच्या कामाच्या परिस्थितीत कोणतीही सुधारणा झाली नाही. १८८५ मध्ये भारतातील सर्व कामगारांनी त्यांच्या उद्योजकांसोबत कामाच्या बाबतीत किमान मूलभूत परिस्थिती प्रदान करण्यासंबधी मसुद्यावर (मेमोरँडमवर) स्वाक्षरी केली. मात्र, त्यानंतरदेखील परिस्थितीत फारशी सुधारणा झाली नाही. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना आणि महात्मा गांधींनी सुरू केलेल्या अहिंसा चळवळीच्या पार्श्वभूमीवर मजुरांचा प्रारंभिक दृष्टिकोन मानवतावादी होता.

४. पहिल्या महायुद्धानंतरचा काळ:

जेव्हा पहिले महायुद्ध सुरू झाले तेव्हा युद्धाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सर्व संसाधने अचानक त्याकडे वळवली गेली. या परिस्थितीत मालक पूर्णपणे मजुरांवर अवलंबून होते. तेव्हा मजुरांच्या लक्षात आले की त्यांना त्यांच्या मालकांची जितकी गरज आहे तितकीच मालकांना त्यांची गरज आहे. यामुळे त्यांना एकप्रकारे सौदाशक्ती (बार्गेनिंग) प्राप्त झाली.

भारतात कामगार संघटना या काळात सूरू झाल्या. परंतू समाजवादी सुधारकांच्या नेतृत्वामुळे ही प्रक्रिया मंदावली. तरीदेखील अनेक कामगार संघटना तयार होऊ लागल्या होत्या. १९१८ मध्ये मद्रास लेबर युनियन या पहिल्या मोठया कामगार संघटनेची स्थापना श्री. बी. पी. वाडिया यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यानंतर १९२० मध्ये ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना झाली. कामगार संघटनांच्या स्थापनेनंतर, कामगारांनी त्यांच्या कामाचे तास कमी करणे, किमान मूलभूत वेतन, यासारख्या मागण्यांसाठी संप आणि आंदोलने आयोजित करण्यास सुरुवात केली.

५. बकिंगहॅम मिल प्रकरण :

कामगार संघटनांची निर्मिती, कामगारांचा संप आणि आंदोलनांचे मालक वर्गाने स्वागत केले नाही. नव्याने स्थापन झालेल्या कामगार संघटनांना व त्यांच्या कृती कार्यक्रमांना आळा घालण्यासाठी आणि निर्मितीस प्रतिबंध करण्यासाठी उद्योजकांनी कायदेशीर मार्ग शोधला. श्री बी. पी. वाडिया यांच्या विरुद्ध दाखल करण्यात आलेला सर्वात महत्त्वाचा खटला होता. वाडिया हे मद्रास मजदूर संघाचे अध्यक्ष होते. त्यांनी कामगारांसोबत संपासाठी व्युहरचना तयार करून कामगारांचा संप घडवून आणला व याद्वारे व्यापारावर अंकुश ठेवला गेला. उद्योजकांनी कामगार संघटनांनी केलेला निषेध आणि कृती कार्यक्रम रद्द करण्यासाठी आदेश काढण्याची विनंती केली. या संदर्भात उद्योजकांनी पुढील मुद्दे मांडले.

१. संप बेकायदेशीर आहे. कारण तो भारतीय करार कायद्याच्या कलम २७ नुसार व्यापारावर प्रतिबंध आणणारा आहे.

२. भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १२०A अंतर्गत सदर संपात गुन्हेगारी कट रचलेला दिसून येतो.

३. संपाने नागरी कायद्यांतर्गत नागरी षडयंत्र देखील तयार केले आहे.

या संदर्भात मद्रास उच्च न्यायालयाने तीन कारणास्तव संपावर स्थगिती देण्याचे आदेश दिले.

१. उद्योजकांच्या बाजूने कारवाईचे वैध कारण होते.

२. कामगारांकडून कायद्याचे उल्लंघन झाले.

३. कामगार संघटनेच्या कृतींमुळे उद्योजकांचे नुकसान झाले.

यावरून असे दिसते की, या काळात कामगार संघटनांना कायदेशीर शक्ती किंवा पाठिंबा देणारे कोणतेही कायदे नव्हते. मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाने भारतामध्ये कामगार संघटनावादाला (ट्रेड युनियनवादाला) कायदेशीर मान्यता देणारा कोणताही कायदा नसल्याची सत्यता पुढे आली. कामगार समर्थक कायदे बनवण्याच्या वाढत्या गरजेमुळे इंडियन ट्रेड युनियन कायदा १९२६ मध्ये पास झाला. त्यामधील "इंडिया" हा शब्द नंतर वगळण्यात आला आणि ‘ट्रेड युनियन कायदा, १९२६’ नावाचा कायदा अस्तित्वात आला. या कायद्याच्या प्रस्तावनेत "ट्रेड युनियन्सच्या नोंदणीसाठी आणि काही विशिष्ट बाबतीत नोंदणीकृत ट्रेड युनियन्सशी संबंधित कायद्याची स्पष्टता देण्यात आली.” पहिल्या

महायुद्धानंतर कामगारांचा राहणीमानाचा खर्च वाढला आणि वसाहतवादी राजवटीविरुद्ध आंदोलने वाढत गेली. ट्रेड युनियन कायदा पास झाल्यानंतर "मिलिटरी ट्रेड युनियनिझम" चा उदय झाला. परिणामी या विरोधात ट्रेड युनियन्सने अनेक संप आणि निषेध नोंदवले. पुढे भारत आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा संस्थापक सदस्य म्हणून सामील झाला.

६. १९४७ नंतरचा कालावधी:

१९२६ च्या कायद्यातील एक महत्त्वाची कमतरता म्हणजे ट्रेड युनियन्सच्या ऐच्छिक नोंदणीची तरतूद त्यात असली तरी त्यात उद्योजकांद्वारे ट्रेड युनियन्सना अनिवार्य मान्यता देण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे उद्योजकांनी ट्रेड युनियन्सना मान्यता दिली नाही. यामुळे कामगार संघटनांचा विकास पुन्हा ठप्प झाला. उदाहरणार्थ, जेव्हा जेव्हा ट्रेड युनियनचे सदस्य किंवा त्यांचे वकील उद्योजकांशी वाटाघाटी करण्यासाठी गेले, तेव्हा उद्योजक फक्त मान्यता नसल्याचे कारण देऊन त्यांच्याशी वाटाघाटी करण्यास तयार होत नव्हते. तरीही या संस्था नोंदणीकृत होत्या. १९४७ मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली. ज्याद्वारे कामगार संघटनांना मान्यता मिळण्याची तरतूद करण्यात आली. मात्र, हा सुधारित कायदा अद्याप लागू झालेला नाही.

७. १९५० ते १९७० पर्यंत भारतातील ट्रेड युनियनवाद:

भारतीय स्वातंत्र्य भारतातील कामगार संघटनांसाठी मोठया प्रमाणात फायदेशीर ठरले. कारण भारतीय नेतृत्वाने अभिव्यक्ती स्वातंत्र्यासह सर्वांसाठी समानता, न्याय आणि स्वातंत्र्य ही तत्त्वे स्वीकारली. भारतीय राज्यघटनेनेही संघटनेच्या स्वातंत्र्याला मूलभूत अधिकार म्हणून मान्यता दिली आहे. पंचवार्षिक योजनांचा मार्ग देखील भारताने स्वीकारला. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांचा भर प्रामुख्याने उद्योग आणि शेतीवर होता. ज्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील मोठया उद्योगांची स्थापना झाली. उद्योगांच्या उभारणीबरोबर कामगारांची गरज वाढली आणि कामगार संघटना सक्रिय झाल्या. मात्र, कामगार संघटनेतील संघटनाअंतर्गत तणाव, राजकीय हस्तक्षेप आणि योग्य नेतृत्वाच्या अभावामुळे संघटनेत संघर्ष निर्माण झाला. राज्याने पितृसत्ताक दृष्टीकोन स्वीकारल्यामुळे कामगार संघटनांवर हुकुमशाही लादल्याचे चित्र निर्माण झाले. त्यामुळे १९५० नंतरच्या काळात संप आणि आंदोलने कमी झाली.

८. १९७० ते १९९० पर्यंत भारतातील ट्रेड युनियनवाद:

१९६० च्या मध्यापासून, भारताची आर्थिक परिस्थिती बिघडण्यास सुरुवात झाली होती. मुख्यत: १९५० च्या दशकात भारताने पाहिलेल्या दुष्काळ आणि युद्धांमुळे महागाईचा दर आणि अन्नधान्याच्या किमती वाढल्या. अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदलांमुळे उद्योगांवरही परिणाम झाला. या काळात कामगार संघटनांनी अधिक निदर्शने, संप आणि टाळेबंदी केली. १९७५ ते १९७७ पर्यंत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कारकिर्दीत लागू करण्यात आलेल्या राष्ट्रव्यापी आणीबाणीने संघटना स्थापन करण्याचा अधिकार आणि संप करण्याचा अधिकार यासह सर्व मूलभूत अधिकार निलंबित केले गेले. आणीबाणीनंतर सरकारने औद्योगिक संबंध विधेयक अंमलात आणण्याचा प्रयत्न केला होता ज्याचा उद्देश अत्यावश्यक सेवा आणि उद्योगामध्ये संप आणि टाळेबंदीवर बंदी घालण्यात आली. तथापि,

या विधेयकाला विविध संघटनांकडून, विशेषतः कामगार संघटनांकडून तीव्र विरोध झाला. परिणामी सदर विधेयक मंजूर झाले नाही. कामगार संघटनांनी यावेळी आपला दबदबा निर्माण केला होता. त्यांनी त्यांच्या सौदेबाजीच्या सामर्थ्याचा वापर केला होता. तसेच या काळात कामगार संघटना अधिक संघटीत झाल्या. तसेच संघटनांना वाटाघाटी आणि संपाद्वारे त्यांच्या गरजा पूर्ण करण्यास बळ मिळाले.

९. भारतातील ट्रेड युनियनवाद १९९० ते १९९९:

१९९१ मध्ये सरकारने "नवीन आर्थिक धोरण" (NEP) आणून अर्थव्यवस्था खुली करण्याचा निर्णय घेतला. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या दबावामुळे भारतातील ट्रेड युनियनमध्ये फाटाफूट झाली. कारण सरकारचा कामगार-अनुकूल दृष्टिकोन बदलून तो अधिक गुंतवणूकदार-अनुकूल बनला. जागतिकीकरणामुळे कामगारांमध्ये मोठया प्रमाणात कपात झाली. या काळात कामगार संघटना कामगारांच्या नोकऱ्या वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत होत्या. १९९१ मध्ये उदारीकरणाच्या आगमनानंतर औद्योगिक संबंधांचे धोरण बदलू लागले. हे धोरण मालकांकडे झुकले होते. उद्योजकांनी कामगार कमी करण्याचा पर्याय निवडला, स्वेच्छानिवृत्ती योजनांची धोरणे आणली. कामाच्या ठिकाणी लवचिकताही वाढली. संरक्षणवादाचे जुने धोरण भारतीय उद्योगांना स्पर्धात्मक राहण्यासाठी अडचणीचे ठरले. कारण लवचिकतेच्या अभावामुळे उत्पादकांना गंभीर धोका निर्माण झाला. तसेच त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करावी लागली. अशा प्रकारे जागतिकीकरणाने भारतातील औद्योगिक संबंध धोरणात मोठे बदल घडवून आणले. जागतिकीकरणानंतर ट्रेड युनियनवादाची मुख्य वैशिष्टये पुढीलप्रमाणे दिसून आली. ती म्हणजे सदस्यसंख्येचा लहान आकार, पुरेशा वित्ताचा अभाव, कल्याणकारी योजनांची पूर्तता न होणे, राजकीय पक्षांचे नियंत्रण आणि कामगार संघटनांच्या कार्यात इतर बाह्य हस्तक्षेप इत्यादी होय.

१०. २१ व्या शतकातील ट्रेड युनियनवाद:

नवीन आर्थिक धोरणामुळे कामगार संघटनांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला. परंतु कामगार संघटनांची संख्या, उत्तम संघटना आणि कार्यप्रणाली ही मजबूत होती. लेबर ब्युरोच्या आकडेवारीनुसार, भारतात सुमारे ११,५५६ नोंदणीकृत कामगार संघटना आहेत ज्यात प्रत्येक संघटनेत किमान १२८३ सदस्य आहेत. २००१ मध्ये कामगार संघटना कायद्यात सुधारणा करण्यात आली. कायद्यातील प्रमुख तरतुदी आणि दुरुस्त्या खालीलप्रमाणे आहेत.

i) कलम ४ मध्ये केलेली सुधारणा:

२००१ च्या दुरुस्तीनंतर जोडलेल्या कलम ४ मधील तरतुदीनुसार, संघटना नोंदणीसाठी अर्ज करताना सबंधित व्यक्ती कामगार संघटनेचा सदस्य असणे आवश्यक मानले गेले. तसेच किमान संख्या निर्धारित करण्यात आली. जोपर्यंत संघटनेच्या एकूण कामगारांपैकी किमान दहा टक्के किंवा शंभर टक्के यापैकी जे कमी असेल, परंतु ते कामगार सबंधित आस्थापनेमध्ये किंवा उद्योगाशी जोडले गेलेले असतील. अन्यथा कामगारांच्या कोणत्याही ट्रेड युनियनची नोंदणी केली जाणार नाही.

ii) नोंदणीसाठी अर्ज करण्याची तारीख:

ट्रेड युनियनची नोंदणी करण्यासाठी अर्ज केल्याच्या तारखेला संघटनेचे किमान ७ सदस्य असावेत. ते सदस्य सदर आस्थापनेमध्ये किंवा उद्योगामध्ये कार्यरत असावेत.

iii) कलम ९A समाविष्ट करणे:

कामगार कायद्यामध्ये कलम ९A समाविष्ट करून त्यात सदस्यत्वाची किमान संख्या ठरविण्यात आली. नवीन कलम ९A नुसार ठरविण्यात आलेल्या किमान संख्येपेक्षा कामगारांची नोंदणी कमी नसावी.

१.५ कामगार संघटनांची भूमिका (ROLE OF TRADE UNIONS)

कामगार संघटनांची नवीन भूमिका कामगारांचे हित जोपासन्याबरोबरच संघटनेचेही हित जपते. तथापि संघटनांनी अनेकविध विकासात्मक कामे हाती घेण्याची गरज आहे. तसेच त्यांना सकारात्मक कार्यसंस्कृती विकसित करावी लागेल, परस्परविरोधी समस्यांचे निराकरण करण्यासाठी जबरदस्तीच्या उपायांऐवजी सामूहिक सौदेबाजीने प्रश्न सोडवावे लागतील. संघटनांनी बळजबरीने सौदेबाजी करण्याऐवजी सल्लागार, मार्गदर्शक आणि प्रेरक अशी भूमिका पार पाडावी. संघटनांनी उदारीकरण आणि जागतिकीकरणाद्वारे प्रदान केलेल्या नवीन संधींचा शोध घेण्यासाठी सहभागी व्यवस्थापन आणि भागीदार म्हणून कार्य करणे आवश्यक आहे.

आज संघटना वेगळ्या वाटेवर आहेत. त्या नवीन मार्ग जलदगतीने स्वीकारू इच्छितात. त्यांना बेरोजगार, कंत्राटी कामगारांच्या संदर्भात त्यांच्या सामाजिक जबाबदाऱ्या निर्धारित कराव्या लागतात. येत्या काळात जागतिक समाजव्यवस्थेसाठी, योग्य नवीन ट्रेड युनियनवादासाठी नवीन नेतृत्व विकसित करण्याचे मार्ग शोधणे गरजेचे आहे.

कामगार संघटनांनी कामगारांना संस्थेची उद्दिष्टे, ध्येय आणि योजना समजावून सांगून माहिती देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. कामगारांना करिअरच्या संधी, आर्थिक गुंतवणूक, विविध उपक्रम, मुलांचे शिक्षण इत्यादींबाबत समुपदेशन आणि व्यावसायिक मार्गदर्शन केले पाहिजे. कामगार संघटनांनी कामगारांना गैरहजर राहणे, व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा इत्यादी सामाजिक समस्यांबाबत समुपदेशन करावे. कामगार संघटनांच्या भूमिकेचा निषेध न करता संघटना ही विकास संस्था म्हणून ओळखले गेले पाहिजे. कामगार संघटनांच्या नेतृत्वानी कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी मानव संसाधन व्यवस्थापन तत्त्वज्ञान तयार करावे.

१.६ कामगार संघटनांच्या उगमाचे दृष्टीकोन (APPROACHES TO THE ORIGIN OF TRADE UNIONS)

कामगार संघटनांचे विविध दृष्टिकोन खालील पाच प्रकारांमध्ये वर्गीकृत केले जाऊ शकतात.

१. क्रांतिकारी सिद्धांत:

कार्ल मार्क्सने कामगार संघटनांचा क्रांतिकारी दृष्टिकोन विकसित केला आहे. हा सिद्धांत "वर्गसंघर्ष आणि द्वंद्वात्मक भौतिकवादाचा सिद्धांत" म्हणूनही ओळखला जातो. मार्क्सच्या मते, कामगार वर्गाच्या शक्तींना सुव्यवस्थित करण्यासाठी, योग्य स्थान निर्माण करून देण्यासाठी कामगार संघटना ही एक महत्त्वाचे केंद्र ठरते. मार्क्सच्या मते, कामगार संघटना या भांडवलशाहीचा पाडाव करण्याचे साधन आहेत. अशा प्रकारे कामगार आणि भांडवलदार व्यापारी यांच्यातील वर्गसंघर्षाचे संघटना या प्रमुख साधन ठरतात. मार्क्सच्या मते, कामगार वर्गाने त्याच्या क्रांतिकारी कार्यक्रमापासून स्वतःला विचलित करू नये, कारण कामगार संघर्षच भांडवलशाही नष्ट करू शकतो. मार्क्सच्या मते, कामगारांचे स्वातंत्र्य हे भांडवलशाहीच्या उच्चाटनामध्ये दडले आहे.

२. उत्क्रांती सिद्धांत:

उत्क्रांती सिद्धांत हा "औद्योगिक लोकशाहीचा सिद्धांत" म्हणून ओळखला जातो. तो बीट्रिस वेब्स यांनी मांडला. वेब्सच्या मते, ट्रेड युनियनवाद हा औद्योगिक क्षेत्रातील लोकशाहीच्या तत्त्वाचा विस्तार आहे. ट्रेड युनियनवाद हे भांडवलशाहीला उलथून टाकण्याचे साधन नाही, तर कामगार आणि भांडवलाची सौदेबाजी करण्याची शक्ती समान करण्याचे साधन आहे. ट्रेड युनियनवाद एक असे माध्यम आहे की, ज्याद्वारे कामगार एकीकडे व्यवस्थापकीय हुकूमशाहीवर मात करतात आणि दुसरीकडे त्यांना कोणत्या परिस्थितीत काम करावे लागेल हे ठरवण्यासाठी आवाज उठवतात.

३. औद्योगिक न्यायशास्त्राचा सिद्धांत:

“औद्योगिक न्यायशास्त्राचा सिद्धांत” एस. एच. स्लिचर यांनी मांडला. त्यांच्या मते, कामगार त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी मालकांशी सौदेबाजी करण्यात वैयक्तिकरित्या अपयशी ठरतात. त्यांच्या मते, कामगार संघटना कामगारांना कामात त्यांचे संरक्षण करण्याचे साधन म्हणून काम करतात. ट्रेड युनियनवादाच्या अशा दृष्टिकोनाला, स्लिचरने "औद्योगिक न्यायशास्त्राची प्रणाली" असे संबोधले आहे.

४. विद्रोह सिद्धांत:

"विद्रोह सिद्धांत" चे प्रवर्तक फ्रँक टॅनेनबॉम यांच्या मते, ट्रेड युनियनवाद हा यांत्रिकीकरणाच्या वाढीचा उत्स्फूर्त परिणाम आहे. यंत्रांच्या वापरामुळे कामगारांचे शोषण होते, असे त्यांचे मत आहे. अशाप्रकारे, यंत्र हे कारण आहे आणि कामगार चळवळ, म्हणजेच ट्रेड युनियनवाद हा परिणाम आहे. दुस-या शब्दात सांगायचे तर, कामगार संघटना उद्योगसंस्थांमधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी औद्योगिक समाजाच्या यांत्रिकीकरण आणि स्वयंचलितीकरणाविरूद्धचा बंडखोर दृष्टिकोन आहे.

५. गांधीवादी दृष्टीकोन:

ट्रेड युनियनवादाचा गांधीवादी दृष्टिकोन "वर्ग संघर्ष आणि संघर्षाऐवजी वर्गीय सहकार्यावर" आधारित आहे. कामगारांमध्ये सुधारणा आणि आत्मभान याद्वारे भांडवलदाराकडून

कामगारांचा योग्य वाटा घेण्याच्या कल्पनेने कामगार संघटनांचा उदय झाला. अशा प्रकारे, ट्रेड युनियनवादाचा गांधीवादी दृष्टीकोन केवळ भौतिक पैलूंशी संबंधित नाही, तर नैतिक आणि बौद्धिक पैलूंशी देखील संबंधित आहे.

गांधींजीनी यावर भर दिला की, ट्रेड युनियनचे राजकीय हे अंतिम उद्दिष्ट नाही. तर संघटनांचे प्रत्यक्ष उद्दिष्ट हे अंतर्गत सुधारणा आणि अंतर्गत शक्तीची उत्क्रांती हे आहे. गांधीवादी दृष्टिकोनानुसार, ट्रेड युनियनवाद सामान्यत: भांडवलविरोधी नाही.

१.७ सारांश (SUMMARY)

भारतात संघटनावाद मोठया प्रमाणात विकसित झाला आहे. सुरवातीच्या कालखंडात संघटनांना संप करणे, नोंदणी प्रक्रिया आणि मान्यता बंधनकारक करणे यासंबंधी कायदेशीर पाठबळ मिळत नव्हते. अलीकडच्या काळात कायदेशीर पाठबळ तसेच सविस्तर कायदे आणि विशेष न्यायालये उपलब्ध असल्यामुळे, भारतातील कामगार संघटनांना कामगार चळवळीत उल्लेखनीय दर्जा प्राप्त झाला आहे. तथापि, अद्यापही काही अडचणींना सामोरे जावे लागत आहे, जसे की आर्थिक संसाधनांची कमतरता आणि सरकारी समर्थन. यामुळेच भारतात ट्रेड युनियनवादाच्या विकासाला अजूनही वाव आहे.

१.८ प्रश्न (QUESTIONS)

१. कामगार संघटनांवर टिप लिहा.

२. कामगार संघटनांची उत्क्रांती विशद करा.

३. कामगार संघटनांची व्याख्या देवून भूमिका विशद करा.

४. कामगार संघटनांची उत्क्रांती स्पष्ट करा.

५. कामगार संघटनांचे उगमाचे विविध दृष्टिकोन स्पष्ट करा.

*****

२

कामगार संघटनांचे अर्थशास्त्र - २

घटक संरचना

२.० उद्दिष्टये

२.१ प्रस्तावना

२.२ वेतनाचा सौदा सिद्धांत

२.३ संघटनांचा उत्पादकतेवरील परिणाम

२.४ संघटनांचा वेतनावरील परिणाम

२.५ रोजगार सुरक्षा आणि कार्यक्षमता

२.६ असंघटित क्षेत्र

२.७ सारांश

२.८ प्रश्न

२.० उद्दिष्टये (OBJECTIVE)

- श्रमिक संघटनेच्या अर्थशास्त्राचे आकलन आणि मजुरीचा सौदा सिद्धांत समजून घेणे.
- श्रमिक संघटनांचा उत्पादकता आणि मजुरी यावरील प्रभाव समजून घेणे.
- रोजगार सुरक्षा आणि कार्यक्षमता यामधीलसंबंधांचे आकलन होईल.

२.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

विविध संघटनांचे अभ्यासक, अर्थशास्त्रज्ञ यांच्या मते, कामगार संघटना या एक प्रकारे कार्टेल संघाप्रमाणे काम करतात. ज्यांचे कार्य हे विविध उद्योगसंस्था आणि उद्योगांना मजुरांचा पुरवठा मर्यादित करून स्पर्धात्मक पातळीपेक्षा जास्त वेतन वाढवणे हे असते. बहुतांशी संघटना आपल्या सदस्यांचे वेतन वाढ आणि कामाची परिस्थिती सुधारण्याच्या कामी यशस्वी ठरल्या आहेत. तथापि, या प्रक्रियेत, संघटनाकृत कंपन्यांमध्ये उपलब्ध नोकऱ्यांची संख्या कमी झाल्याचे आढळून येते. मागणीच्या मूलभूत नियमानुसार पाहिल्यास वेतन वाढीमुळे एका अर्थाने आर्थिक कल्याणाचे नुकसान होते असे म्हणता येईल. उदा, जर संघटनेने मजुरांची किंमत यशस्वीरित्या वाढवली तर, मालक ते कमी खरेदी करतील. अशाप्रकारे संघटना या श्रम बाजारातील स्पर्धाविरोधी एक प्रमुख प्रतिस्पर्धी शक्ती ठरतात. संघटनांना मिळणाऱ्या अश्या प्रकारच्या लाभाचा भार हा ग्राहक, संघटना विरहीत कामगार, रोजगार, करदाते आणि कंपन्यांचे मालक यांना सोसावा लागतो.

हार्वर्डचे अर्थशास्त्रज्ञ रिचर्ड फ्रीडमन आणि जेम्स मॅडॉफ यांच्या मते, "सर्वच संघटनांची नसली तरी बहुतांशी, संघटनांची यामध्ये मक्तेदारी आहे आणि याचाच वापर करून या संघटना स्पर्धात्मक पातळीपेक्षा वेतन वाढ करू शकतात." संघटनांच्या सदस्यांचा म्हणजे

श्रमिकांच्या वेतनामध्ये वाढ करण्याकरता अथवा उच्च वेतनवाढ निश्चित करण्याकरिता आपल्या अधिकाराचा वापर संघटना करतात. हे अधिकार संघटनांना सरकारकडून मिळालेल्या कायदेशीर उच्चाधिकारावर तसेच प्रतिकार करण्याच्या अधिकारावर अवलंबून असते. कायद्याच्या आधारे संघटनांना हे अधिकार प्राप्त होतात. तसेच इतर कायद्यांची अंमलबजावणी न केल्यामुळे देखील संघटनांना हे शक्य होते. अशा उच्च अधिकारांचा हेतू हा इतरांना कमी वेतनावर काम करण्यापासून प्रतिबंधित करणे हा आहे. संघटनांचे जगभरात अनेक कायदेशीर विशेषाधिकार आहेत. संघटना या कर आकारणी आणि MRTP (मक्तेदारी आणि प्रतिबंधात्मक व्यापार प्रथा कायदा) कायद्यापासून मुक्त आहेत. उद्योग संस्थांना संघटनांशी सौदेबाजी करणे भाग पडते. श्रमिकांच्या समूहांचे प्रतिनिधित्व करणारी संघटना अशी मान्यता सरकारने मंजूर केल्यानंतर विशिष्ट कर्मचाऱ्यांना सामुहिक प्रतिनिधित्व हवे आहे की नाही हे न पाहता संघटना प्रतिनिधित्व करतात. इ. स. २००२ मध्ये कामगार संघटनांनी अमेरिकेमध्ये मजुरी आणि पगारदार कर्मचाऱ्यांचे संघटनांचे सदस्य नसतानादेखील प्रतिनिधित्व केले. अनेक वेळा संघटना कामगारांकडून गोळा केलेला निधी राजकीय मोहिमा आणि मतदार नोंदणी यासारख्या राजकीय हेतूसाठी वापरतात. हे सामूहिक सौदेबाजी अथवा कर्मचाऱ्यांच्या तक्रारीशी संबंधित नसते. कामगार विभागांमध्ये झालेल्या दुखापतीसाठी, न्यायालयाच्या आदेशापासून आणि राज्याच्या कायद्या अंतर्गत संघटना तुलनेने सुरक्षित असतात. स्पर्धात्मक वातावरणात संघटनांची प्रगती होऊ शकत नाही. औद्योगिक संघटना अथवा कार्टेल ग्रुप यासारख्या संस्थांप्रमाणे या संघटना देखील ते सरकारी कवच आणि संरक्षणावर अवलंबून आहेत. १९३० ची महामंदी आणि दोन महायुद्धादरम्यान कामगार संघटना कार्टेल या स्वरूपात वाढल्या. भारतात कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करणारे कामगार कायदे आणि कामगार संघटनांची निर्मिती आणि मान्यता यासंबंधीचे कायदे तसेच औद्योगिक संबंधाबाबतचे कायदे देशातील ट्रेड युनियनवादाचे रक्षण करतात आणि एका अर्थाने कामगार संघटनावादाला मदत करतात. उदाहरणार्थ १९२६ चा ट्रेड युनियन कायदा कामगारांना संघटना स्थापन करण्याचा अधिकार प्राप्त करून देतो. औद्योगिक विवाद कायदा, १९४७ नुसार कामगार संघटनांना मध्यस्थांची भुमिका म्हणजेच करार एजंट म्हणून स्थान दिले आहे आणि नियुक्ती करताना उद्योजकांना संघटनेसोबत बसून सामूहिक वेतन करार अंमलात आणण्याचे कायदेशीर बंधन आहे. अमेरिकेमध्ये खाजगी क्षेत्रातील बहुतेक संघटना हस्तकला उद्योगांमध्ये आहेत आणि ज्या उद्योगांमध्ये पेढयांची संख्या अल्प आहे असे उद्योग विशिष्ट प्रदेशात केंद्रित आहेत. अशाप्रकारे काही उद्योजक व प्रादेशिक केंद्रित उद्योजक या रचनेमुळे संघटनांचे आयोजन सुलभ होते. याउलट उद्योजकांची मोठी संख्या आणि उद्योजकांचे क्षेत्रीय वितरण यामुळे व्यापार, सेवा आणि शेती क्षेत्रातील संघटनीकरणाला खीळ बसली. २००२ मध्ये सरकारी क्षेत्रात संघीकरणाचा दर ३७.५ टक्के होता. तर खाजगी क्षेत्रात केवळ ८.५ टक्के होता. यावरून हे स्पष्ट होते की, जेव्हा मोठया प्रमाणात नियमन केले जाते व मक्तेदारीचे स्वरूप असते अशा वेळी कामगार संघटना सर्वोत्तम काम करतात. खाजगी क्षेत्रामध्ये देखील कामगार संघटनांचा दर २८ टक्के आढळून आला. यामध्ये वाहतूक म्हणजेच हवाई मार्ग, रेल्वे मार्ग, शहरातील परिवहन इत्यादींचा समावेश होतो. तसेच सार्वजनिक उपयोगितेचा विचार केल्यास सार्वजनिक क्षेत्रातील दोन मोठया नियंत्रित उद्योगांमध्ये हे प्रमाण २१.८ टक्के होते. भारतात परिवहन, साठवणूक आणि दळणवळण या उद्योगांमध्ये संघटनांचे सदस्यत्व सर्वाधिक म्हणजे ४० टक्के होते. त्यानंतर १९९७ मध्ये व्यापार,

हॉटेल्स आणि रेस्टॉरंट मध्ये ३६ टक्के सभासदत्व होते. कृषी क्षेत्रामध्ये वनीकरण, मासेमारी असे एकंदर प्राथमिक क्षेत्राचा विचार केल्यास १९९७ मध्ये फक्त २१ टक्के संघटनांचे सभासद होते.

संघटनांचे आर्थिक परिणाम:

अमेरिकेचा विचार केल्यास २००२ मध्ये तिथे पूर्णवेळ काम करणाऱ्या व संघटनेचे सदस्यत्व नसलेल्या कामगारांची आठवडयांची कमाई ५८७ डॉलर इतकी होती. तर संघटनेचे सदस्य असलेल्यांची कमाई ७४० डॉलर इतकी होती. याचा अर्थ असा की, संघटना विरहित कामगारांची कमाई २१ टक्के कमी होती. अर्थशास्त्रज्ञांचे अभ्यासदेखील हेच दर्शवतात. एच. ग्रेग लुईस यांनी १९८५ मध्ये २०० सदस्यांच्या अभ्यासातून असा निष्कर्ष काढला की, संघटनांच्या अस्तित्वामुळे सदस्य असलेल्या कामगारांचे वेतन संघटना नसलेल्या परंतु समान कुशलता असलेल्या कामगारांपेक्षा १४ ते १५ टक्के जास्त होते. हार्वर्ड विद्यापीठातील रिचर्ड फ्रीडमन आणि जेम्स मॅडॉफ तसेच पेनसिल्वेनिया विद्यापीठाचे पीटर लीमन आणि मायकल यांनी असा दावा केला की, १९८० च्या दशकात संघटनांमुळे कामगारांचा लाभ २० ते ३० टक्के अधिक झाला असल्याचे दिसून येते. अलीकडच्या काळात नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनोमिक एनालिसिस या अभ्यासामध्ये अर्थशास्त्रज्ञांना १८ टक्के इतकी वेतनातील भिन्नता आढळून आली.

वेतनाचे लाभ हे उद्योगनिहाय व व्यापार चक्राच्या अवस्थेनुसार बदलत राहतात. कापड उद्योगातील कामगार, पांढरपेशा सरकारी कर्मचारी वर्ग आणि शिक्षक यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांचा वेतनावर फारसा परिणाम झालेला दिसून येत नाही. परंतु संघटना असलेल्या खाण कामगार, बांधकाम क्षेत्र, हवाई क्षेत्रातील कर्मचारी, मर्चंट नेव्हीतील कर्मचारी, टपाल कामगार, रेल्वेतील कामगार, ऑटो आणि स्टील कामगार यांचे वेतन कुशल अशा परंतु संघटना नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनापेक्षा २५ टक्के किंवा त्याहून अधिक आढळून आले. १९९० च्या उत्तरार्धात वेतन प्रचंड प्रमाणात वाढले. यावेळी ऐतिहासिक स्वरूपाचा अवलंब केल्याने कामगार संघटनांमध्ये फारसा वेतनवाढीचा फरक दिसून आला नाही. कारण संघटनांचे वेतन सुमारे तीन वर्षासाठी निश्चित केलेले असतात आणि त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते. यामुळे वृद्धीच्या काळात उद्योजकांना अधिक सकारात्मक प्रतिसाद मिळतो. अशावेळी असंघटित क्षेत्रातील वेतनापेक्षा कमी लाभ मिळतात. २००० च्या दशकाच्या सुरुवातीला रोजगारात घसरण निर्माण झाली व उलट परिस्थिती निर्माण झाली. कारण असंघटित क्षेत्रातील वेतनवाढ घसरली आणि संघटित क्षेत्रातील वेतनवाढ अधिक झाली. कारण असंघटित क्षेत्रातील नियुक्त्या कमी होतात.

संघटित कामगारांना वेतनासंदर्भात मिळणारे लाभ हे दोन कारणांमुळे प्राप्त होतात. पहिले म्हणजे मक्तेदारी स्वरूपातील संघटना स्पर्धात्मक स्तरातील वेतनापेक्षा आपले वेतन वाढवतात. दुसरे म्हणजे असंघटित कामगारांची मजुरी कमी होते. याचे कारण म्हणजे संघटनांच्या दबावामुळे वेतनामध्ये जी वाढ होते त्यामुळे कामगारांना नोकऱ्यांमधून विस्थापित व्हावे लागते आणि ते अपरिहार्यपणे संघटित क्षेत्रात जातात आणि तेथील वेतन कमी होते. अशाप्रकारे संघटित क्षेत्रातील कामगारांना सुद्धा कमी पगाराच्या नोकऱ्याकडे जावे लागते किंवा बेरोजगार व्हावे लागते. अतिरेकी वेतनवाढ जर नफ्यावर प्रभाव पाडू

लागली तर अशी स्थिती निर्माण होते. तसेच खाजगी क्षेत्रातील संघटनांना मक्तेदारी आणि वर्चस्व प्राप्त झाल्याने सरकारी पांढरपेशा संघटनांची घसरण झाली. बाजारपेठेतील शांत, स्थिर शक्ती त्यांना सतत कमजोर करत असतात. अर्थशास्त्रज्ञ विल्यम कार्टर आणि लिनमन यांना असे आढळून आले की, गेल्या वीस वर्षात संघटनेमुळे ६४ टक्के इतका वेतनाचा लाभ मिळाला. पण त्यामुळे रोजगाराच्या वाटा मात्र कमी झाला. म्हणजेच संघटना वेतन वाढवण्यात यशस्वी होत असल्या तरी त्याचा रोजगारावर दूरगामी परिणाम होत असल्याचे दिसून आले.

१९७३ ते १९८७ दरम्यान रेल्वेमार्ग कामगारांचे वेतन लाभ समान कुशलता असलेल्या बिगर रेल्वे कामगारापेक्षा सरासरीने ३२ टक्केवरून ५० टक्के इतके वाढले. परंतु त्याचवेळी रेल्वेमार्गावरील रोजगार ५२०००० वरून २४९००० पर्यंत घसरला. १९८७ पासून रेल्वे मार्ग रोजगारामध्ये १३ टक्के इतकी घट झाली. २००२ पर्यंत रेल्वे मार्गातील रोजगार २१६००० इतका घसरला तर याच कालावधीत एकूण बिगर शेती रोजगारात २६ टक्के इतकी वाढ झाली. सतत वाढणाऱ्या वेतन लाभामुळे बांधकाम उत्पादन आणि दळणवळण क्षेत्रात संघटना अंतर्गत रोजगारात घट झाल्याचे आढळून येते. कामगार संघटनाना कमजोर करणाऱ्या काही बाबी असतात. या बाबी म्हणजे बाजार व्यवस्था स्थिर व संयमाने चालावी, यासाठी प्रवृत्त करणाऱ्या शक्ती असतात. यामुळे अर्थव्यवस्थेत बाजार व्यवस्था शांततेत वाटचाल करीत असते आणि पर्यायाने कामगार संघटनांचे प्राबल्य कमी होते.

अमेरिकेमध्ये हीच स्थिती आढळून येते. अलीकडच्या दशकात येथील सर्व खाजगी उद्योगांमध्ये कामगार संघटनांचे प्रतिनिधित्व कमी झाले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे कामगारांना संघटना आवडत नाही. अमेरिकेतील अभ्यासाअंती असे आढळून आले की, ते संघटनांच्या निवडणुकीत मतदानासाठी सुद्धा धजत नाहीत. प्रत्येक तीन कर्मचारी पैकी फक्त एक कर्मचारी मतदानासाठी पुढे येतो. संघटित कामगारांपेक्षा गैर असंघटित कर्मचारी आपल्या नोकरीची सुरक्षितता, नोकरीतील कामगिरीमुळे निर्माण होणारी स्वतःची ओळख आणि त्यांच्या नोकऱ्यावर परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये सहभाग घेऊन ते अधिक समाधानी आहेत. अमेरिकेतील छोटया- छोटया कंपन्यांमध्ये होत असलेली उत्क्रांती, दक्षिण आणि उत्तरेकडील भाग, उच्च तंत्रज्ञान उत्पादने तसेच अत्युच्च व्यावसायिक आणि तांत्रिक कौशल्य आधारित व्यक्ती या विविध बाबतीत संघटनांची सदस्य संख्या कमी होत आहे.

अमेरिकेमध्ये खाजगी क्षेत्रातील संघटनांची सदस्यसंख्या १९७० मध्ये १७ दशलक्ष इतकी उच्च पातळीला पोहोचली होती आणि २००२ मध्ये ती सुमारे अर्धी म्हणजेच ८.८ दशलक्ष इतकी घटली.

२.२ वेतनाचा सौदा सिद्धांत (BARGANING THEORY OF WAGES)

जॉन डेव्हिडसन यांनी १८९३ साली वेतनाचा सौदा सिद्धांत विकसित केला. या सिद्धांतानुसार वेतन हे उद्योजक आणि कामगार यांच्या सापेक्ष सौदा शक्तीच्या आधारे निर्धारित केले जाते. जर श्रमिकांची सौदाशक्ती उद्योजकांपेक्षा अधिक असल्यास वेतन

तसेच कामाच्या स्थितीबाबत सौदा अधिक फायदेशीर ठरेल. याउलट परिस्थितीत नेमके उलटे घडते. हा सिद्धांत थोऊर्नटन, डेव्हिडसन, मॉरिस डॉब, सिडनी वेब आणि बिट्रीस वेब यांनी मांडला होता. या सिद्धांताला १९३३ नंतर अधिक चालना मिळाली. अर्थव्यवस्थेत एकूण मागणी प्रभावित करण्याकरिता तसेच आर्थिक संकटावर मात करण्यासाठी याची उपयुक्तता मान्य करून प्रसिद्ध अर्थतज्ञ लॉर्ड जे. एम. केन्स यांनी या सिद्धांताचे समर्थन केले. राष्ट्रीय उत्पन्नाचे हस्तांतरण श्रीमंताकडून कामगारांकडे झाल्यास एकूण मागणीमध्ये वाढ होऊन आर्थिक संकटावर मात करता येते. यादृष्टीने या सिद्धांताचे त्यांनी समर्थन केले. अडम स्मिथ यांच्या लेखणीतून देखील सौदाशक्ती सिद्धांताच्या बाबतीत विचार स्पष्ट झाले आहेत. अडम स्मिथ याने स्पष्ट केले आहे की, वेतन दराबाबतीतील विभागांमध्ये उद्योजकांना फायदा आहे. कारण अधिक सहज रित्या ते एकीकरण घडवून आणू शकतात.

गृहिते (Assumptions):

वेतन सौदा सिद्धांत पुढील गृहितावर आधारलेला आहे.

१) मजुरी, कामाचे तास आणि कामाची परिस्थिती, कामगार आणि मालक यांच्या सापेक्ष सौदाबाजीच्या सामर्थ्याने निर्धारित केली जाते.

२) संघटनांचे अस्तित्व नसल्यास आणि त्यांच्याकडून ठोस कृती कार्यक्रम आखला न गेल्यास कामगारांना आवश्यक सुविधा व कामाच्या ठिकाणची स्थिती योग्य असणार नाही. कनिष्ठ स्थिती व सुविधा पुरविण्याकडे कल असेल.

३) संघटित व्यापार क्षेत्रात विविध घटकांच्या कार्यवाही मध्ये सुरक्षितता आढळून येत नाही.

४) ही एक लवचिक अशी बदल करण्यायोग्य परिस्थिती असते आणि यामध्ये संघटित प्रयत्नांच्या आधारे वेतन, कामाचे तास आणि कामगार करार इ. महत्त्वाच्या बाबतीत तसेच प्रशासनामध्ये सकारात्मक सुधारणा आणि सुरक्षितता आणली जाऊ शकते.

या सिद्धांताचे समर्थन डेविडसन आणि डॉब तसेच सिडनी आणि बिट्रीस वेब यांनी केले आहे. इतर समर्थकांच्या मते, मजुरीचे दर हे उच्च व कमी या दोघांच्या मर्यादेमध्ये निश्चित केले जातात. उद्योजक नेहमी कमी पगार देऊ पाहतात आणि एका मर्यादेपलीकडे ते वेतन देऊ इच्छित नाहीत. वेतन निश्चिती करताना उद्योजक श्रमिकांची उत्पादकता, भांडवल सामग्रीमधील गुंतवणूक, कर्जाऊ रक्कमेचा खर्च, उद्योगसंस्थामधील स्पर्धा आणि उत्पादनामध्ये श्रमाच्या जागी यंत्र किंवा जमिनीच्या आदलाबदलाची शक्यता इत्यादी घटक लक्षात घेतात. तर श्रमिकांकडून श्रमिकांचे राहणीमान, स्वप्रतिष्ठा, इतर संबंधित घटकांचे मत, इतर उद्योगातील कामाची स्थिती कामगार संघटनांचे धोरण इत्यादी बाबी लक्षात घेतल्या जातात. प्रत्यक्षात या दोन मर्यादेमधून वेतन निश्चित होते आणि ते या दोन पक्षातील तुलनात्मक सौदाशक्तीवर अवलंबून असते. हा सिद्धांत हे स्पष्ट करतो की, संघटनांच्या दबावामुळे वेतनात वाढ होते आणि कामगारांना राष्ट्रीय उत्पन्नात जास्त वाटा मिळतो. पण हा मिळालेला वाटा वेतनेतर उत्पन्न मिळवणाऱ्या कामगारांच्या मोबदल्यात म्हणजेच त्यांच्या उत्पन्नात घट करून मिळतो, हे नाकारता येत नाही. श्रमिकांना दिली जाणारी वेतनाची महत्तम मर्यादा ही त्यांच्या सीमांत उत्पादकतेनुसार ठरेल. तर न्यूनत्तम मर्यादा ही

श्रमिकांना त्यांचे वर्तमान काळातील राहणीमान राखण्याकरिता पुरेसे असेल. हा सिद्धांत सूचित करतो की, दोहोंचे एकत्रीकरण न केल्यास श्रमिकांची सौदाशक्ती कमकुवत होईल. वेतनाचा सौदा सिद्धांत हेदेखील सुचित करतो की, जर श्रमिकांच्या सौदाशक्तीत सक्षमता आणल्यास मक्तेदारांना श्रम बाजार व वस्तू बाजारात मिळणाऱ्या अतिरिक्त नफ्याचे भागीदार बनवू शकतात. त्याचप्रमाणे समजुतीच्या अनुकूल वातावरणात किंवा अनुकूल परिस्थितीत सीमांत उत्पादकतेपेक्षा अधिक उत्पादन मक्तेदाराच्या नफ्यातून काढून घेतले जाते.

वेतन सौदा सिद्धांत हा अपूर्ण स्पर्धेच्या स्थितीमध्ये लागू होतो. या सिद्धांतामध्ये विभिन्न वेतन दराचे विश्लेषण देखील स्पष्ट केले आहे, परंतु हा सिद्धांत टीकेपासून दूर नाही. या सिद्धांतावर टीका केली जाते की, हा सिद्धांत पूर्ण सिद्धांत नाही. याची अपूर्णता दीर्घकालीन मांडणीतील अपयशामुळे स्पष्ट होते. सामूहिक सौदेबाजीमुळे कामगारांना न्याय किंवा आर्थिक फायदा होणार नाही, असे मानले जाते. यामुळे कामगारांच्या रोजगार संधींना आणखी हानी पोहोचेल आणि कामगारांच्या बेजबाबदार वर्तनाला प्रोत्साहन मिळेल. सौदाशक्ती वर आधारित वेतन निश्चितीमुळे संप आणि टाळेबंदी या स्वरूपात सामाजिक खर्च येत असतो. सामूहिक सौदा शक्तीमुळे वेतनामध्ये भिन्नता निर्माण होते ज्यामध्ये समानतेची गरज निर्माण होते. उलटपक्षी विविध उपाय व दुरुस्तीच्या आधारे समानता आणल्यास भिन्नता आवश्यक वाटू लागते.

२.३ संघटनांचा उत्पादकतेवरील परिणाम (IMPACT OF UNIONS ON PRODUCTIVITY)

संघटनांचा उत्पादकतेवरील परिणाम हे श्रमिक संघटनांचे मूल्यांकन, कामगिरी आणि श्रमिक कायदे या दृष्टीने समजावून घेणे महत्त्वाचे ठरते. उत्पादकता म्हणजे दिलेल्या आदानाच्या पातळीला घेण्यात येणारे उत्पादन होय. एखादी उद्योगसंस्था इतर उद्योगसंस्थेपेक्षा अधिक उत्पादनक्षम असेल जेव्हा तेवढयाच उत्पादन घटकांचा किंवा साधनांचा उपयोग करून अधिक उत्पादन घेईल. म्हणजेच इतर उद्योगसंस्थे इतक्याच आदानाच्या संयोगाचा वापर करून अशी उद्योगसंस्था अधिक उत्पादन घेईल किंवा समान पातळीवर कमी आदानांचा वापर करून तेवढेच उत्पादन घेईल. संघटनांच्यामुळे उत्पादकतेतील वाढ झाली, असा अर्थ अशावेळी काढता येईल. जेव्हा सीमांत उत्पादन स्थितीमध्ये वास्तविक स्थित्यंतर घडून येईल. फक्त उच्च वेतनवाढीचा प्रतिसाद म्हणून श्रम बाजार वक्रावरील वरच्या बाजू वरील हालचाल म्हणजेच उच्च भांडवल श्रम गुणोत्तर यावरून ते ठरविता येणार नाही. जर कामाच्या ठिकाणी सामूहिक सौदेबाजी च्या आधारे ही उत्पादकता वाढविण्यासाठी पद्धतशीरपणे प्रयत्न केले गेले असतील आणि अशा मर्यादेपर्यंत ते पूर्ण भरपाई करणार असतील तर संघटनांचे आयोजन सुलभ होईल. अशा प्रकारची जी धोरणे असतात त्या धोरणांचा जोरदार युक्तिवाद केला जाऊ शकतो. उत्पादकता वाढीच्या बाबतीत असा युक्तिवाद केला गेला की, उत्पादकतेतील सामूहिक दबावाला व्यवस्थापनाकडून योग्य संस्थात्मक प्रतिसाद मिळाल्यास उत्पादकता प्रभावित होते आणि त्यामध्ये वाढ होते. या मतप्रवाहाच्या आधारे संघटना आपली उलाढाल कमी करतात आणि कामाच्या ठिकाणी अधिक कार्यक्षम प्रशासकीय संरचना निर्माण करतात. सार्वजनिक वस्तू पुरक उत्पादन आणि दीर्घकालीन करार संबंध अशा या रचनेची वैशिष्ट्ये आढळतात.

संघटना उत्पादकतेत महत्त्वपूर्ण वाढ घडवून आणतात, हे अभ्यासाच्या आधारे योग्य रीतीने मांडले गेले नाही. त्यानंतरच्या विविध अभ्यासात असे आढळून आले की, संघटनांचा उत्पादकतेवर सकारात्मक परिणाम होण्याऐवजी नकारात्मक परिणाम होतो. संघटनांच्या उत्पादकतेत मोठी वाढ घडून येते, हे नफा आणि रोजगार या बाबतीत दिल्या जाणाऱ्या पुराव्याशी विसंगत आहे. संघटनिकरण व त्याचे वाढते परिणाम तसेच उत्पादकता, विक्री आणि रोजगाराच्या वाढीवर संघटनांचा नकारात्मक प्रभाव आढळून येतो, याकडे लक्ष केंद्रित केले गेले. ज्या उद्योगांमध्ये संघटनाकृत वेतनाचे लाभ सर्वात अधिक आहेत अशा उद्योगांमध्ये उत्पादकतेवर होणारे परिणाम सर्वात मोठे असतात. या प्रकारची रचना अशा प्रकारे निर्माण होते जसे उत्पादनफलनाबाबत टीकाकारांनी भाकीत केल्याप्रमाणे संघटनांच्या घनतेचा सहसंबंध तपासल्यास हे लक्षात येते की, हा प्रभाव उत्पादनापेक्षा वेतनावर होतो, हे निष्कर्ष नागरीकरणाच्या विश्लेषणाशी सुसंगत आहेत. या विश्लेषणामध्ये 'धक्का प्रभाव' लक्षात घेऊन व्यवस्थापनाने असा प्रतिसाद द्यावा की, कामगारांचा खर्च वाढल्यास त्याला प्रतिसाद म्हणून व्यवस्थापक आणि सक्षमतेने संघटित होते, मंदीवर मात केली जाते आणि उत्पादकता वाढ ही चिकित्सकपणे मोजली जाते. संघटनांचा उत्पादकतेवर सकारात्मक परिणाम हा विशिष्टपणे अशा ठिकाणी अधिक असतो जिथे स्पर्धात्मक दबाव अस्तित्वात असतो आणि अशा प्रकारचे सकारात्मक परिणाम मुख्यत्वे खाजगी नफादायी क्षेत्रापुरते मर्यादित असतात. सार्वजनिक शाळांचे बांधकाम, सार्वजनिक ग्रंथालये, सरकारी अस्थापना, शाळा कायद्याची अंमलबजावणी तसेच रुग्णालये इत्यादींच्या उत्पादकतेवर संघटनेचे सकारात्मक परिणाम आढळून येत नाहीत. उत्पादकतेच्या या विश्लेषणामध्ये जे अभ्यास झाले त्यामध्ये एक औत्सुक्यपूर्ण असे गोंधळात टाकणारे अभ्यास दिसून येतात. कारण पुराव्याच्या आधारे हे स्पष्ट करण्यात आले आहे की, तुलनेने स्पर्धात्मक, खर्च कपातीचे आर्थिक वातावरण ही संघटनांचा उत्पादकतेवर सकारात्मक प्रभाव पाडण्याची एक आवश्यक अट आहे आणि यामध्ये व्यवस्थापनाचा प्रतिसाद खंबीर असायला हवा. जेवढा संघटनांचा दबाव अधिक तेवढा अधिक दबाव नफ्यावर पडत असतो. अर्थात अशा स्पर्धात्मक वातावरणात व्यवस्थापकीय ढिलाई तुलनेने कमी असावी लागते आणि संघटनांना संघटित होण्यासाठी आणि वेतनवाढीसाठी वाव देऊ नये अथवा कमीत कमी वाव असावा. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेतील उत्पादकतेवर संघटनांच्या आधारे मोठया प्रमाणावर परिणाम होण्याची शक्यता मर्यादित दिसून येते.

इतर देशांमधील याबाबतचे पुरावे खूपच मर्यादित आहेत. ब्रिटनमधील अभ्यास संख्येने कमी आहेत. परंतु तेथे संघटनांची घनता आणि उत्पादकता पातळी यांच्यामध्ये नकारात्मक संबंध आढळून आले. कॅनडामध्ये १९२६ ते १९७८ या कालावधीत उत्पादन आणि वेळेची शृंखला या माहितीवर आधारित पुरावे पाहण्यात आले. येथे सुरुवातीला उत्पादकतेवर संघटनांचे सकारात्मक धक्का परिणाम आढळून आले. संघटनांच्या प्रभावामुळे जरी उत्पादकता कमी आढळून आली असली तरी पाच ते आठ वर्षांच्या कालावधीत संघटनांच्या प्रभावाचे सकारात्मक परिणाम दिसून येतात. जर्मनीसारख्या देशात पुरावे शोधणे जिकिरीचे होते. कारण राष्ट्रीय पातळीवर किंवा केंद्रीकृत संघटनांचा विस्तार अतिशय व्यापक स्वरूपाचा असून संघटनांच्या आणि गैर संघटनांच्या अंतर्गत मोठया प्रमाणात कार्य परिषदा होतात ज्या अनिवार्य आहेत. जपानच्या बाबतीत बर्णेलो (१९९२) यांच्या अभ्यासात असे आढळून आले की, छोटया पुरवठादारांसाठी कार्य

करणाऱ्या संघटना वगळता जपानमध्ये उत्पादकतेवर आणि नफ्यावर नकारात्मक परिणाम दिसून येतात. हे आंतरराष्ट्रीय पुरावे मर्यादित असले तरी उपलब्ध असलेल्या पुराव्यानुसार अमेरिकेतील पुराव्यांना समर्थन देणारे आहेत.

२.४ संघटनांचा वेतनावरील प्रभाव (IMPACT OF UNIONS ON WAGES)

सरकारी धोरण आणि श्रमिक कायद्याची आखणी या संदर्भात कामगार संघटनांचा उद्योगसंस्थांच्या कामगिरीवर होणारा परिणाम आणि अर्थव्यवस्थेतील स्पर्धात्मकता अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. यामुळे संघटनांचे सौदाशक्तीचे हक्क आणि आयोजन यांचे नियमन करणाऱ्या कायद्यांना सक्षम बनवणे अथवा कमकुवत करण्याच्या कामी वैचारिक सुज्ञता प्राप्त करून दिली जाते. प्रो. बॅरि टि हर्ष यांनी कामगार संघटनांचा उत्पादकता, नफा, गुंतवणूक आणि रोजगार वृद्धी यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला. प्रो. बॅरि यांचा अभ्यास अमेरिका, कॅनडा, जपान आणि ब्रिटेन या देशांवर आधारित आहे. त्यांनी असा निष्कर्ष काढला की, कामगार संघटनांचा उत्पादकता आणि उत्पादकता वृद्धीवर अल्प परिणाम दिसून येतो. संघटनांमुळे वेतनात वाढ होऊन खर्चामध्ये जी वाढ होते ती भरून काढली जात नाही. या अभ्यासामध्ये जे पुरावे सादर करण्यात आले आहे ते स्पष्टपणे असे निर्देशित करतात की, संघटकीकरणामुळे नफा कमी होतो. उद्योगाच्या अथवा उद्योगसंस्थेच्या पातळीवर संघटनांचा नफाक्षमतेवरील परिणाम अशा प्रकारे असतो की, संघटनाकृत उद्योगसंस्थांचा नफा व असंघटीत उद्योगसंस्थांच्या नफ्यापेक्षा दहा टक्के ते वीस टक्क्यांनी कमी आहे. ब्रिटनमधील अभ्यासाच्या आधारे देखील हे स्पष्ट झाले की, बंद पडलेल्या दुकानांच्या संघटनांचा नाक्यावरील परिणाम अतिशय नकारात्मक आढळून आला. अलीकडील संशोधनामध्ये देखील हे स्पष्ट झाले आहे की, संघटनांच्या मक्तेदारीमुळे भौतिक भांडवलातील गुंतवणूक, संशोधन आणि विकास तसेच इतर नाविन्यपूर्ण अशा क्रियाकलापांमध्ये घट झाली.

प्रो. हर्ष यांनी केलेल्या या ५०० सार्वजनिक व्यापारकृत अमेरिकन उत्पादन क्षेत्रातील उद्योगसंस्थांच्या अभ्यासानुसार संघटन असलेल्या उद्योगसंस्थांमधील भांडवल गुंतवणूक संघटनां नसलेल्या उद्योगसंस्थांच्या तुलनेत सहा टक्के कमी होती. हर्ष यांना असेही आढळून आले की, संघटनाकृत उद्योगसंस्थांमधील संशोधन व विकास यावरील खर्च १५ टक्के इतका कमी होता. कॅनडामधील समग्र सांखिकीय माहितीच्या आधारे केलेल्या अभ्यासात देखील आढळून आले की, संघटना भौतिक भांडवलातील गुंतवणूक लक्षणीय फरकाने कमी करतात.

संघटनाकृत उद्योगसंस्थांमध्ये वेतन दर उच्च असतात. दिलेल्या उच्च वेतनाला आणि अल्प नफा आणि गुंतवणुकीच्या पातळीला संघटनाकृत उद्योगसंस्थांमध्ये रोजगार वृद्धी दर कमी असतो. संघटनांचा (संघटनीकरणाचा) रोजगारावरील परिणामांच्या कॅनडा, अमेरिका आणि ब्रिटन मधील अभ्यासाअंती असे आढळून आले की, रोजगार वृध्दीवर संघटनीकरणाचा नकारात्मक परिणाम होतो. प्रो. रिचर्ड लॉग यांनी १९९३ मध्ये केलेल्या अभ्यासामध्ये आंतरराष्ट्रीय पुराव्याला पुष्टि दिली. या अभ्यासाअंतर्गत १९८० ते १९८५ या कालावधीत ५१० उत्पादक कंपन्यांच्या कामगिरीचे परीक्षण करण्यात आले. या

अभ्यासामध्ये असे आढळून आले की, या कालावधीत संघटना नसलेल्या उद्योगसंस्थांच्या वाढीचा दर २७ टक्के होता, तर संघटनाकृत उद्योगसंस्थांचा वाढीचा दर शुन्य होता.

२.५ रोजगार सुरक्षा आणि कार्यक्षमता (EMPLOYMENT SECURITY AND EFFICIENCY)

रोजगार सुरक्षा आणि कार्यक्षमता या एकमेकांशी संबंधित आहेत. रोजगार सुरक्षा आणि कार्यक्षमता यामध्ये सकारात्मक संबंध आढळतो की नकारात्मक, हा खरा प्रश्न आहे. या दोहोमधील सकारात्मक संबंध याचा अर्थ असा होतो की, जर रोजगार सुरक्षेची पातळी उच्च असेल, तर कामगारांची कार्यक्षमता देखील उच्च असेल; तर या दोहोंमधील नकारात्मक संबंध म्हणजे जेव्हा रोजगार सुरक्षा वाढते, तेव्हा कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता कमी होते. भारताच्या बाबतीत एक मुद्दा या संदर्भात नमूद करण्याजोगा आहे. तो म्हणजे एखादी व्यक्ती म्हणू शकते की, इथे सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना उच्च पातळीवर रोजगार सुरक्षा मिळते. परंतु त्यांची कार्यक्षमता पातळी तुलनेने खालच्या पातळीवरील रोजगार सुरक्षा उपभोगणाऱ्या संघटित खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या तुलनेत कमी असते. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत रोजगार सुरक्षा ही उद्योजकांच्या मर्जीवर अथवा समाधानावर अवलंबून असते. परंतु त्यांची कार्यक्षमतेची पातळी सार्वजनिक क्षेत्रातील अथवा समकक्ष अशा खाजगी संघटित क्षेत्रातील कार्यक्षमतेपेक्षा खूपच अधिक असू शकते तथापि इथे विचार करण्यायोग्य मुद्दा असा आहे की, केवळ रोजगार सुरक्षा हीच कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रभाव टाकू शकते की इतर अनेक घटक आहेत जे कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम करतात ?

कर्मचारी कार्यक्षमतेची व्याख्या प्रति व्यक्ती प्रति तासाला मिळणाऱ्या भौतिक उत्पादनाच्या स्वरूपातील रक्कम अशी केली जाते. तथापि उत्पादन हे एकटया कर्मचाऱ्याचे कार्य नाही. उत्पादकतेवर परिणाम करणारे इतर अनेक घटक आहेत ते म्हणजे कामाची परिस्थिती, भांडवली संपदा, कच्च्या मालाची गुणवत्ता, व्यवस्थापकीय प्रणाली इत्यादी. भारतीय कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, युरोप, अमेरिका आणि जपानमधील समकक्ष कर्मचाऱ्यांपेक्षा कमी मानली जाते. तथापि कापड उद्योग यांसारख्या संघटित उद्योगांमधील वाढत्या भांडवलामुळे भारतीय कामगारांच्या कार्यक्षमतेत सुधारणा होण्यास हातभार लागला आहे. कापूस उद्योगाच्या अगदी विरुद्ध अशा कोळसा खाण उद्योगाने विसाव्या शतकाच्या मध्याला कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत घट अनुभवली आहे. अशा घसरणीचे मूळ हे भारतीय कर्मचाऱ्यांच्या उपजत अशा काही लक्षणांमुळे नेमकेपणाने शोधता येत नाही. परंतु भारतीय उद्योगांमध्ये हे कामगार कोणत्या परिस्थितीत काम करतात, हे पाहणे देखिल या संदर्भात महत्त्वाचे ठरते. कर्मचाऱ्यांची क्षमता ही आहार, निवास, हवामान ,कामाचे तास, प्रशिक्षण, पुनर्प्रशिक्षण, कामाची परिस्थिती इत्यादी घटकांवर अवलंबून असते. काम करण्याची इच्छा ही उद्योजकांच्या वर्तनावर, उर्ध्व आणि क्षितिज गतिशीलतेच्या शक्यतेवर तसेच कर्मचाऱ्यांची वाटचाल आणि पुढाकार यांवर अवलंबून असते.

भारतातील औद्योगिक कामगारांच्या कमकुवत कार्यक्षमतेसाठी कारणीभूत असणारे घटक खालीलप्रमाणे सांगता येतील:

१) अधिक कार्यक्षमता आणि उत्पादकता यासाठी हवामानाची स्थिती अनुकूल नाही.

२) भारतीय कामगार पूर्णपणे शहरीकरण असलेले नाहीत त्यामुळे अंतर्गत स्थलांतराला बळी पडतात.

३) निम्न वेतन आणि निम्न दर्जाचे राहणीमान उदाहरणार्थ भारतात केवळ सात टक्के कामगार संघटित क्षेत्रात काम करतात ज्यांना रोजगार सुरक्षा आणि इतर फायदे मिळतात.

४) भांडवल आणि कच्चा मालाची गुणवत्ता निकृष्ट असल्यामुळे कार्यक्षमता देखील निकृष्ट आहे.

५) शिक्षण आणि प्रशिक्षणाची पातळी कमी असल्यामुळे भारतातील मानवी संसाधनांची गुणवत्तादे खील खराब असून कामगारांना पुरेसा मोबदला दिला जात नाही.

भारतात वरीलप्रमाणे कमी कार्यक्षमतेला कारणीभूत ठरणारी कारणे दूर केल्यास भारतातील कामगारांची कार्यक्षमता सुधारली जाऊ शकते.

२.६ असंघटित क्षेत्र (UNORGANISED SECTOR)

भारतीय श्रम बाजार संघटित आणि असंघटित अशा दोन विभागांमध्ये किंवा क्षेत्रांमध्ये विभागलेला आहे. हे दोन विभाग संघटित आणि असंघटित क्षेत्र म्हणून ओळखले जातात. श्रम बाजाराचे संघटित क्षेत्र खूपच लहान आहे. टक्केवारीच्या दृष्टीने पाहिल्यास देशातील एकूण रोजगारापैकी ते सुमारे ७% इतके आहे. उत्पादन विज वाहतूक आणि वित्तीय सेवा यांचे मोठया प्रमाणावर उत्पादन संघटित क्षेत्रात आहेत. असंघटित क्षेत्रामध्ये कृषी क्षेत्र हे सर्वात मोठे क्षेत्र असून या क्षेत्रामध्ये ६५ % इतकी लोकसंख्या प्रत्यक्षपणे अवलंबून आहे. शेती व्यतिरिक्त असंघटित क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या इतर उद्योगांमध्ये खाणकाम, उत्पादन, बांधकाम, व्यापार, वाहतूक, सामुदायिक, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा यांचा समावेश होतो.

असंघटित कामगार क्षेत्र ९७ टक्के कामगारांना रोजगार पुरवते. असंघटित कामगारांच्या व्याख्येनुसार असंघटित कामगार हे असे कामगार आहेत जे स्वतःला संघटित करू शकत नाहीत आणि रोजगाराचे अनौपचारिक स्वरूप अज्ञात आणि निरक्षर, लहान आणि विखुरलेल्या आस्थापना आणि उद्योजकांची उच्च शक्ती यावर मात करणे इत्यादी सामान्य उद्दिष्टांची पूर्तता करू शकत नाहीत. या क्षेत्रामध्ये बांधकाम मजूर, अनौपचारिक मजूर, लघु उद्योगात काम करणारे कामगार, हातमाग आणि यंत्रमाग कामगार, शिगारेट उद्योगातील कामगार, दुकाने आणि व्यवसायिक आस्थापनातील कामगार, सफाई कामगार, मदतनीस कामगार, आदिवासी कामगार आणि इतर असुरक्षित प्रकारचे कामगार यांचा समावेश होतो. कंत्राटी कामगार हा देखील असंघटीत कामगार क्षेत्राचा एक भाग आहे.

असंघटित कामगार क्षेत्राच्या काही विशिष्ट समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील:

१) असंघटित क्षेत्रातील सर्व कामगारांना किमान संरक्षण आणि कल्याणाची हमी देणाऱ्या कायद्यांचा अभाव.

२) कामगारांना नियमित आणि अधिकृत ओळखपत्र दिले जात नाही. ओळखपत्र असलेल्या कामगारांना कायदेशीर ओळख आणि मान्यता मिळत असते.

३) असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या रोजगाराला कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही त्यामुळे त्यांचे वेगवेगळ्या प्रकारे शोषण केले जाते. मनमानी पद्धतीने बडतर्फ करणे, किमान वेतन नाकारणे, वेतन देण्यास विलंब, वेतनाचे निश्चित दिवस नसणे कामाच्या ठिकाणी जखमी झालेल्या कामगारांना भरपाई न मिळणे, कल्याणकारी सुविधांची अनुपस्थिती इत्यादी.

४) असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायद्यात समाविष्ट नाहीत त्यांना भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन, वैद्यकीय सेवा, बाल संगोपन आणि मातृत्व लाभ या सुविधांचा उपयोग घेण्यापासून वगळण्यात आले आहे. कामगारांना संरक्षण देण्यासाठी राष्ट्रीय कामगार आयोगाने २००२ मध्ये संघटित क्षेत्रातील सर्व कामगारांना किमान संरक्षण आणि कल्याणाची हमी देणाऱ्या एकछत्री कायद्याची शिफारस केली आहे.

२.७ सारांश (SUMMARY)

कामगार संघटनांचा मुख्य हेतू हा कामगारांना उच्च वेतन मिळावे, कामाच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी, हा त्यांचा प्रमुख हेतू असतो. श्रम बाजारातील कामगार संघटना या स्पर्धात्मक विरोधी शक्ती ठरतात. संघटनांना जो लाभ प्राप्त होतो त्याची किंमत मात्र असंघटित कर्मचाऱ्यांना, बेकारांना, करदात्यांना, कंपन्यांच्या मालकांना त्याची किंमत मोजावी लागते. विविध देशांमधील कामगार संघटनांच्या शक्तीचा अभ्यास स्पष्ट करतो की, संघटना असलेल्या या उद्योगांमध्ये वेतन वाढ मोठया प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. तुलनेने त्यांना अधिक लाभ देखील मिळतात, परंतु या सर्वांचा परिणाम रोजगार वाढीवर होतो.

प्रो. डेव्हिडसन यांनी १८९३ मध्ये मांडलेल्या वेतन सौदा सिद्धांतानुसार कामगारांचे वेतन हे दोन्ही पक्षांच्या सौदा शक्तीवर अवलंबून असते. उद्योजक एका विशिष्ट मर्यादेपर्यंत वेतन देऊ पाहतात आणि वेतन निश्चिती करताना उत्पादकता, गुंतवणूक, भांडवल संपदा, कर्जाऊ रकमेचा खर्च इत्यादी बाबी लक्षात घेतात. राहणीमान आणि स्वप्रतिष्ठा, कामाच्या ठिकाणची स्थिती, इतर उद्योगांमधील वेतन या बाबी संघटनेकडून लक्षात घेतल्या जातात. या अपेक्षांच्या आधारे उच्च आणि कमी वेतन पातळी या दोहोंचा मध्य काढून वेतन निर्धारित होत असते, असे या सिद्धांताचे स्पष्टीकरण काही गृहीताच्या आधारे करण्यात आले आहे.

संघटनांचे उत्पादकतेवर परिणाम हे साधारणपणे नकारात्मक आहेत. बहुतांशी उदाहरणांमध्ये उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे आढळून येते. संघटनांचा उत्पादकतेवर सकारात्मक परिणाम हा विशिष्टपणे अशा ठिकाणी अधिक असतो जिथे स्पर्धात्मक दबाव अस्तित्वात असतो आणि अशा प्रकारचे सकारात्मक परिणाम मुख्यत्वे खाजगी नफादायी क्षेत्रापुरते मर्यादित असतात.

कामगार संघटनांचा वेतनावरील परिणामाच्या संदर्भात प्रो. बॅरि यांनी असा निष्कर्ष काढला की, कामगार संघटनांचा उत्पादकता आणि उत्पादकता वृद्धीवर अल्प परिणाम दिसून येतो.

केवळ रोजगार सुरक्षा हीच कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रभाव टाकू शकते असे नसून इतर अनेक घटकही कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम करत असतात. त्याचे स्वरूप सकारात्मक व नकारात्मक असते.

असंघटित क्षेत्रातील कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शासकीय पातळीवरून त्यावर विविध उपाय शोधले जात आहेत. त्याचा सार हा प्रामुख्याने कामगारांना किमान संरक्षण आणि कल्याणाची हमी देणे हा दिसून येतो.

२.८ प्रश्न (QUESTIONS)

१. कामगार संघटनांचे अर्थशास्त्र यावर टीप लिहा.

२. वेतनाचा सौदा सिद्धांत स्पष्ट करा.

३. कामगार संघटनांचा उत्पादकता आणि वेतनावरील परिणामांची चर्चा करा.

४. रोजगार सुरक्षा आणि कार्यक्षमता यावर टीप लिहा.

*****

मॉडयुल २ : औद्योगिक संबंध

३

औद्योगिक संबंध - १

घटक संरचना

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ औद्योगिक संबंधांची व्याख्या

३.३ औद्योगिक संबंधांची व्याप्ती

३.४ औद्योगिक संबंधांचा दृष्टीकोन

    ३.४.१ प्रणाली दृष्टीकोन

    ३.४.२ वर्ग संघर्ष दृष्टीकोन

३.५ सारांश

३.६ प्रश्न

३.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- औद्योगिक संबंधांची व्याख्या आणि व्याप्ती अभ्यासणे.
- औद्योगिक संबंधांच्या विविध दृष्टिकोनांचा अभ्यास करणे.

३.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

व्यापार एकीकरणवाद हा कारखाना व्यवस्थेमुळे आणि भांडवलशाही व्यवस्थेमुळे उदयास आलेला घटक आहे. १८५० च्या दरम्यान रस्ते आणि रेल्वे मार्गांचा विकास तसेच पहिल्या कापूस आणि ताग कारखान्याची स्थापना झाली, तेव्हा खऱ्या अर्थाने भारतात आधुनिक औद्योगिकीकरणाची सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. तथापि, भारतातील कामगार संघटना १९व्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात उदयास आली. १८७५ हे वर्ष भारतातील व्यापार संघटनांच्या चळवळीच्या इतिहासातील एक महत्वाचे वर्ष म्हणून गणले जाते, कारण कारखान्यातील कामगार पहिल्यांदाच त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी एकत्र आले होते आणि चळवळीच्या माध्यमातून न्याय मागत होते.

३.२ औद्योगिक संबंधांची व्याख्या (DEFINITION OF INDUSTRIAL RELATIONS)

डेल योडर यांच्या मते, "औद्योगिक संबंध हे रोजगार संबंधातून निर्माण होणाऱ्या व्यवस्थापक आणि कर्मचारी यांच्यातील संबंधांचे वर्णन करतात आणि या संबंधांचा हेतू हा महत्तम नफा प्राप्त करणे असतो."

आंतरराष्ट्रीय श्रम अभ्यास संस्थेने याची व्याख्या "उत्पादनातील सामाजिक संबंध" अशी केली आहे. मीड आणि मेटकाफ यांनीदेखील औद्योगिक संबंधांची अतिशय आदर्शवादी व्याख्या दिली आहे. मीड आणि मेटकाफ यांच्या मते, "औद्योगिक संबंध हे नियोक्ता आणि कर्मचारी यांच्या एकमेकांबद्दलच्या वृत्ती आणि दृष्टीकोनांचे एकत्रित परिणाम दर्शवितात, ज्यात किमान मानवी प्रयत्न आणि संघर्षांसह एखाद्या संस्थेच्या क्रियाकलापांचे नियोजन, पर्यवेक्षण, दिशा आणि समन्वय तसेच सहकार्याची उत्साही भावना आणि संस्थेच्या सर्व सदस्यांच्या खऱ्या कल्याणासाठी योग्य विचार केला जातो."

प्राध्यापक क्लेग यांच्या मते, औद्योगिक संबंध म्हणजे "नियम बनवण्याच्या आणि बदलण्याच्या पद्धती असून आणि या नियमांची योग्य आणि नियोजित अंमलबजावणी होय." औद्योगिक संबंधांचा सार हा नियोक्ता आणि कामगार यांच्या रोजच्या व्यवहारातून निरीक्षित केला जातो. नियोक्त्याचे प्रतिनिधित्व व्यवस्थापनाद्वारे केले जाते आणि कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व त्यांच्या कामगार संघटनांद्वारे केले जाते, म्हणून याला "व्यवस्थापन-संघ संबंध" असे देखील संबोधतात. राज्य हा औद्योगिक संबंधांमधील सर्वात महत्त्वाचा घटक आहे कारण प्रत्येक राज्य हे औद्योगिक संबंधांच्या चौकटीमध्ये कार्य करत असताना नियमावली तयार करून त्या नियमांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिकोनातून पाऊल उचलते.

३.३ औद्योगिक संबंधांची व्याप्ती (SCOPE OF INDUSTRIAL RELATIONS)

औद्योगिक संबंध मुख्यतः व्यवस्थापक आणि कामगारातील संबंध / मालक व कामगार संबंध यांच्याशी संबंधित आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिकोनातून औद्योगिक संबंध हा घटक खूप महत्वाचा आहे. औद्योगिक संबंधाच्या व्याप्तीमध्ये खालील बाबींचा समावेश होतो:

१. कामगार संबंध म्हणजे, कामगार संघटना व त्यांच्या व्यवस्थापनातील संबंध होय.

२. कामगार-मालक संबंध म्हणजे, व्यवस्थापक आणि मालक व कामगारांचा संबंध होय.

३. समूह संबंध म्हणजे, कामगारांच्या विविध गटांमधील संबंध होय.

४. सार्वजनिक संबंध म्हणजे, उद्योगसंस्था आणि समाज यांच्यातील संबंध होय.

३.४ औद्योगिक संबंधांचा दृष्टीकोन (APPROACHES TO INDUSTRIAL RELATIONS)

औद्योगिक संबंध हा बहु-विषय आणि आंतर-विषय घटक आहे. त्याचे मूळ सामाजिक शास्त्रांमध्ये असल्यामुळे त्याला राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि मानसिक आयाम आहेत. इतिहास, सामाजिक मानववंशशास्त्र, कायदा आणि व्यवस्थापन यासारख्या इतर सामाजिक शास्त्रांशी देखील ते संबंधित आहे. आंतरविद्याशाखीय ज्ञानशाखा म्हणून औद्योगिक संबंध सर्व सामाजिक शास्त्रांमध्ये अभ्यासले जातात आणि यातूनच त्याचा एक स्वतंत्र उपयोजित ज्ञानशाखा म्हणून उदय होतो. "आर्थिक किंवा भौतिक लाभाच्या मोबदल्याच्या अपेक्षेने केलेल्या शारीरिक-मानसिक अशा प्रयत्नांना श्रम म्हणावे", हेच वाक्य श्रम अर्थशास्त्राला चित्रित करते. त्याचप्रमाणे, समाजशास्त्र हा विषय औद्योगिक समाजशास्त्राच्या माध्यमातून कामगारांची सामाजिक पार्श्वभूमी आणि सामायिक मूल्ये, आणि नियमांचा मानवी वर्तनावर होणारा परिणाम स्पष्ट करते. औद्योगिक मानसशास्त्र हा विषय भरती, नियुक्ती, प्रशिक्षण, थकवा, मनोबल इत्यादी बाबी हाताळण्यासाठी मोजमाप साधने आणि संकल्पना विशद करतो. कामगार कायदे, त्यांचे विवेचन तसेच त्या कायद्यातील सुधारणा या सर्व बाबी औद्योगिक न्यायशास्त्र सुधारण्यास मदत करतात. परिमाणात्मक पद्धती आणि सांख्यिकी तंत्रे देश, राज्य किंवा शहरातील औद्योगिक संबंधांची नेमकी स्थिती समजून घेण्यास मदत करतात.

विषयाच्या बहु-अनुशासनात्मक स्वरूपामुळे, अनेक सामाजिक शास्त्रज्ञांनी औद्योगिक संबंधांचे स्पष्टीकरण केले आहे, जे आता औद्योगिक संबंधांचे सिद्धांत किंवा दृष्टिकोन म्हणून ओळखले जाते. औद्योगिक संबंधांचे काही महत्त्वाचे सिद्धांत आणि दृष्टिकोन खाली स्पष्ट केले आहेत.

३.४.१ औद्योगिक संबंधांचा प्रणाली दृष्टीकोन (System Approaches):

जॉन डनलॉप यांनी औद्योगिक संबंधांबाबतच्या प्रणाली दृष्टिकोन मांडला आहे. हा दृष्टिकोन औद्योगिक संबंध प्रक्रियेतील सहभागी, नैसर्गिक शक्ती आणि उत्पादनावर लक्ष केंद्रित करतो. हा सिद्धांत औद्योगिक संबंधांचे विविध पैलू तसेच परस्परसंबंधांच्या कारणांचा अभ्यास करतो. प्रणालीचा दृष्टीकोन आकृती ३.१ मध्ये स्पष्ट केला आहे. प्रणाली दृष्टिकोनाचे मूलभूत घटक खालीलप्रमाणे आहेत:

१. प्रणालीमधील सहभाग:

या प्रणालीमध्ये तीन सहभागी आहेत आणि ते पुढीलप्रमाणे आहेत: कामगार आणि त्यांच्या संस्था, व्यवस्थापन आणि त्यांचे प्रतिनिधी आणि विशेष सरकारी संस्था जसे की कामगार न्यायालये. हे सहभागी सामाजिक आणि आर्थिक चौकटीत एकमेकांचा विचार करतात. त्यांच्या परस्परसंवादामध्ये तीन महत्त्वपूर्ण स्तरांचा समावेश आहे ज्यांना डनलॉपने 'औद्योगिक संबंध प्रणालीची उप-प्रणाली' असे म्हटले आहे.

२. वैचारिक आधार:

उप-प्रणालींमधील संबंध त्यांच्या वैचारिक तत्वांद्वारे नियंत्रित केले जातात. डनलॉपच्या मते, ही विचारधारा सामान्यत: कलाकारांद्वारे धारण केलेल्या कल्पना आणि विश्वासांचा एक संच आहे जी एक अस्तित्व म्हणून एकत्रितपणे प्रणाली तयार करण्यास किंवा एकत्रित करण्यास मदत करते.

३. पर्यावरण किंवा त्या संबंधीचे घटक:

पर्यावरण किंवा त्या संबंधीचे घटक हा एक असा भाग आहे, ज्यामध्ये सहभागी एकमेकांशी संवाद साधतात. डनलॉपने तीन प्रकारचे पर्यावरण सांगितले आहेत जे औद्योगिक संबंधांशी संबंधित आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत: कार्यशाळेची तांत्रिक वैशिष्ट्ये, बाजार किंवा आर्थिक मर्यादा आणि समाजात विद्यमान शक्तीचे स्थान आणि संतुलन. हे तीन प्रकारचे पर्यावरण किंवा घटक उपप्रणाली म्हणून ओळखले जातात. या उपप्रणालींना तांत्रिक उपप्रणाली, आर्थिक उपप्रणाली आणि राजकीय उपप्रणाली असे म्हटले जाऊ शकते.

अ) तांत्रिक उपप्रणाली: औद्योगिक संबंध हे तंत्रज्ञानाच्या निवडीवर आणि उपलब्धतेवर अवलंबून असतात, अशा प्रकारे, श्रम आणि भांडवल केंद्रित तंत्रज्ञानाअंतर्गत औद्योगिक संबंध हे पूर्णपणे भिन्न असतात. तंत्रज्ञानातील बदल हा कामगारांच्या कौशल्यांबद्दल मालकाच्या अपेक्षा सतत वाढवतात. आधुनिक तंत्रांचा स्वीकार केल्याने हाताने उत्पादन प्रक्रिया कमी होते आणि कामगार त्यांच्या कामावर यंत्रांद्वारे अधिक नियंत्रण मिळवून महत्तम उत्पादन मिळवण्यात यशस्वी होतात.

ब) आर्थिक उपप्रणाली: बाजार किंवा आर्थिक मर्यादा देखील औद्योगिक संबंधांवर परिणाम करतात, कारण श्रमाची गरज आणि वस्तूंची मागणी यांचा जवळचा संबंध आहे. स्पर्धा वाढत असताना, उद्योगसंस्थांचे बाजार समभाग अनिश्चित होतात आणि त्यामुळे औद्योगिक संबंधांवर परिणाम होतो.

क) राजकीय उपप्रणाली: सामान्यपणे अर्थव्यवस्थेतील तीन शक्तिशाली आणि सामर्थ्यवान घटक कामगार संघटना, नियोक्ते आणि सरकार यांच्यामुळे कामगार आणि व्यवस्थापन यांच्या संबंधांवर परिणाम होतात. उत्पादन प्रक्रियेच्या सुरुवातीच्या काळात, कामगार आणि नियोक्ते हे त्यांचे हितसंबंध सकारात्मकरित्या पुढे नेण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करतात. त्यामुळे औद्योगिक संबंधांचा नमुना तयार करण्यात सरकारची नियामक भूमिका महत्त्वाचा भाग आहे. जेव्हा पक्ष कमी परिपक्व असतात, शक्ती जागरूक असतात आणि म्हणूनच आक्रमक असतात तेव्हा संघर्ष तीव्रपणे उद्भवतो. थोडक्यात, जेव्हा पक्ष अधिक परिपक्व, जबाबदार आणि सामर्थ्यवान बनतात आणि स्वतःला एकमेकांबरोबर सामावून घेण्यास शिकतात, तेव्हा संघर्ष हा घटक दुर्लक्षित होऊन विकासाच्या दृष्टिकोनातून मार्गक्रमन केले जाते.



आकृती ३.१: डनलॉपचा औद्योगिक संबंधांचा दृष्टीकोन

या उप-प्रणालींमधील खेळाडू प्रतिक्रिया देतात आणि एकमेकांशी संवाद साधतात. त्यांचे हे क्रियाकलाप इतरांवर प्रभाव पडतात आणि तेसुद्धा इतरांच्यामुळे प्रभावित होताना पाहावयास मिळते. त्यांचे परस्परसंवाद विविध प्रकारच्या घटकांच्या प्रभावाखाली आणि विशिष्ट वातावरणात घडतात. उदाहरणार्थ, महागाईसारख्या आर्थिक घटकांचा औद्योगिक संबंधांवर मोठा प्रभाव पडतो. प्रत्येक चलनवाढीची परिस्थिती औद्योगिक अशांततेच्या अनैच्छिक घटनांना कारणीभूत ठरते आणि प्रत्येक मंदीच्या परिस्थितीमुळे सामान्यतः औद्योगिक क्रिया कमी होतात. या संभाव्य विस्कळीत समस्या त्याच्या स्वयंचलित समायोजनासाठी नियम तयार करून हाताळल्या जातात. उदाहरणार्थ, अमेरिकेमध्ये, महागाईची भरपाई सामूहिक सौदेबाजीच्या अधीन आहे. भारतात, महागाई भत्ता ग्राहक किंमत निर्देशांकाशी जोडून त्याच्यावर नियंत्रण केले जाते. भांडवल-केंद्रित उद्योगाच्या तुलनेत कामगार-केंद्रित उद्योगात पुढील औद्योगिक संबंध वेगळे असतात. खेळाडूंची शक्ती केंद्रांशी जवळीक देखील प्रक्रियेवर परिणाम करते. आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक घटक या तिन्ही स्तरांवर कार्य करणाऱ्या घटकांमुळे त्यांच्या संबंधांवर परिणाम होतो तेव्हा ते नियम किंवा कायदे तयार केले जातात.

डनलॉपच्या प्रणाली दृष्टिकोनाच्या मर्यादा:

डनलॉपने प्रेरणा, धारणा आणि दृष्टीकोन आणि नियम बनविणाऱ्या संस्थांवर लक्ष केंद्रित करण्याची प्रवृत्ती आणि संघर्षाचे निराकरण यासारख्या अर्थव्यवस्थेतील बदलांकडे लक्ष दिले नाही. तथापि, डनलॉपचा सिद्धांत औद्योगिक संबंध प्रक्रियेची जटिलता लक्षात घेतो आणि कोणत्याही देशात किंवा कोणत्याही परिस्थितीत वापरण्यासाठी व अनुकूल करण्यासाठी लवचिक आहे. औद्योगिक संबंधांमध्ये नियम हा एकमेव घटक नसून त्यात इतर घटकांचा देखील समावेश असतो आणि ते प्रणालीचे विस्तृत मार्गदर्शक तत्त्वे प्रदान करतात आणि मूलभूत वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यात मदतदेखील करतात. ते प्रणालीच्या आकलनामध्ये धारणा आणि वर्तणूक घटकांचे एकत्रीकरण रोखत नाहीत. त्यामुळे हा सिद्धांत भारतीय औद्योगिक संबंध प्रणालीच्या विश्लेषणासाठी अतिशय उपयुक्त चौकट प्रदान करतो. शेवटी, डनलॉपचा सिद्धांत हा नैसर्गिकरित्या मानकीय नाही, परंतु औद्योगिक संबंधांमध्ये गुंतलेल्या विविध प्रक्रियांची कारणे आणि परिणाम स्पष्ट करण्यासाठी पुरेसा आहे.

३.४.२ औद्योगिक संबंधांसाठी वर्ग संघर्षाचा दृष्टीकोन (Class Conflict Approaches):

कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) च्या मते, कामगार आणि भांडवलदार यांच्यातील औद्योगिक संबंध हे परस्परविरोधी असतात. संबंधांमधील विरोधाभास हा वर्गांच्या विरोधाभासी उद्दिष्टांचा परिणाम असतो. मार्क्सचा असा विश्वास होता की, भांडवलदारांचे उद्दिष्ट जास्तीत जास्त नफा मिळवणे आणि कामगारांचे ध्येय जास्तीत जास्त वेतन वाढवणे असतो. दोन उद्दिष्टांचा ताळमेळ बसू शकत नाही, कारण औद्योगिक संबंध हा एक शून्य बेरीज खेळ आहे, ज्यामध्ये एकाला गमवावे लागते आणि दुसऱ्याला फायदा होतो. अशा प्रकारे, भांडवलदार उत्पादन साधनांचे मालक म्हणून श्रमाच्या आधारावर नफा मिळविण्याचा प्रयत्न करत असतात. भांडवलदारांच्या वर्गाचा नाश करूनच या विरोधाभासी आणि अपवित्र संबंधाचा अंत केला जाऊ शकतो आणि वर्गहीन समाजाची स्थापना केली जाऊ शकते असे कार्ल मार्क्स यांचे मत होते. वर्गविहीन समाजाची स्थापना वर्गसंघर्षातूनच होऊ शकते. कामगार (मजूरवर्ग) आणि भांडवलदार (भांडवलदारवर्ग) यांच्यातील वर्गसंघर्षाचे मुख्य साधन म्हणजे कामगार संघटना होय. आत्म-नाशाची बीजे भांडवलशाहीमध्ये रुजलेली असतात आणि ती तीन महत्त्वाच्या आत्म-विनाशकारी प्रवृत्तींमध्ये प्रकट होतात. याचे कल खालीलप्रमाणे आहेत:

अ) काही मोठ्या भांडवलदारांच्या हातात संपत्ती आणि उत्पन्नाचे केंद्रीकरण:

कामगार वर्ग हे केवळ त्यांची श्रमशक्ती विकू शकतात आणि उदरनिर्वाहाचे वेतन मिळवू शकतात. भांडवलदार वर्ग उत्पादनाच्या साधनांचे मालक असतात आणि अतिरिक्त मूल्य काढून कामगारांचे नेहमीच शोषण करत असतात.

ब) भांडवलदारांमधील स्पर्धेचा परिणाम स्पर्धात्मक तंत्रज्ञान आणि भांडवलाची वाढती सेंद्रिय रचना यामध्ये होतो:

मजुरांना केवळ उदरनिर्वाहाचे वेतन दिले जात असल्याने, वेतनात आणखी कपात होण्याची शक्यता नसते आणि त्यामुळे भांडवलदार वर्गाला आपापसात स्पर्धा करावी लागते. यामुळे श्रमशक्ती कमी होते. श्रमशक्ती हेच अतिरिक्त मूल्य किंवा नफ्याचे एकमेव स्त्रोत असल्याने, श्रमशक्ती कमी झाल्यामुळे एकीकडे अधिशेष मूल्य घसरते आणि दुसरीकडे औद्योगिक राखीव सैन्यात वाढ होते. वाढत्या बेरोजगारीमुळे आणि वाढत्या भांडवलदारांच्या वाढत्या वर्गामुळे वाढत्या उत्पादनामुळे भांडवलदारांचा वर्ग आणखी कमकुवत होतो, अशा प्रकारे भांडवलदार वर्गाच्या विनाशाची बीजे पेरली जातात.

क) सहकारी भांडवलदारांचे स्पर्धात्मक विलोपन:

स्पर्धा सहकारी भांडवलदारांना संपवते आणि ज्यांना काढून टाकले जाते, ते औद्योगिक राखीव सैन्याच्या श्रेणीत सामील होतात आणि कामगार त्यांच्या दुर्दशेचे कारण ओळखून, समाजवादाचा मार्ग तयार करण्यासाठी भांडवलशाही व्यवस्थेला उलथून टाकण्यासाठी एकत्र येतात.

मार्क्सचा असा विश्वास होता की, औद्योगिक भांडवलशाहीने व्यापार एकत्रीकरणवादाला जन्म दिला, कारण जगाच्या आर्थिक इतिहासात प्रथमच, कामगार नावाचा चेहरा नसलेला एक वर्ग कारखान्यांमध्ये एकत्र काम करत होता, कामाची परिस्थिती अमानवीय होती, वेतन अनेकदा निर्वाह दरापेक्षा कमी दिले जात होते आणि कामगार एक वर्ग म्हणून कामाच्या प्रक्रियेपासून, कामाच्या उत्पादनापासून आणि समाजापासून पूर्णपणे अलिप्त होते. त्यामुळे कामगार हा भांडवलदार वर्गाविरुद्ध संघटित होऊ लागला किंवा व्यापक संघटना बनवू लागला. मार्क्सचा असा विश्वास होता की, कामगार संघटनांनी त्यांचे कार्य मजुरी आणि कामाची परिस्थिती सुधारण्यापुरते मर्यादित करू नये. त्यांनी आपल्या संघटित शक्तीचा वापर कामगारांना मुक्त करण्यासाठी आणि भांडवलशाही व्यवस्था नष्ट करण्यासाठी केला पाहिजे. स्वत:मध्ये एक वर्ग बनण्यापासून स्वत:साठी वर्ग बनण्यासाठी, कामगारांना त्यांचे आर्थिक संबंध बदलणे आवश्यक आहे आणि हे केवळ राजकीय संघर्षातूनच शक्य आहे. त्यांनी जगातील कामगारांना एकत्र येऊन भांडवलशाही व्यवस्थेला क्रांतीच्या माध्यमातून उलथून टाकण्याचे आवाहन केले. त्यांचा असा विश्वास होता की, समाजवाद प्रस्थापित करण्याच्या या लढ्यात कामगार वर्ग यशस्वी होईल ज्यामध्ये उत्पादनाची साधने राज्याच्या मालकीची असतील आणि राज्याचे प्रतिनिधित्व केवळ कामगार वर्ग नावाच्या एका वर्गाद्वारे केले जाईल, कारण कामगार वर्गाशिवाय दुसरा कोणताही वर्ग नाही.

भांडवलदार आणि कामगार संघटनांचे प्रतिनिधित्व करणारे कामगार यांच्यातील संघर्ष भांडवलशाही व्यवस्थेत अंतर्भूत आहेत. मार्क्सच्या मते, औद्योगिक भांडवलशाही किंवा कारखाना व्यवस्थेच्या काळात उदयास आलेल्या कामगार-वर्गाच्या संघर्षाचा व्यापार एकत्रीकरणवाद हा केवळ एक प्रकार आहे. कामगार संघटनांना समाजाच्या क्रांतिकारी परिवर्तनाच्या मार्गावर समाजवादाकडे नेण्याची गरज आहे, असे त्यांचे मत होते.

३.५ सारांश (SUMMARY)

१. औद्योगिक संबंधांमध्ये खालील बाबींचा समावेश होतो:

अ. कामगार संबंध म्हणजे, कामगार संघटना व त्यांच्या व्यवस्थापनातील संबंध होय.

ब. कामगार-मालक संबंध म्हणजे, व्यवस्थापक आणि मालक व कामगारांचा संबंध होय.

क. समूह संबंध म्हणजे, कामगारांच्या विविध गटांमधील संबंध होय.

ड. सार्वजनिक संबंध म्हणजे, उद्योगसंस्था आणि समाज यांच्यातील संबंध होय.

२. औद्योगिक संबंधांसाठी प्रणालीचा दृष्टीकोन जॉन डनलॉप यांनी मांडला आहे. हे औद्योगिक संबंध प्रक्रियेतील सहभागी, पर्यावरणीय शक्ती आणि उत्पादनावर लक्ष केंद्रित करते आणि औद्योगिक संबंधांच्या विविध पैलूंमधील या परस्पर संबंधांच्या कारणांचा अभ्यास करते.

३. कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) च्या मते, कामगार आणि भांडवलदार यांच्यातील औद्योगिक संबंध हे परस्परविरोधी असतात. संबंधांमधील विरोधाभास हा वर्गांच्या विरोधाभासी उद्दिष्टांचा परिणाम असतो. मार्क्सचा असा विश्वास होता की,

भांडवलदारांचे उद्दिष्ट जास्तीत जास्त नफा मिळवणे आणि कामगारांचे ध्येय जास्तीत जास्त वेतन वाढवणे असतो. दोन उद्दिष्टांचा ताळमेळ बसू शकत नाही, कारण औद्योगिक संबंध हा एक बेरीज रकमेचा खेळ आहे, ज्यामध्ये एकाला गमवावे लागते आणि दुसऱ्याला फायदा होतो.

४. व्यापार एकीकरणवाद हा कारखाना व्यवस्थेमुळे आणि भांडवलशाही व्यवस्थेमुळे उदयास आलेला घटक आहे. १८५० च्या दरम्यान रस्ते आणि रेल्वे मार्गांचा विकास तसेच पहिल्या कापूस आणि ताग कारखान्याची स्थापना झाली, तेव्हा खऱ्या अर्थाने भारतात आधुनिक औद्योगिकीकरणाची सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. तथापि, भारतातील कामगार संघटना १९व्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात उदयास आली. १८७५ हे वर्ष भारतातील व्यापार संघटनांच्या चळवळीच्या इतिहासातील एक महत्वाचे वर्ष म्हणून गणले जाते, कारण कारखान्यातील कामगार पहिल्यांदाच त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी एकत्र आले होते आणि चळवळीच्या माध्यमातून न्याय मागत होते.

५. भारतीय श्रम बाजार संघटित आणि असंघटित क्षेत्रात विभागलेला आहे. श्रमिक बाजाराचे संघटित क्षेत्र खूपच लहान आहे आणि टक्केवारीच्या दृष्टीने देशातील एकूण रोजगाराच्या सुमारे ७% आहे. उत्पादन, वीज, वाहतूक आणि वित्तीय सेवा मोठ्या प्रमाणावर संघटित क्षेत्रात आहेत. असंघटित क्षेत्रात, शेती व्यतिरिक्त, असंघटित क्षेत्रातील इतर उद्योग खाणकाम, उत्पादन, बांधकाम, व्यापार, वाहतूक आणि समुदाय, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा आहेत.

६. औद्योगिक समस्यांचे समाजशास्त्रीय मूळ समाजशास्त्रीय घटक जसे की, मूल्य प्रणाली, रीतिरिवाज, निकष, चिन्हे, वृत्ती आणि श्रम आणि व्यवस्थापन या दोघांची धारणा आणि औद्योगिक संबंधांवर विविध मार्गांनी परिणाम करणारे घटक शोधले जाऊ शकतात. हे घटक कामगारांची वर्तणूक ठरवतात. औद्योगिकीकरणाचे सामाजिक परिणाम जसे की, संघटना, सामाजिक गतिशीलता, स्थलांतरामुळे अनेक सामाजिक दुष्कृत्ये निर्माण होतात जसे, कौटुंबिक विघटन, तणाव आणि ताण, अपराध, वैयक्तिक आणि सामाजिक अव्यवस्था कामगारांच्या कार्यक्षमतेवर आणि उत्पादकतेवर परिणाम करतात, ज्यामुळे उद्योगाच्या औद्योगिक संबंध प्रणालीवर परिणाम होतो.

३.६ प्रश्न (QUESTIONS)

१. औद्योगिक संबंधांच्या प्रणालीच्या दृष्टिकोनाची चर्चा करा.

२. औद्योगिक संबंधांच्या वर्ग संघर्षाच्या दृष्टिकोनाचे विश्लेषण करा.

३. भारतातील संघटित आणि असंघटित कामगारांच्या समस्यांची तुलना आणि त्याचा विरोधाभास विशद करा.

४. श्रम बाजाराच्या समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचे विश्लेषण करा.

*****

४

औद्योगिक संबंध - २

घटक संरचना

४.० उद्दिष्टे

४.१ टेलरवाद

४.२ फोर्डिझम

४.३ पोस्ट-फॉर्डिझम

४.४ नव-फॉर्डिझम

४.५ बहुलवाद

४.६ मानवी संबंध स्कूल आणि संस्थात्मक वर्तन दृष्टीकोन

४.७ सारांश

४.८ प्रश्न

४.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- टेलरवादाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.
- फोर्डिझम, पोस्ट-फॉर्डिझम आणि नव-फॉर्डिझमच्या संकल्पनांचा अभ्यास करणे.
- मानवी संबंधांचे स्कूल आणि संस्थात्मक वर्तन दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

४.१ टेलरवाद (TAYLORISM)

वैज्ञानिक व्यवस्थापन किंवा टेलरवाद हा व्यवस्थापनाचा एक सिद्धांत आहे, जो कार्यप्रवाहांचे विश्लेषण आणि संश्लेषण करतो. या सिद्धांताचे मुख्य उद्दिष्ट आर्थिक कार्यक्षमता, विशेषतः कामगार उत्पादकता सुधारणे हे आहे. हा प्रक्रियांच्या अभियांत्रिकी आणि व्यवस्थापनासाठी विज्ञान लागू करण्याचा हा सर्वात पहिला प्रयत्न होता. १८८० आणि १८९० च्या दशकात फ्रेडरिक विन्स्लो टेलरने उत्पादन उद्योगांमध्ये या प्रक्रियांचा विकास सुरू केला. १९१० च्या दशकात त्याच्या परिणामाची सर्वोत्तम कामगिरी अनुभवली गेली. १९२० च्या दशकापर्यंत, ते प्रभावशाली होते, परंतु त्यानंतर विरोधी किंवा पूरक कल्पनांसह स्पर्धा आणि समन्वयाचे युग सुरू झाले. १९३० च्या दशकात एक वेगळा सिद्धांत किंवा विचारांचे स्कूल म्हणून वैज्ञानिक व्यवस्थापन कालबाह्य झाले असले तरी, त्यातील बहुतेक केंद्रविषय आजही औद्योगिक अभियांत्रिकी आणि व्यवस्थापनाचे महत्त्वपूर्ण भाग आहेत. यामध्ये विश्लेषण, संश्लेषण, तर्कशास्त्र, तर्कसंगतता, अनुभववाद, कार्य नैतिकता, कार्यक्षमता आणि कचरा निर्मूलन, सर्वोत्तम पद्धतींचे मानकीकरण, केवळ स्वतःच्या फायद्यासाठी किंवा विशिष्ट कौशल्य असलेल्या विशिष्ट कामगारांच्या सामाजिक स्थितीचे रक्षण करण्यासाठी परंपरेबद्दल तिरस्कार, हस्तकला उत्पादनाचे मोठ्या प्रमाणात

उत्पादनात रूपांतर, आणि कामगार आणि कामगारांमधील ज्ञान हस्तांतरण साधने, प्रक्रिया आणि दस्तऐवजीकरण यांचा समावेश होतो.

वैज्ञानिक व्यवस्थापनाच्या मूळ कल्पना टेलरने १८८० आणि १८९० च्या दशकात विकसित केल्या होत्या आणि प्रथम त्याची मोनोग्राफ ए पीस रेट सिस्टम (१८९५), शॉप मॅनेजमेंट (१९०३) आणि वैज्ञानिक व्यवस्थापनाची तत्त्वे (१९११) मध्ये प्रकाशित झाली होती. मिडवेल स्टीलमध्ये, चक्रयंत्र चालक आणि समादेशक म्हणून काम करत असताना, टेलरने कामगारांमधील उत्पादकतेतील नैसर्गिक फरक लक्षात घेतला, जे प्रतिभा, बुद्धिमत्ता किंवा प्रेरणा यातील फरकांसह विविध कारणांमुळे प्रेरित झाले होते. या अनुप्रयुक्तिवर विज्ञान लागू करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पहिल्या लोकांपैकी ते एक होते, म्हणजे हे फरक का? आणि कसे अस्तित्वात आहेत? आणि सर्वोत्तम पद्धतींचे विश्लेषण आणि संश्लेषण कसे केले जाऊ शकते? हे समजून घेऊन, नंतर प्रक्रियेच्या चरणांच्या मानकीकरणाद्वारे इतर कामगारांना प्रसारित केले. त्यांचा असा विश्वास होता की, परंपरा आणि अंगठ्याच्या नियमांवर आधारित निर्णय घेण्याऐवजी हे निर्णय अभ्यासपूर्वक घेतले पाहिजेत म्हणजे भविष्यात अचूकता प्राप्त करणे सोपे जाईल, यामध्ये वेळ आणि गती अभ्यास, कोणताही "एक सर्वोत्तम मार्ग" शोधण्याचा किंवा संश्लेषित करण्याचा कल समाविष्ट असतो. या सर्वांचे एकच उद्दिष्ट होते आणि ते म्हणजे कमीतकमी प्रयत्नांमध्ये उत्पादकता महत्तम करणे हे होय.

व्यवस्थापन साहित्यात, "वैज्ञानिक व्यवस्थापन" या शब्दाचा सर्वात जास्त वापर टेलर आणि त्याच्या विद्यार्थ्यांच्या कार्याच्या संदर्भात आहे ("शास्त्रीय", ज्याचा अर्थ "यापुढे चालू नाही, परंतु तरीही त्याच्या मूलभूत मूल्यांचा आदर असतो") नवीन बदलांच्या विरूद्ध, कार्यक्षमता शोधण्याच्या पद्धतींच्या सुधारित आवृत्त्या खूप महत्वाच्या आहेत कारण यामुळेच भविष्यातील विकासाच्या दिशा ठरतात. राजकीय आणि समाजशास्त्रीय दृष्टीने, टेलरिझमची विचारसरणी ही कामगार विभागणीच्या तार्किक टोकाकडे ढकलली जाते, परिणामी कामगारांचे कौशल्य कमी होते आणि कामगार आणि कामाच्या ठिकाणी अमानवीकरण होते. फोर्डिझम सोबत टेलरिझमचा उल्लेख अनेकदा केला जातो, कारण ते दोघेही कारखान्यांमधील मोठ्या प्रमाणात उत्पादन पद्धतींचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ होते. अलीकडच्या काळात, कामाच्या मिळकतीचे देय महत्तमिकरण हे उद्योगात सर्वव्यापी महत्वाचे आहे कारण, याशिवाय महत्तम उत्पादनदेखील शक्य होणार नाही.

वैज्ञानिक व्यवस्थापन हे व्यवस्थापन आणि प्रक्रिया सुधारणेला वैज्ञानिक समस्या म्हणून पद्धतशीरपणे हाताळण्याचा हा पहिला प्रयत्न होता. इतर संकल्पनांच्या बरोबरीने आजही उपयुक्त ठरणारी संकल्पना "बॉटम-अप" ही या ठिकाणी स्वीकारली जाणारी कदाचित पहिलीच संकल्पना होती.

या प्राथमिकतेचे दोन परिणाम म्हणजे

(१) वैज्ञानिक व्यवस्थापन प्रसिद्ध झाले आणि

(२) ही केवळ दीर्घ-विकसनशील विचारसरणीची पहिली आवृत्ती होती आणि त्यानंतर अनेक आवृत्त्या आल्या.

तथापि, वेगवेगळे सामान्य घटक यांना एकत्र आणतात. सांख्यिकीय पद्धतींच्या प्रगतीमुळे, गुणवत्ता आश्वासन आणि गुणवत्ता नियंत्रण १९२० आणि १९३० च्या दशकात सुरू होऊ शकले. १९४० आणि १९५० च्या दरम्यान, वैज्ञानिक व्यवस्थापन करण्यासाठी ज्ञानाचा मुख्य भाग प्रक्रियात्मक व्यवस्थापन, प्रक्रियात्मक संशोधन आणि व्यवस्थापन संवहनशास्त्रामध्ये विकसित झाला. १९८० च्या दशकात एकूण गुणवत्ता व्यवस्थापन मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय झाले आणि १९९० च्या दशकात "पुन्हा अभियांत्रिकी" हे एका साध्या शब्दापासून गूढतेपर्यंत गेले. (एक प्रकारची उत्क्रांती जी दुर्दैवाने, बँडवॅगन म्हणजे काय हे समजून न घेता बँडवॅगनवर उडी मारण्यासाठी वाईट व्यवस्थापकांना आकर्षित करते). आजच्या सहा सिग्मा आणि निकृष्ट वस्तुनिर्माणाला नवीन प्रकारचे वैज्ञानिक व्यवस्थापन म्हणून पाहिले जाऊ शकते, त्याच्या उत्क्रांतीचे मुळ इतके मोठे आहे की, त्याची तुलना भ्रामक वाटू शकते. विशेषतः, टोयोटा उत्पादन प्रणालीच्या प्रवर्तकांपैकी एक शिगेओ शिंगोचा असा विश्वास होता की, ही प्रणाली आणि सर्वसाधारण जपानी व्यवस्थापन संस्कृती यांच्याकडे एक प्रकारचे "वैज्ञानिक व्यवस्थापन" म्हणून पाहिले पाहिजे.

पीटर ड्रकरने फ्रेडरिक टेलरला ज्ञान व्यवस्थापनाचा निर्माता म्हणून संबोधले, कारण वैज्ञानिक व्यवस्थापनाचे उद्दिष्ट कामाच्या प्रक्रियेत सुधारणा कशी करावी याबद्दलचे ज्ञान निर्माण करणे हे होते. वैज्ञानिक व्यवस्थापनाचा विशिष्ट उपयोग उत्पादन निर्मितीचा असला तरी, टेलरने स्वत: सर्व प्रकारच्या कामांसाठी वैज्ञानिक व्यवस्थापनाचा स्वीकार आणि अंमल केले, यामध्ये विद्यापीठे आणि सरकारचे व्यवस्थापन समाविष्ट आहेत. उदाहरणार्थ, टेलरचा असा विश्वास होता की, वैज्ञानिक व्यवस्थापन "आपल्या विक्रेत्याच्या मAमहत्तम नफ्यासाठी" वाढवले जाऊ शकते. टेलरच्या मृत्यूच्या काही काळानंतर, त्याचा अनुयायी हार्लो एस. या व्यक्तीने सामुदायिक प्रेक्षकांना "विक्री अभियांत्रिकी" साठी टेलोरिझम वापरण्याच्या शक्यतेवर व्याख्यान देण्यास सुरुवात केली. सामुदायिक विपणनाच्या इतिहासातील हा एक डोळे दिपवणारा घटनाक्रम होता.

सामान्यपणे, आजचे सैन्य हे वैज्ञानिक व्यवस्थापनाची सर्व प्रमुख उद्दिष्टे आणि युक्त्या स्वीकारतात आणि वापरतात. मुख्य घटक मुद्द्यांपैकी, वाढीव उत्पादनासाठी वेतन प्रोत्साहन वगळता सर्व आधुनिक लष्करी संघटना वैज्ञानिक व्यवस्थापनाचे शस्त्र वापरतात. वेतन प्रोत्साहन हे नाममात्र कौशल्य बोनसच्या रूपात दिसून येते. खेळांमध्ये वैज्ञानिक व्यवस्थापनाचा महत्त्वाचा प्रभाव आहे, जेथे थांबे घड्याळे आणि गती अभ्यास दिवसावर राज्य करतात. (टेलरने स्वतः खेळांचा, विशेषत: टेनिस आणि गोल्फचा आनंद लुटला. त्याने आणि एका जोडीदाराने दुहेरी टेनिसमध्ये राष्ट्रीय विजेतेपद जिंकले. त्याने अत्याधुनिक टेनिस रॅकेट आणि अत्याधुनिक गोल्फ क्लब शोधून काढले, जरी इतर खेळाडूंना त्याच्या अपारंपरिक रचनांबद्दल त्याला डिवचले आणि चिडवले तरी त्याने त्यावर प्रतिसाद देणे महत्वाचे समजले नाही.)

वैज्ञानिक व्यवस्थापन आणि यांत्रिकीकरण, स्वयंचलन आणि अपतटशी त्याचा संबंध:

वैज्ञानिक व्यवस्थापन अशा युगात विकसित झाले जेव्हा यांत्रिकीकरण आणि स्वयंचलन त्यांच्या विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात होते. या वस्तुस्थितीतुन दोन महत्त्वाच्या निष्कर्ष निघतात:

(१) वैज्ञानिक व्यवस्थापनाच्या कल्पना आणि पद्धती या अमेरिकन उत्पादन प्रणालीमध्ये हस्तकलेच्या कामापासून यांत्रिकीकरणापर्यंत आणि स्वयंचलनापर्यंत (मनुष्य केवळ संभाव्य मध्यस्थ म्हणून) परिवर्तनाचा विस्तार करण्यासाठी नेमके काय समाविष्ट करणे आवश्यक होते?; पण,

(२) टेलरला स्वतः हे माहित नव्हते आणि त्याच्या उद्दिष्टांमध्ये उत्पादन प्रक्रियेतून मानवी भांडवलाला मोठ्या प्रमाणावर टाळणे हे समाविष्ट नव्हते. त्याच्या हयातीत, ही कल्पना विज्ञान कल्पनेसारखी वाटली असती, कारण अशा जगाचा तांत्रिक पूल अद्याप प्रशंसनीय दिसत नव्हता, परंतु बहुतेक लोकांनी असे घडू शकते, याचा विचारही केला नव्हता.

शिल्प उत्पादन (कुशल कामगारांच्या मदतीने) आणि संपूर्ण स्वयंचलन यांच्यामध्ये, काळजीपूर्वक रेखांकन केलेल्या अल्गोरिदमिक कार्यप्रवाहामध्ये, अर्धकुशल आणि अकुशल कामगारांच्या मदतीने विकसित यांत्रिकीकरण आणि आंशिक स्वयंचलन मिश्रित अभियांत्रिक प्रणाली यांचे हे नैसर्गिक मध्यम मार्ग आहेत. अशी प्रणाली तयार करण्यासाठी आणि त्याचा विकास साध्य करण्यासाठी ज्ञानाची देवाणघेवाण होणे आवश्यक आहे, जे सुरुवातीला सोपे वाटू शकते, परंतु हे यशस्वी होण्यासाठी भरीव अभियांत्रिकीची आवश्यकता भासू शकते. जरी टेलरची वैज्ञानिक व्यवस्थापनाची मूळ प्रेरणा केवळ निकृष्ट कामाच्या पद्धती या अधिक चांगल्या पद्धतींमध्ये बदलणे ही होती, परंतु त्याच प्रक्रिया अभियांत्रिकी ज्याचा त्याने पुरस्कार केला ती उपकरणे आणि प्रक्रियांमध्ये कौशल्य निर्माण करण्याकडे त्याचा जास्त कल होता, ज्यामुळे कामगारांमधील कौशल्याची गरज कमी होते. हे अभियांत्रिकी केवळ वैज्ञानिक व्यवस्थापनाचेच नाही तर त्यानंतरच्या बहुतेक औद्योगिक अभियांत्रिकीचे सार होते तसेच हे अपतटचे सार देखील आहे. या सर्व प्रकरणांमध्ये सामान्य विषयसूत्र असे आहे की, व्यावसायिक त्यांच्या मोठ्या प्रमाणात कुशल कामगारांच्या गरजेतून आणि त्यांना टिकवून ठेवण्यासाठी महत्तम वेतन अदा करून यातून मार्ग काढतात.

बाजार अर्थव्यवस्थेतील कामगार संबंधांवर वैज्ञानिक व्यवस्थापनाचे परिणाम:

कामगारांबद्दल टेलरचा दृष्टिकोन अतिशय गुंतागुंतीचा होता. जो कोणी कामगारांच्या मोठ्या संघाचे व्यवस्थापन करतो, तो अनुभवावरून सांगू शकतो की, टेलरचा दृष्टिकोन आणि विचारसरणी हे दोन्ही योग्य होते. काही कामगार प्रतिभा किंवा बुद्धिमत्तेवर अवलंबून राहू शकत नाहीत. आजही उद्योगसंस्थाना असे वाटते की, प्रतिभा ही दुर्मिळ संसाधन आहे. परंतु ज्यांच्याकडे प्रतिभा किंवा बुद्धिमत्ता आहे अशा कामगारांसाठी तो त्याच्या प्रणालीमध्ये जागा निर्माण करण्यात अयशस्वी ठरला, असे म्हणावे लागेल. त्यापैकी काही सुरुवातीच्या टप्प्यात (अभ्यास आणि मसलती) योग्यरित्या वापरल्या जातील, परंतु नंतरच्या काही वर्षांमध्ये चलाख कामगारांचे काय जे ड्रोनच्या श्रेणीतून बाहेर पडतील? जीविकेच्या प्रगतीसाठी किंवा सामाजिक आर्थिक प्रगतीसाठी त्यांना कोणत्या संधी असतील? ड्रोन-इश कामगारांच्या भवितव्याचा योग्य विचार करण्यातही टेलर अयशस्वी ठरला. कदाचित त्यांच्याकडे उच्च-स्तरीय नोकऱ्यांसाठी क्षमता कमी असेल, परंतु त्यांना त्यांच्या विद्यमान भूमिकांमध्ये समाधानी ठेवण्याबद्दल काय?

टेलरवादाने त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या दिशेने काही पावले उचलली (उदाहरणार्थ, टेलरने वारंवार विश्रांती आणि चांगल्या पगाराला कायम पाठिंबा दिला), परंतु तरीही टेलरने कमी हुशार कामगारांबद्दल शिष्ट दृष्टिकोन बाळगला, ज्यांची तो कधीकधी मसुदा प्राण्यांशी तुलना करतो आणि कदाचित टेलर त्याच्या समोरच्या विशाल कार्यात (जगाला समजून घेण्यास आणि वैज्ञानिक व्यवस्थापनाच्या सुरुवातीच्या टप्प्यांची अंमलबजावणी करण्यात) इतका मग्न झाला होता की, पुढील पायऱ्यांबद्दल (सुरुवातीच्या टप्प्यांनंतर प्रणालीचा टिकाऊपणा) धोरणे आखण्यात तो अयशस्वी ठरला.

१९३० च्या दशकात मानवी संबंध व्यवस्थापन विद्यालय विकसित झाले. हॅरी ब्रेव्हरमन सारख्या काही विद्वानांनी असा आग्रह धरला की, मानवी संबंधांनी टेलरवादाची जागा घेतली नसून दोन्हीही दृष्टिकोन एकमेकांना पूरक आहेत. टेलरवाद हे उद्योगसंस्थांच्या कामाच्या प्रक्रियेची वास्तविक दर्शिवते आणि मानवी संबंध कामगारांना नवीन प्रक्रियेशी जुळवून घेण्यास मदत करतात. आजच्या कार्यक्षमता दर्शवण्याच्या पद्धती, जसे की निकृष्ट वस्तुनिर्मिती, कामगारांबद्दलचा आदर आणि सिद्धांताचा अंगभूत भाग म्हणून त्यांच्या गरजा पूर्ण करणे समाविष्ट आहे. (व्यावसायिक जगामध्ये कामाच्या दिवसात काम करणाऱ्या कामगारांना या पद्धतींच्या सदोष अंमलबजावणीचा सामना करावा लागतो ज्यामुळे नोकऱ्या अप्रिय होतात; परंतु या अंमलबजावणीमध्ये सामान्यतः अंमलबजावणीच्या सिद्धांताशी जुळवून घेण्यात व्यवस्थापकीय सक्षमता नसते.) स्पष्टपणे सांगायचे झाल्यास, टेलरच्या विचारप्रणालीपासूनच्या काळापासून एक समक्रमण निर्माण झाले आहे, जरी त्याची अंमलबजावणी झाली आहे तरी आणि हे असमान मोजमाप आहे, कारण सक्षम हातात दुबळे व्यवस्थापन केल्याने व्यवस्थापक आणि कामगार दोघांसाठी चांगले परिणाम झाले आहेत, परंतु अक्षम हातांनी उद्योगांचे नुकसान केले आहे.

वैज्ञानिक व्यवस्थापनाची अंमलबजावणी सहसा अनेक अंतर्निहित आव्हानांमुळे अयशस्वी ठरते, ती आव्हाने खालीलप्रमाणे सांगता येतील:

१. प्रत्येक व्यक्ती एकमेकांपासून भिन्न स्वरूपाची असते: एका व्यक्तीसाठी काम करण्याचा सर्वात कार्यक्षम मार्ग हा दुसऱ्या व्यक्तीसाठी अकार्यक्षम असू शकतो.

२. कामगार आणि व्यवस्थापन यांचे आर्थिक हितसंबंध क्वचितच एकसारखे असतात त्यामुळे मोजमाप प्रक्रिया आणि टेलरच्या पद्धतींनुसार आवश्यक असणारे पुन: प्रशिक्षण दोन्हीचा कामगारांकडून वारंवार विरोध होतो आणि काहीवेळा कर्मचाऱ्यांकडून तोडफोडदेखील केली जाते.

टेलरने स्वतः ही आव्हाने ओळखली होती आणि त्या आव्हानांना तोंड देण्यासाठी काही चांगल्या कल्पना स्वीकारल्या होत्या. तरीसुद्धा, त्याच्या स्वतःच्या प्रणालीची अंमलबजावणी (उदा., वॉटरटाउन आर्सेनल, लिंक-बेल्ट कॉर्पोरेशन, मिडव्हेल आणि बेथलेहेम) खरोखर फारशी यशस्वी नव्हती. नंतर टेलरचे अनुसरण करणाऱ्या अनेक व्यवस्थापकांनी अंमलबजावणीची काही आणखी वाईट कामे केली. सामान्यतः, ते कमी विश्लेषणात्मक प्रतिभाशाली व्यवस्थापक होते, ज्यांनी उत्पादनाच्या प्रति नग खर्चात कपात करण्यासाठी नवीनतम खूळ म्हणून वैज्ञानिक व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित केले होते. आजही वाईट व्यवस्थापकांप्रमाणे ते मोठ्या शब्दांचा अर्थ काय आहे हे समजून न घेता ते

वापरतात. टेलरला माहित होते की, जोपर्यंत कामगारांचा नफा वाढत नाही तोपर्यंत वैज्ञानिक व्यवस्थापन योग्य प्रकारे कार्य करू शकत नाही. टेलरने मालक/व्यवस्थापकाचा नफा आणि कामगारांचा नफा या दुहेरी वाढ निर्माण करण्यासाठी एक पद्धत विकसित केली होती, कारण, या पद्धतीमध्ये योग्यरित्या कार्य करण्यासाठी या दोन्ही परिणामांचे अवलंबत्व होते. परंतु अनेक मालक आणि व्यवस्थापकांनी या पद्धतींवर आशा प्रकारे कब्जा केला की, नफा केवळ किंवा बहुतेक स्वतःसाठी राखून ठेवला जाऊ शकतो आणि प्रणाली केवळ अधिकाराच्या जोरावर अनिश्चित काळ टिकू शकते. कामगार हे शेवटी मानव असतात: त्यांच्या वैयक्तिक गरजा पूर्ण करणे अत्यंत आवश्यक असते, आणि ते त्यांच्या नोकऱ्यात इतके गुंतलेले असतात की, त्यांना आराम करायला वेळ नसतो आणि ही नोकरी इतकी अवघड असते की त्यांना नवनिर्मितीची संधी देखील नसते, तेव्हा त्यांना खूप वास्तविक अडचणी येतात.

४.२ फोर्डिझम (FORDISM)

फोर्डिझम म्हणजे १९४० ते १९६० च्या दशकात उच्च विकसित अर्थव्यवस्थांच्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोगाची प्रणाली होय. फोर्डिझम म्हणजे शाश्वत आर्थिक वृद्धीसाठी मोठ्या प्रमाणात उत्पादनाबरोबर मोठ्या प्रमाणात उपभोग करणे होय. १९७० ते १९९० हा काळ मंद वाढीचा आणि वाढत्या उत्पन्न असमानतेचा काळ होता. या कालावधीत, उत्पादन आणि उपभोगाच्या संघटनेच्या प्रणालीमध्ये दुसरे परिवर्तन झाले आहे. या नवीन प्रणालीला "लवचिक उत्पादन प्रणाली" (एफ एस पी) किंवा "जपानी व्यवस्थापन प्रणाली" असे संबोधले जाते. उत्पादनाच्या बाजूने विचार केला तर, एफ एस पी चे वैशिष्ट्य माहितीच्या खर्चात आणि वरकड खर्चामधील नाट्यमय घट, एकूण गुणवत्ता व्यवस्थापन (टी क्यू एम), वेळेवर वस्तुसूची नियंत्रण, आणि नेतृत्वहीन कार्य गट आणि उपभोगाच्या बाजूने विचार केल्यास, ग्राहकोपयोगी वस्तूंच्या बाजाराच्या जागतिकीकरणाद्वारे, गतिशील उत्पादन जीवन चक्र, आणि त्याहून अधिक उत्पादन/बाजाराचे विभाजन आणि भिन्नता इत्यादी घटकांचा यात समावेश होतो.

हेन्री फोर्ड हे एकेकाळी शेतीपासून औद्योगिक, मोठ्या प्रमाणावर उत्पादन, मोठ्या प्रमाणावर उपभोगाच्या अर्थव्यवस्थेतील परिवर्तनाचे लोकप्रिय प्रतीक होते. यातील पहिले परिवर्तन हस्तकला उत्पादनापासून मोठ्या प्रमाणावर उत्पादन हे होते. यामुळे प्रमाण आणि व्याप्तीच्या अर्थव्यवस्थेवर आधारित बाजारपेठ तयार करण्यात मदत झाली आणि कार्यात्मक विशेषीकरण आणि श्रम विभागणी यांच्या आधारे बनलेल्या विशाल संस्थांचा जन्म झाला. स्थिर खर्चाचा प्रसार करून, विशेषत: यंत्रसंच आणि उपकरणे आणि उत्पादन विभाजनाची संघटना, उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक, ज्यामुळे प्रति नग खर्च कमी होतो, याद्वारे मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्था तयार केली जाऊ शकते. श्रम विभागणीचे शोषण करून व्याप्तीच्या अर्थव्यवस्थेची निर्मिती केली गेली अनुक्रमे विशेष कार्यात्मक घटक, विशेषत: वरकड खर्च जसे की, वृत्तांतलेखन, पुस्तपालन, कर्मचारी, खरेदी किंवा गुणवत्ता हमी, विविध मार्गांनी एकत्र करून एका वस्तूचे उत्पादन करण्यापेक्षा विविध वस्तूंचे उत्पादन करणे हे एका विशेष बाजारापेक्षा कमी खर्चिक होते आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारे होते. बाजारातील अपयश कमी करण्यासाठी आणि आधुनिक

औद्योगिक व्यवस्था आणि पद्धतींमध्ये सुधारणा करण्याच्या हेतूने विविध सार्वजनिक धोरणे, संस्था आणि शासन यंत्रणा देखील तयार केली.

प्रक्रिया अभियांत्रिकी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्पादन/उपभोगासाठी फोर्डचे मुख्य योगदान होते. त्याच्या प्रणालीचे विशिष्ट वैशिष्ट्य म्हणजे प्रामाणित घटक, प्रमाणित उत्पादन प्रक्रिया आणि एक साधे, सोपे उत्पादन आणि दुरुस्ती करणे होय. मानकीकरणासाठी भागांची जवळजवळ परिपूर्ण अदलाबदली आवश्यक आहे. अदलाबदली साध्य करण्यासाठी, फोर्डने यंत्र साहित्य आणि स्थिरावलोकन प्रणालीच्या प्रगतीचा फायदा घेतला. या नवकल्पनांमुळे अस्थिर किंवा सतत एकत्रीकरण फळी शक्य झाली, ज्यामध्ये प्रत्येक एकत्रीकरण करणाऱ्याने पुनरावृत्ती कार्य केले. कामाच्या प्रवाहात सुधार करण्यासाठी इलेक्ट्रिक मोटरच्या ताकदीची जाणीव करून देणारे फोर्ड हे पहिले अर्थतज्ञ होते. पूर्वी मध्यवर्ती उर्जा स्त्रोताविषयी मांडलेले यंत्र आता एकत्रीकरणच्या मार्गावर आणले जाऊ शकतात, ज्यामुळे कामाचा वेग आणि उत्पादन खूप जास्त प्रमाणात वाढू शकते. गतिमान एकत्रीकरण क्षेत्र प्रथम १९१४ मध्ये मिचीगन येथील हायलँड उद्यानात फोर्डच्या नमुनाकृति-टी यंत्रसंचामध्ये कार्यान्वित करण्यात आले, श्रम उत्पादकता दहापटीने वाढवली आणि १९१० मध्ये $७८० वरून १९१४ मध्ये $३६० किंमती कमी करण्यास परवानगी दिली. त्यामुळे, 'फोर्डिझम' या शब्दाचा अर्थ "मानकीकरण करणे" असा होतो. एखादे उत्पादन आणि त्याचे उत्पादन सामान्य माणसाला विकत घेणे परवडेल इतक्या कमी किमतीत त्याचा व्यवहार होणे या ठिकाणी अपेक्षित असते.

मोठ्या प्रमाणात उत्पादन करत असताना, केवळ घटकांची अदलाबदली करणे योग्य नसते तर त्याचे एकत्रीकरण देखील महत्वाचे असते. परंतु मोठ्या प्रमाणावर उत्पादनाच्या वातावरणात एकत्रीकरणाची फळी अकार्यक्षम असते, असे त्यांचे मत होते. या सर्व प्रक्रियेमध्ये उच्च पातळीच्या एकाग्रतेची आवश्यकता आहे आणि ही बाब अत्यंत कंटाळवाणी असू शकते, असे त्यांचे मत होते. परिणामी, १९१३ मध्ये फोर्ड यांनी श्रम क्षेत्रात खूप जास्त प्रमाणात उलाढाल अनुभवली, यामध्ये ३८० टक्क्यांपर्यंत बदल अनुभवले गेले. (आजही, मोठ्या प्रमाणात उत्पादन एकत्रीकरण फळीमध्ये असमानता बघायला मिळते, या असमानतेला कमी करण्यासाठी चांगल्या गुणवत्तेचे कामगार अत्यंत आवश्यक आहेत, जे यशस्वी एकत्रीकरणाचे कारण बनू शकतात). खऱ्या अर्थाने, फोर्डने कामगार उलाढालीला पाठिंबा दुप्पट पगार $५ प्रतिदिन करून केला; इतर उत्पादकांनी त्याच्या उत्पादन पद्धतींसाठी फोर्डच्या वेतन धोरणांचे अनुकरण केले; आणि शेवटी फोर्डच्या विचारांनी सर्व नियोक्त्यांना उत्पादन प्रक्रियेसाठी अकुशल कामगारांच्या इतकेच वेतन देण्यास भाग पाडले. दुसऱ्या शब्दांत: ग्राम्ससीने मोठ्या प्रमाणावर उत्पादनाची "नीरस, निकृष्ट आणि आयुष्य कमी करणारी कार्य प्रक्रिया" असे वर्णन केलेल्या गोष्टींना कमी करण्यासाठी चांगल्या प्रकारचे वेतन हा महत्वाचा दुवा मानला.

साधनांची पर्वा न करता, अकुशल कामगारांनी अखेरीस त्यांची उत्पादकता वाढवून कामाच्या तासांमध्ये चाळीस टक्के कपात आणि वेतनात पंचवीस पट वाढीमुळे भरीव नफा मिळविण्यात यश प्राप्त केले. इंग्रजी भाषिक जगात, संघटनांनी त्यांच्या सदस्यांसाठी स्पर्धात्मक वेतना पेक्षा जास्त वेतन मिळविण्यासाठी कृत्रिम टंचाई निर्माण केली, ही टंचाई त्यांनी कधी स्वतःहून निर्माण केली, कधी इतर संघटनांच्या सहकार्याने केली गेली, तर

कधी विशिष्ट उद्योगसंस्थांच्या संगनमताने हा घटक पुढे नेला. उत्तर युरोपातील सामाजिक बाजारातील अर्थव्यवस्थांमध्ये कामगारांनी आणखी चांगले काम केले आहे. नियोक्त्यांच्या राष्ट्रीय संघटना आणि राष्ट्रीय कामगार संघटना यांनी संपाशिवाय समन्वित वेतन योजना लागू केल्या, तसेच ब्लू-कॉलर संघटनांच्या नेतृत्वाखाली उच्च वेतन आणि उत्पन्न समानता या दोन्ही गोष्टी साध्य केल्या.

त्याचप्रमाणे, अकुशल कर्मचाऱ्यांची सर्वोच्च स्पर्धात्मक वेतन मिळविण्याची आणि ठरविण्याची क्षमता त्यांच्या राजकीय शक्तीवर अवलंबून असते. १९५० च्या दशकापर्यंत, मोठ्या प्रमाणावर उत्पादनाच्या वाढीमुळे या कामगारांचे प्रत्येक विकसित देशात सर्वात मोठे एकल गट बनले होते. त्यांच्या नियोक्त्यांनी आधीच संघटित केलेले व त्यांच्या स्वतःच्या हितसंबंधांसाठी ते सहजपणे एकत्र केले गेले. प्रत्येक विकसित देशात, कामगार संघटना संघटित आणि सर्वात शक्तिशाली राजकीय शक्ती म्हणून उदयास आल्या. त्यांनी केवळ कामगारांना कायद्याच्याच नाही, तर सार्वजनिक धोरणाच्या चौकटीत ही बसवले. ते पूर्ण रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि उत्पन्न समानता याबरोबरच केनेशियन कल्याणकारी अर्थशास्त्राचे मुख्य समर्थकदेखील होते. परिणामी, काही अर्थतज्ज्ञांनी या कल्याणकारी स्थितीला “फोर्डिस्ट राज्य” असेही देखील संबोधले.

अकुशल औद्योगिक कामगारांना नफा मिळूनही, फोर्डच्या उत्पादन प्रणालीवर टीका झाली. फ्रेडरिक टेलर ज्यांनी फोर्डिझम हा शब्द विकसित केला त्यांनी एकत्रीकरण फळीच्या कामगारांच्या कुशलतेवर टीका केली तसेच फोर्डच्या एकत्रीकरणाच्या धोरणाची तुलना प्रशिक्षित गोरिल्लांशी केली. इटालियन मार्क्सवादी, अँटोनियो ग्राम्सी यांनी अमेरिकनिझम ई-फोर्डिझममध्ये निरीक्षण केले (१९२९-३२ मध्ये लिहिले गेले परंतु १९४९ मध्ये प्रकाशित झाले), की "टेलर हा अर्थतज्ज्ञ अमेरिकन समाजाचा खरा उद्देश व्यक्त करतो, तो मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या जुन्या कामगारांच्या जागी व्यावसायिक कामगारांची शिफारस करतो जे स्वयंचलित आणि यांत्रिक वृत्तीसह सक्रिय सहभाग, बुद्धिमत्ता, कल्पनारम्य आणि नवप्रवर्तनावर लक्ष केंद्रित करतात. हे औद्योगिक धोरणापासून स्वीकारलेले सर्वात महत्वाचे आणि जुने धोरण आहे. एक नवीन मानसिक आणि भौतिक संबंध तयार करून, त्याच्या पूर्ववर्ती आणि श्रेष्ठ या दोन्ही घटकांपेक्षा भिन्न प्रावस्था मागे टाकल्या जातील याची त्यांना खात्री होती. परिणामी, जुन्या कामगार वर्गाचा एक भाग कदाचित नष्ट केला जाईल, असे त्यांचे मत होते."

४.३ पोस्ट-फोर्डिझम (POST-FORDISM)

भारतीय कामगार संघटना चळवळीला १९२० च्या दशकातच गती मिळाली. तोपर्यंत कामगारांकडून मालकांना कोणताही गंभीर धोका नव्हता आणि म्हणून मालकांच्या संघटनाही नव्हत्या. १९१९ मध्ये जगभरातील कामगारांच्या हिताची प्रगती आणि संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार संघटना स्थापन करण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या (ILO) प्रभावाखाली कामगार कायदे फक्त १९२० मध्ये आणि जगभरातील आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या सदस्य देशांनी औद्योगिक संबंध आणि कामगार कल्याण संदर्भात आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने केलेली अधिवेशने आणि शिफारशींवर कायदे केले. अशा प्रकारे मालक संघटना स्थापन करण्याची तीव्र गरज १९२०च्या दशकातच जाणवली.

५.६.१ स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर मालक संघटना (Employer's Associations before and after Independence):

१९३० च्या दशकात इंग्रज उद्योगपतींनी त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी १९३३ मध्ये पहिल्या दोन मालकांच्या संघटना स्थापन केल्या होत्या. या ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रियल एम्प्लॉयर्सची स्थापना करण्यात आली. त्याचे मुख्यालय दिल्ली हे करण्यात आले. त्यानंर एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली आणि त्याचे मुख्यालय मुंबईत होते. यानंतर १९४१ मध्ये बॉम्बेमध्ये ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन नावाच्या स्वदेशी संघटनेची स्थापना झाली, जी मध्यम उद्योगाचे प्रतिनिधित्व करते.

AIOIE आणि EFI यांनी एकत्र विलीन येऊन १९५६ मध्ये भारतीय मालकांची परिषद स्थापन केली जेणेकरून ते भारत सरकारला विविध मुद्द्यांवर त्यांची भूमिका प्रभावीपणे मांडू शकतील. इंडियन ज्यूट मिल्स असोसिएशन आणि एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया सारख्या संघटना भारतीय ट्रेड युनियन कायदा, १९२६ अंतर्गत नोंदणीकृत होत्या. असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीची (ASSOCHAM) १९२० मध्ये स्थापन करण्यात आली आणि भारतीय वाणिज्य आणि उद्योग महासंघ (FICCI)) १९२७ मध्ये

स्थापन करण्यात आला. त्यानंतर भारतीय कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत झाली. FICCI भारतीय व्यावसायिक हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करते, तर ASSOCHAM इंग्रजी व्यावसायिक हितांचे प्रतिनिधित्व करते. FICCI आणि ASSOCHAM या दोन्ही संस्थांचे मुख्यालय दिल्लीत आहे.

मालकांच्या संघटना आहेत, ज्या सोसायटी नोंदणी कायदा, १९६० अंतर्गत देखील नोंदणीकृत आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्टँडिंग कॉन्फरन्स ऑफ पब्लिक एंटरप्रायझेस (SCOPE) नावाची संघटना स्थापन केली आणि भारतीय मालकांच्या परिषदेचे सदस्य बनले. CIE हे ब्रुसेल्स येथे असलेल्या इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ एम्प्लॉयर्सचे सदस्य आहे. लघुउद्योगांची स्वतःची एक संघटना आहे. हे फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज इन इंडिया (FASII) म्हणून ओळखले जाते. FASII ची स्थापना १९५९ मध्ये झाली आणि ती दिल्ली येथे स्थापित आहे. भारतातील मालक संघटना तीन वेगवेगळ्या स्तरांवर आणि तीन वेगवेगळ्या क्षमतेमध्ये कार्यरत आहेत. स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय असे तीन स्तर आहेत. कापूस आणि ज्यूट टेक्सटाईल उद्योग, अभियांत्रिकी, सिमेंट आणि पेपर उद्योग आणि साखर उद्योगांमध्ये देखील उद्योग स्तरावरील मालक संघटना आहेत.

५.६.२ मालक (नियोक्ता) संघटनांची उद्दिष्टे (Objectives of Employer's Associations):

श्री नवल टाटा यांनी सांगितल्यानुसार मालक (नियोक्ता) संघटनांची सर्वसाधारण उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:

१. मालकांच्या (नियोक्त्यांच्या) दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व सरकारला एकत्रितपणे करणे.

२. औद्योगिक सुसंवाद प्रस्थापित करणे आणि स्थिर आणि निरोगी औद्योगिक संबंध विकसित करणे.

३. विविध स्तरांवर सामूहिक सौदेबाजीला चालना देणे आणि औद्योगिक लोकशाही प्रस्थापित करणे.

४. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील कामगार परिषदा आणि आयोग आणि आंतरराष्ट्रीय श्रम संघटनांसारख्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मंचांवर मालकांचे (नियोक्त्यांचे) प्रतिनिधित्व करणे.

५.६.३ मालक (नियोक्ता) संघटनांचे मूल्यांकन (Assessment of Employer's Associations):

औद्योगिक संबंधांच्या क्षेत्रात मालक (नियोक्त्यांच्या) संघटनेचे योगदान मर्यादित असल्याचे दिसून येते. केंद्रीय स्तरावरील मालक (नियोक्ता) महासंघ सामूहिक सौदेबाजीत सहभागी होत नाहीत. चेंबर्स ऑफ कॉमर्स देखील या प्रक्रियेत सहभागी होत नाहीत. केवळ उद्योग स्तरावरील संघटनाच सामूहिक सौदेबाजीत सक्रियपणे सहभागी होतात.

मालक (नियोक्ता) संघटना त्यांच्या स्वतःच्या आर्थिक हितसंबंधांना चालना देण्यासाठी नियोक्त्यांद्वारे तयार केल्या जातात, त्यांना ना-नफा संस्था देखील म्हणतात. कारण त्यांच्या उत्पन्नाचा कोणताही भाग त्यांच्या सदस्यांना वितरित केला जाऊ शकत नाही. नॅशनल लेबर कमिशनला वाटते की, नियोक्त्यांच्या संघटनांनी त्यांच्या आर्थिक हितसंबंधांसाठी काही सामाजिक उद्दिष्टे देखील पूर्ण केली पाहिजेत. NLC नुसार, मालकांच्या (नियोक्त्यांच्या) संघटनांच्या सामाजिक जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत:

१. मालक संघटनांची धोरणे आणि कार्यक्रम समाजाच्या आणि देशाच्या सामाजिक उद्दिष्टांशी सुसंगत असले पाहिजेत.

२. विकसनशील अर्थव्यवस्थेच्या गरजा, नियोजित वाढीच्या गरजा, औद्योगिक शांतता राखणे, राष्ट्रीय एकात्मतेला चालना देणे, उत्पादकता सुधारण्यासाठी कामगार संघटनांचे सहकार्य मिळवणे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गुणवत्ता आणि किमतीचे उच्च दर्जा राखणे या सर्व गोष्टींमध्ये सर्वोच्च स्थान असावे.

भारतातील नियोक्ता संघटना पूर्णपणे एकत्रित आणि एकीकृत नाहीत. त्यामुळे त्यांनी सरकारला आणि स्वतःला एकसंध दृष्टिकोन मांडण्यासाठी स्वतःला एकत्र केले पाहिजे.

५.७ सारांश (SUMMARY)

१. औद्योगिक संबंधांमध्ये खालील बाबींचा समावेश होतो :

अ) कामगार संबंध म्हणजे संघ आणि व्यवस्थापन यांच्यातील संबंध होत.

ब) नियोक्ता-कर्मचारी संबंध म्हणजे व्यवस्थापन आणि कामगार यांच्यातील संबंध होत.

क) समूह संबंध म्हणजे कामगारांच्या विविध गटांमधील संबंध होत.

ड) समुदाय किंवा जनसंपर्क म्हणजे उद्योग आणि समाज यांच्यातील संबंध होत.

२. औद्योगिक संबंधांसाठी पद्धती दृष्टीकोन जॉन डनलॉप यांनी मांडला होता. हे औद्योगिक संबंध प्रक्रियेतील सहभागी, पर्यावरणीय शक्ती आणि उत्पादनावर लक्ष केंद्रित करते आणि औद्योगिक संबंधांच्या विविध पैलूंमधील या परस्पर संबंधांच्या कारणांचा अभ्यास करते.

३. कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) च्या मते, कामगार आणि भांडवलदार यांच्यातील औद्योगिक संबंध स्वभावाने परस्परविरोधी आहेत. संबंधांमधील विरोधाभास हा वर्गांच्या विरोधाभासी उद्दिष्टांचा परिणाम आहे. मार्क्सचा असा विश्वास होता की, भांडवलदारांचे उद्दिष्ट जास्तीत जास्त नफा मिळवणे आणि कामगारांचे ध्येय जास्तीत जास्त वेतन वाढवणे आहे. दोन उद्दिष्टांचा ताळमेळ बसू शकत नाही कारण औद्योगिक संबंध हा एक शून्य रकमेचा खेळ आहे ज्यामध्ये एकाचा तोटा होतो आणि दुसऱ्याला फायदा होतो.

४. कामगार संघटनामागील तत्वे, ही उद्योग व्यवस्था आणि समाजाच्या भांडवलशाही व्यवस्थेचा परिणाम आहे. भारतातील आधुनिक औद्योगिकीकरणाची सुरुवात १८५० पासून झाली. जेव्हा रस्ते आणि रेल्वे मार्गांच्या विकासासह पहिल्या कापूस आणि ज्यूट मिल्सची स्थापना झाली. १८७५ हे वर्ष भारतातील कामगार संघटना चळवळीच्या इतिहासात एक महत्त्वाची खूण आहे. कारण कारखान्यातील कामगार पहिल्यांदाच चांगल्या कामाची परिस्थिती सुरक्षित करण्यासाठी एकत्र आले होते.

५. भारतीय श्रम बाजार संघटित आणि असंघटित क्षेत्रात विभागलेला आहे. श्रमिक बाजाराचे संघटित क्षेत्र खूपच लहान आहे आणि टक्केवारीच्या दृष्टीने देशातील एकूण रोजगाराच्या सुमारे ७% आहे. उत्पादन, वीज, वाहतूक आणि वित्तीय सेवा मोठ्या प्रमाणावर संघटित क्षेत्रात आहेत. असंघटित क्षेत्रात, शेती व्यतिरिक्त, असंघटित क्षेत्रातील इतर उद्योग खाणकाम, उत्पादन, बांधकाम, व्यापार, वाहतूक आणि समुदाय, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा आहेत.

६. औद्योगिक समस्यांचे समाजशास्त्रीय मूळ समाजशास्त्रीय घटक, जसे की मूल्य प्रणाली, रीतिरिवाज, निकष, चिन्हे, वृत्ती आणि श्रम आणि व्यवस्थापन या दोघांची धारणा आणि औद्योगिक संबंधांवर विविध मार्गांनी परिणाम करणारे घटक शोधले जाऊ शकतात. हे घटक कामगारांचे वर्तन ठरवतात. औद्योगिकीकरणाचे सामाजिक परिणाम जसे की संघटना, सामाजिक गतिशीलता, स्थलांतरामुळे अनेक सामाजिक दुष्कृत्ये निर्माण होतात, जसे कौटुंबिक विघटन, तणाव आणि ताण, अपराध, वैयक्तिक आणि सामाजिक अव्यवस्था कामगारांच्या कार्यक्षमतेवर आणि उत्पादकतेवर परिणाम करतात. ज्यामुळे उद्योगाच्या औद्योगिक संबंध प्रणालीवर परिणाम होतो.

५.८ प्रश्न (QUESTIONS)

१. औद्योगिक संबंधांकडे प्रणाली दृष्टिकोनाचे चिकित्सक परीक्षण करा.

२. औद्योगिक संबंधांच्या वर्ग संघर्ष दृष्टिकोनाचे विश्लेषण करा.

३. भारतातील कामगार संघटना चळवळीचा इतिहास शोधा.

४. भारतातील संघटित आणि असंघटित कामगारांच्या समस्यांची तुलना आणि विरोधाभास स्पष्ट करा.

५. श्रमिक बाजार विश्लेषणासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचे चिकित्सक परीक्षण करा.

*****

६

भारतातील औद्योगिक संबंध – II

प्रकरण रचना

६.० उद्दिष्टये
६.१ औद्योगिक संघर्षाचा परिचय आणि अर्थ
६.२ संघर्षाचे प्रकार
६.३ संप
६.४ टाळेबंदी
६.५ अनुपस्थिती
६.६ कर्मचारी परिवर्तन
६.७ औद्योगिक विवादांची कारणे
६.८ औद्योगिक विवादांचे परिणाम
६.९ औद्योगिक विवादांमधील कल / प्रवृत्ती
६.१० प्रश्न

६.० उद्दिष्टये (OBJECTIVES)

- औद्योगिक संघर्षाचा अर्थ आणि प्रकार अभ्यासणे.
- संप, टाळेबंदी व अनुपस्थिती ह्या संकल्पना अभ्यासणे.
- औद्योगिक विवादांची करणे, परिणाम व प्रवृत्ती अभ्यासणे.

६.१ औद्योगिक संघर्षाचा परिचय आणि अर्थ (MEANING OF INDUSTRIAL CONDLICT)

औद्योगिक संघर्ष ही एक संकल्पना आहे, जी रोजगार संबंधांमधील असमाधानाच्या सर्व अभिव्यक्ती, विशेषत: रोजगार कराराशी संबंधित आणि प्रयत्न कराराशी संबंधित आहे. विविध प्रकारचे औद्योगिक संघर्ष दोन मोठ्या वर्गांमध्ये विभागले जाऊ शकतात- अनौपचारिक आणि औपचारिक.

६.२ संघर्षाचे प्रकार (FORMS OF CONFLICT)

औपचारिक औद्योगिक संघर्ष आणि अनौपचारिक औद्योगिक संघर्ष असे संघर्षाचे दोन प्रकार आहेत.

१. औपचारिक औद्योगिक संघर्ष (Formal Industrial Conflict):

औपचारिक औद्योगिक संघर्ष, हे कामगार संघटना किंवा इतर कामगार प्रतिनिधींद्वारे व्यक्त केलेल्या संघर्षाच्या संघटित अभिव्यक्तीसाठी राखीव आहे. त्याचा कथित उद्देश हा धोरणात्मक किंवा साधनात्मक आहे. बहुतेकदा, त्या कामगारांचा समावेश असू शकतो ज्यांना, विवादात धोक्यात असलेल्या समस्यांबद्दल स्वतःहून वैयक्तिक सहभाग नसतो. त्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप म्हणजे संघटित संप म्हणजे, कामगार मागे घेणे जसे की कराराचा तात्पुरता भंग करणे, कामगारांच्या सामूहिक शक्तीचा वापर करून मंजुरी टाळण्यासाठी आणि वेतन किंवा कामाच्या अटीमध्ये समायोजन साध्य करणे. संपाला इतर प्रकारच्या औपचारिक मंजुरींद्वारे मजबुत केले जाऊ शकते. कामगार संघटना नेतृत्वाच्या आदेशानुसार आणि कायद्यानुसार आणि प्रक्रियात्मक सामूहिक सौदाशक्ती करारानुसार संप पुकारला गेला असेल तर तो अधिकृत मानला जातो. अनौपचारिक किंवा 'वाइल्ड कॅट' हा शब्द दुकानातील कारभारी किंवा मान्यता नसलेल्या संघटनेद्वारे किंवा इतर काही मार्गांनी ज्याने प्रस्थापित सामूहिक-सौदाशक्ती कायदे आणि प्रक्रियांचे उल्लंघन केले आहे. अशा अनोळखी नेत्यांद्वारे पुकारलेल्या संपांना लागू केले जाते. साहजिकच, वाइल्ड कॅट स्ट्राइक आणि अनौपचारिक संघर्षाच्या काही अधिक सामूहिक स्वरूपांमध्ये व्यवहारात स्पष्ट फरक नाही.

२. अनौपचारिक औद्योगिक संघर्ष (Informal Industrial Conflict):

अनौपचारिक औद्योगिक संघर्ष हे तर ते कोणत्याही पद्धतशीर संघटनेवर आधारित नाही, प्रत्यक्ष तक्रारीच्या भावनेतून उद्भवतात आणि असे मानले जाते की, ते पूर्णपणे अभिव्यक्त स्वरूपाचे आहेत. गैरहजर राहणे, वारंवार नोकरी बदलणे, निष्काळजीपणा आणि अगदी कामाच्या ठिकाणी होणारे अपघात यासह पूर्णपणे वैयक्तिकृत आणि अगदी बेशुद्ध निषेधाचे स्वरूप, असमंजसपणाचे दिसणारे औद्योगिक तोडफोडीचे अनेक प्रकार या अर्थाने औद्योगिक संघर्ष निर्माण करतील. औद्योगिक समाजशास्त्रज्ञांनी उत्स्फूर्त वॉक-आउट आणि संप यांना अनौपचारिक औद्योगिक संघर्षाची उदाहरणे आहेत. तसेच उत्पादन, प्रतिबंधात्मक पद्धती, गुप्तता किंवा वरिष्ठांच्या इतर संरक्षणात्मक वागणुकीचे नियमन करणाऱ्या कार्यसमूह नियमांमध्ये व्यक्त केलेल्या व्यवस्थापनास सतत विरोध म्हणून मानले आहे. अशा प्रकारे अनौपचारिक औद्योगिक संघर्षाची कल्पना वर्तनाच्या मुळांकडे लक्ष वेधून घेते, जी व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून अनाकलनीय वाटू शकते.

६.३ संप (STRIKES)

६.३.१ व्याख्या आणि अर्थ (Definition and meaning of Strikes):

पिटरसनच्या म्हणण्यानुसार, "संप म्हणजे कर्मचाऱ्यांच्या गटाने त्यांची तक्रार व्यक्त करण्यासाठी किंवा कामाच्या परिस्थितीतील बदलांसंबंधीची मागणी लागू करण्यासाठी तात्पुरते काम बंद करणे होय."

औद्योगिक विवाद कायदा, १९४७ च्या अनुच्छेद २ (q) मध्ये, संपाची व्याख्या "कोणत्याही उद्योगात काम करणाऱ्या व्यक्तींच्या संस्थेने एकत्रितपणे काम करणे किंवा अनेक व्यक्तींच्या सामाईक समजूतीनुसार एकत्रितपणे नकार देणे" अशी केली आहे.

६.३.२ संपाचे प्रकार (Types of Strikes):

संपाचे ढोबळपणे दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते, ते म्हणजे:

१) प्राथमिक संप आणि

२) दुय्यम संप

प्राथमिक संप सामान्यत ज्या मालकांशी विवाद अस्तित्वात आहे, त्या मालकांच्या विरोधात असतात. ते बैठा संप, स्टे-इन, सिट-डाउन, पेन-डाउन किंवा टूल-डाउन स्ट्राइक, मंद गती काम संप, नियमाप्रमाणे काम करून संप, टोकन किंवा निषेध स्ट्राइक, आकस्मिक किंवा कॅट कॉल संप, बहिष्कार संप करतात.

दुय्यम संप हे असे संप आहेत, ज्यात दबाव प्राथमिक मालकांविरुद्ध नाही, तर त्याच्याशी चांगले व्यापार संबंध असलेल्या तिसऱ्या व्यक्तीवर दबाव आणला जातो, ज्याचा संबंध तोडला जातो आणि प्राथमिक मालकांचे नुकसान होते. अशा प्रकारचे संप यू. एस. ए मध्ये लोकप्रिय आहेत, परंतु भारतात नाही.

६.४ टाळेबंदी (LOCKOUT)

'टाळेबंदी' या शब्दाचा अर्थ मालकांनी (सेवायोजकांनी) उपक्रम तात्पुरते बंद करणे किंवा त्यांच्या कर्मचाऱ्यांना एकतर त्यांनी केलेल्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडणे किंवा केलेल्या मागण्या मागे घेण्याच्या उद्देशाने काम देण्यास नकार देणे. औद्योगिक विवाद कायदा, १९४७ अंतर्गत, "टाळेबंदी" म्हणजे व्यवसाय किंवा नोकरीचे ठिकाण बंद करणे किंवा कामाचे निलंबन किंवा मालकांनी (सेवायोजकांनी) त्यांच्याद्वारे नियुक्त केलेल्या कितीही व्यक्तींना कामावर ठेवण्यास नकार देणे. अशा प्रकारे टाळेबंदीचे खालीलप्रमाणे वर्णन केले जाऊ शकते :

१. टाळेबंदी म्हणजे औद्योगिक वाद, हिंसाचार आणि मालमत्तेचे नुकसान झाल्याच्या धास्तीमुळे औद्योगिक उपक्रम बंद करणे.

२. मालक (सेवायोजक) कामगारांना काम देण्यास नकार देत नाही, तोपर्यंत किंवा त्याच्यावर केलेल्या मागण्या मागे घेईपर्यंत नोकरीचे ठिकाण बंद केल्यामुळे आणि कामाचे निलंबन केल्यामुळे हे निलंबन झालेले आहे.

३. टाळेबंदी ही संकल्पना संपाच्या विरोधी संकल्पना असते. ज्याप्रमाणे कर्मचारी संपावर जाऊन मालकाला त्यांच्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडतात, त्याचप्रमाणे मालक त्यांना त्यांच्या आवारातून टाळे ठोकतो आणि कामगारांनी त्यांच्या मागण्या मागे घेतल्याशिवाय किंवा त्यांच्या मागण्या मान्य केल्याशिवाय त्यांना कामावर परत येऊ देत नाही.

४. टाळेबंदीचा वापर कामगारांना बळजबरी करण्यासाठी किंवा अटींवर येण्यासाठी सक्ती करण्यासाठी केला जातो. टाळेबंदीमध्ये मालकांमध्ये एक वैरभावना कामगारांबद्दल निर्माण होते. कामाचे तात्पुरते निलंबन टाळेबंदीसारखे होणार नाही आणि कामगार बंद होण्याच्या कालावधीसाठी वेतनाचा दावा करू शकत नाहीत.

खालील गोष्टी टाळेबंदीला कारणीभूत मानल्या जाऊ शकत नाहीत:

१. वैयक्तिक कर्मचाऱ्याला कामावरून बंद करणे म्हणजे टाळेबंदी नाही.

२. कामगार कपातीद्वारे रोजगार संपुष्टात आणणे म्हणजे टाळेबंदी नाही.

३. एकाच वेळी एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या सेवा बंद करणे म्हणजे टाळेबंदी नाही.

४. कामगारांनी कामावर हजर राहण्यापासून परावृत्त केल्याच्या आधारावर मालकांनी (सेवायोजकांनी) टाळेबंदीची घोषणा करणे म्हणजे टाळेबंदी नाही.

संपाप्रमाणेच, टाळेबंदांमुळे उत्पादनाचे नुकसान होते आणि कामगारांना वेतन देण्यास स्थगिती मिळते.

६.५ अनुपस्थिती / गैरहजेरी (ABSENTEEISM)

"नोकरी किंवा वचनबद्धतेसाठी कोणतेही वैध कारण नसताना सतत अनुपस्थित राहणे याला गैरहजेरी म्हणतात."

६.५.१ अनुपस्थितीचे दोन प्रकार आहेत:

१. निर्दोष / निष्पाप गैरहजेरी / अनुपस्थिती:

कर्मचाऱ्यांकडे या अनुपस्थितीची रजा घेण्याची प्रामाणिक कारणे असतात.

उदाहरणार्थ, कामगार स्वतः किंवा त्यांचे कुटुंबीय आजारी पडणे,पालकांच्या गैरहजेरीत त्यांच्या मुलांना तात्पुरते सांभाळणारी व्यक्ती अचानक गैरहजर राहणे.

२. दोषी /अपराधी गैरहजेरी / अनुपस्थिती:

कामावरून अनियोजित अनुपस्थितीचे कारण खरे नसल्यास, त्यास दोषी अनुपस्थिती म्हणतात.

उदाहरणार्थ, कर्मचारी आजारी असल्याबद्दल खोटे बोलत आहेत किंवा फक्त घरी राहू इच्छितात.

६५२ अनुपस्थिती गणना:

उद्योगासाठी गैरहजर राहण्याच्या टक्केवारीची गणना करण्यासाठी अनुपस्थितीचे सूत्र पुढीलप्रमाणे आहेत:

गैरहजेरी दर = (सरासरी कर्मचारी दर X चुकलेल्या कामाचे दिवस) / (सरासरी कर्मचारी दर X एकूण कामाच्या दिवस) * १००

कर्मचाऱ्याच्या अनुपस्थितीची टक्केवारी मोजण्यासाठी गैरहजेरी सूत्र खालीलप्रमाणे:

गैरहजेरी दर = (निर्विवाद अनुपस्थितीचा दर)/एकूण कालावधी) x १०० = गैरहजेरीचा टक्केवारी

६.५.३ अनुपस्थितीची कारणे:

१. लहान मुलांची देखभाल करणे किंवा वृद्धांची काळजी घेणे:

जर कर्मचाऱ्यांच्या घरी लहान मुले किंवा आई-वडील असतील, ज्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. नेहमीच्या व्यवस्थेने काम केले नाही किंवा आश्रित व्यक्ती जखमी किंवा आजारी असल्यास त्यांना घरीच राहावे लागेल.

२. थकवा किंवा दबाव:

जास्त कामाचा ताण, कर्मचाऱ्यांवर दबाव आणणारी सादरीकरणे / बैठका आणि कमी मूल्यमापन कर्मचाऱ्यांना परावृत्त करू शकते. ते कामावर येऊ इच्छित नाही.

३. धमकावणे आणि छळ करणे:

कामाच्या ठिकाणी धमकावणे आणि छळ यांसारख्या भीतीदायक परिस्थितींमुळे कर्मचारी कामावर हजर राहू इच्छित नाही.

४. नैराश्य:

जेव्हा कर्मचारी त्यांच्या दुःख आणि नैराश्यासाठी स्व-औषध म्हणून अल्कोहोल किंवा व्यसनधिनतेकडे वळतात, तेव्हा ते अनावश्यक गोष्टीनां जन्म देऊ शकतात.

५. आजारपण:

डॉक्टरांच्या भेटी, आजारपण आणि जखमा एखाद्या व्यक्तीला कामावर न येण्यास भाग पाडू शकतात. अनुपस्थितीची ही सर्वात जास्त नोंदवलेली कारणे आहेत. परंतु काहीवेळा ती वास्तविक कारणे नसतात.

६. कर्मचाऱ्यांना कामाच्या बाहेर आणि दोन्ही ठिकाणी अपघात होऊ शकतात:

पाठदुखी आणि मानदुखी यांसारख्या सततच्या दुखापती, ही अनुपस्थितीची सर्वात सामान्य कारणे आहेत. ते सहसा अशा परिस्थितीत आजारी परिस्थितीला सामोरे जातात.

७. संबंध तोडणे :

कामावर हजर राहण्याची प्रेरणा नसलेले आणि त्यांच्या कंपनी, नोकऱ्या किंवा सहकाऱ्यांशी एकनिष्ठ नसलेले कर्मचारी काम सोडून जाण्याची शक्यता असते.

८. आंशिक शिफ्ट:

कामाच्या ठिकाणी मनोबल आणि उत्पादकता या दोन्ही गोष्टींवर नकारात्मक प्रभाव पडतो, जसे की दीर्घ विश्रांती, लवकर येणे आणि उशिरा सुट्टी होणे , ज्याला अनुपस्थिती देखील मानले जाते.

९. दुसरीकडे नोकरी शोधणे:

जेव्हा कर्मचारी नोकरी शोधत असतात, मुख्य ठिकाणांना भेट देत असतात, नोकरीच्या मुलाखतींना उपस्थित असतात किंवा रेझ्युमेवर काम करत असतात तेव्हा त्यांची गैरहजेरी होऊ शकते.

१०. वाहतुकीतील अडथळे:

उशीरा वाहतुकीमुळे किंवा कर्मचारी लांब राहिल्यामुळे कामावर उशीर होणे.

११. खराब कार्य नैतिकता:

तुमच्या कंपनीशी किंवा तुमच्या कामाशी वचनबद्ध न होणे, डेडलाईनपेक्षा उशिरा प्रकल्प पूर्ण करणे, कामावर उशिरा येणे, इ. हे सर्व प्रकारची खराब कामाची नैतिकता आहे.

६.६ कर्मचारी / श्रम परिवर्तन (EMPLOYEE TURN OVER)

कर्मचाऱ्यांचे / श्रम परिवर्तन म्हणजे एखाद्या संस्थेत आणि बाहेरील कर्मचाऱ्यांचे स्थलांतर आणि म्हणूनच त्याला कामगारांची उद्योगांतर्गत गतिशीलता असेही संबोधले जाते. कर्मचाऱ्यांच्या परिवर्तनची व्याख्या "श्रम परिवर्तन हे विशिष्ट काळात एखाद्या उद्योग संस्थेतील श्रमिकांमध्ये घडून येणारा बदल असतो" अशी व्याख्या केली जाते . कर्मचाऱ्यांचे / श्रम परिवर्तन हे मोजमाप करते की, दिलेल्या कालावधीत विद्यमान कर्मचारी किती प्रमाणात काम सोडतात आणि नवीन कर्मचारी संस्थेच्या सेवांमध्ये किती प्रमाणात प्रवेश करतात. कर्मचारी / श्रम परिवर्तन याची व्याख्या कामगार अशांततेचे मोजमाप म्हणून देखील केली जाते. कारण संप ही कामगार अशांततेची स्पष्ट अभिव्यक्ती आहेत. कर्मचाऱ्यांचे/श्रम परिवर्तन कर्मचाऱ्यांचे मनोबल आणि त्यांची कार्यक्षमता मोजते. परिवर्तनाचा दर जितका जास्त, तितके मनोबल आणि कर्मचाऱ्यांची क्षमता कमी असते. संस्थेच्या यशासाठी मनोबल आणि कार्यक्षमता हे दोन पैलू केंद्रस्थानी आहेत आणि म्हणूनच त्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

सांख्यिकीयदृष्टया, कर्मचारी परिवर्तन हे त्या कालावधीसाठी पूर्णवेळ कर्मचाऱ्यांच्या सरासरी संख्येशी वार्षिक किंवा मासिक वियुक्ती दराचे गुणोत्तर म्हणून व्यक्त केले जाते. असे गृहीत धरले जाते की, एखाद्या उद्योगसंस्थेमध्ये एकूण उपलब्ध नोकऱ्यांची संख्या स्थिर आहे. श्रम परिवर्तन मोजण्याचे खालील मार्ग आहे .

१. एकूण बदली सूत्रानुसार, कर्मचारी परिवर्तन व्यक्त केले जाते:

$$T = \frac{R}{W} \times 100$$

जेथे R एकूण बदली दर आहे आणि W हे सरासरी कार्यशक्ती आहे.

२. एकूण टाळता येण्याजोग्या वियुक्ती दरानुसार , कर्मचाऱ्यांचे परिवर्तन खालीलप्रमाणे:

$$T = \frac{S-U}{W} \times 100$$

जेथे S म्हणजे वियुक्ती होणे, U म्हणजे अपरिहार्य वेगळे होणे (निवृत्ती, मृत्यू इ.) आणि W म्हणजे सरासरी कार्यशक्ती.

३. एकूण नियुक्ती दरानुसार, कर्मचारी परिवर्तन खालील सूत्राद्वारे व्यक्त केली जाते:

$$T = A + S \div \frac{(P1+P2)}{2} \times \frac{365}{M}$$

जेथे A म्हणजे वियुक्ती , S वियुक्ती , P1 आणि P2 म्हणजे अनुक्रमे महिन्याच्या सुरूवातीस आणि शेवटी एकूण कर्मचाऱ्यांच्या संख्येसाठी आणि M म्हणजे महिन्यातील दिवसांची संख्या.

४. सामान्यतः, ज्या कालावधीसाठी मोजमाप अपेक्षित आहे, त्या कालावधीत रोजगाराच्या समाप्तीच्या संख्येच्या टक्केवारीनुसार कर्मचाऱ्यांच्या परिवर्तनाची गणना केली जाते. अशा प्रकारे, कर्मचारी परिवर्तन आहे.

$$T = \frac{S}{F} \times 100$$

जेथे T हा परिवर्तनाचे प्रतिनिधित्व करतो, S म्हणजे कालावधी दरम्यान एकूण वियुक्ती आणि F कालावधी दरम्यान सरासरी कामगार शक्ती.

कर्मचारी / श्रम परिवर्तनाची कारणे :

सेवानिवृत्ती, राजीनामा, ले-ऑफ आणि बडतर्फी ही कर्मचारी परिवर्तनाची सामान्य कारणे आहेत. यापैकी निवृत्ती हे अपरिहार्य कारण आहे. तथापि, संस्थेमध्ये कर्मचारी कायम ठेवण्याची धोरणे लागू करून राजीनामा आणि बडतर्फी दोन्ही कमी करता येतात. अपरिहार्य परिवर्तनाची परिस्थिती ज्याला नैसर्गिक उलाढाल देखील म्हणतात, मृत्यू, सेवानिवृत्ती, नोकरीवरून काढणे आणि घर्षण बेरोजगारी यासारख्या कारणांमुळे उद्भवते. मंदी, हंगामी तफावत आणि स्पर्धेमुळे कामात कपात झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले जाऊ शकते.

राजीनामे आणि बडतर्फी ही परिवर्तनाची प्रमुख कारणे असल्याचे आढळून आले आहे. कामाच्या परिस्थितीबद्दल असंतोष, कमी वेतन, कमकुवत आरोग्य, आजारपण, कौटुंबिक परिस्थिती इत्यादींमुळे राजीनामा दिला जाऊ शकतो. संपात सहभाग, गैरवर्तन, अनास्था, अकार्यक्षमतेच्या प्रकरणांमध्ये शिस्तभंगाची कारवाई इत्यादी कारणांमुळे बडतर्फी होऊ शकते. कापडातील बदली व्यवस्था उद्योग हे कर्मचारी परिवर्तनाचे महत्त्वाचे कारण

असल्याचे आढळून आले. उच्च पगार असलेल्या व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांमध्ये कर्मचारी परिवर्तन देखील जास्त आहे. कारण तुम्ही जितके जास्त एका संस्थेतून दुसऱ्या संस्थेत बदल कराल, तितके तुम्ही संस्था वाढीच्या शिडीवर पोहचाल . नवीन कर्मचारी, अनाकर्षक नोकऱ्या, कमी कुशल कामगार आणि तरुण लोकांमध्ये कर्मचाऱ्यांचे परिवर्तन जास्त आहे.

कर्मचारी / श्रम परिवर्तनाचे परिणाम :

कर्मचाऱ्यांच्या परिवर्तनामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता कमी होते आणि ते निष्ठेचा लाभ घेण्याच्या स्थितीत नसतात. उच्च परिवर्तनामुळे कर्मचाऱ्यांच्या एकतेवर विपरित परिणाम होतो. परिवर्तनामुळे मालकांचाही तोटा होतो. शिकण्याच्या कालावधीत कर्मचाऱ्यांची उत्पादकता कमी असते याचा अर्थ शिक्षणाचा खर्च मालक उचलतात. एकदा का कर्मचारी त्याच्या कामात पुरेसा निपुण झाला आणि तो किंवा तिने नोकरी सोडली की, यामुळे मालकांचे स्पष्टपणे नुकसान होते.

तथापि, जर कर्मचाऱ्यांचे परिवर्तन संपूर्ण उद्योगात तितकेच जास्त असेल, तर कुशल कर्मचाऱ्यांचा तोटा उद्योगातील इतर उद्योगसंस्थामधून येणारा कुशल कर्मचारी मिळवून प्राप्त केला जाऊ शकतो. तथापि, नवीन कर्मचाऱ्यांचे संपादन नेहमीच जास्त किंमतीत असते. तथापि, उच्च कर्मचारी परिवर्तन, देशातील संसाधनांचा पर्याप्त वापर प्रतिबंधित करते.

कर्मचाऱ्यांचे परिवर्तन कमी करण्यासाठी उपाययोजना :

संपूर्ण उद्योगातील कर्मचाऱ्यांचे परिवर्तन कमी करण्यासाठी, संपूर्ण उद्योगांमध्ये आणि उद्योगांमधील भागांमध्ये परिवर्तनाच्या मर्यादेचे मूल्यांकन करण्यासाठी समस्येचा वैज्ञानिक अभ्यास करणे आवश्यक आहे. योग्य व्यक्तीला योग्य वेळी योग्य ठिकाणी ठेवण्यासाठी उदयोगसंस्थांची भरती किंवा नियुक्ती धोरण वैज्ञानिक असले पाहिजे. कमी कालावधीत उद्योगसंस्था सोडण्याची चुकीची शक्यता आहे. कर्मचाऱ्यांच्या उलाढालीची समस्या कमी करण्यासाठी कंपन्यांची भरती, नियुक्ती आणि प्रशिक्षण धोरणे योग्य असणे आवश्यक आहे. निवड आणि नियुक्ती करण्यापूर्वी नोकरीची वैशिष्ट्ये आणि मानवी वैशिष्ट्ये जुळली पाहिजेत. शेवटी, प्रबुद्ध कर्मचारी पर्यवेक्षण, चांगली कामाची परिस्थिती, वेतनाचा दर्जा, नोकरीच्या प्रगतीची चांगली प्रणाली, चांगले वेगळे फायदे आणि सहानुभूतीपूर्ण व्यवस्थापन कर्मचारी परिवर्तनाची समस्या निश्चितपणे कमी करू शकते.

६.७ औद्योगिक विवादांची कारणे (CAUSES OF INDUSTRIAL DISPUTES)

औद्योगिक विवादांची कारणे खालीलप्रमाणे आहेत:

१. आर्थिक कारणे:

अ) औद्योगिक कामगारांसाठी अखिल भारतीय ग्राहक किंमत निर्देशांकात वाढ झाल्यामुळे वेतनात वाढ करण्याची मागणी राहते . मजुरी वाढवण्याची मागणी कारखान्यातील सर्व श्रेणीतील कामगारांसाठी केली जाऊ शकते.

ब) उच्च आनुतोषिक आणि इतर सेवानिवृत्ती लाभांची मागणी.

क) जास्त बोनसची मागणी.

ड) घरभाडे भत्ता, वैद्यकीय भत्ता, रात्रपाळी भत्ता, वाहतूक भत्ता यासारख्या काही भत्त्यांची मागणी.

इ) सशुल्क सुट्टीची मागणी

फ) कामाचे तास कमी करणे

ग) उत्तम कामाची परिस्थिती इत्यादी.

२. राजकीय कारणे:

भारतातील कामगार संघटना ह्या विविध राजकीय पक्षांचे नियंत्रणा खाली आहेत. अनेक प्रकरणांमध्ये, त्यांचे नेतृत्व अशा राजकीय व्यक्तींच्या हातात असते, ज्यांना कामगारांच्या हितापेक्षा त्यांचे राजकीय हित साधण्यात अधिक रस असतो.

३. वैयक्तिक कारणे:

काहीवेळा, कर्मचाऱ्यांच्या समस्यांमुळे औद्योगिक विवाद उद्भवतात. जसे की कामगार कपात, कामावरून काही काळासाठी कमी करणे / काढून टाकणे, बदली, पदोन्नती इ.

४. अनुशासन संहिता:

कामगारांच्या अनुशासन संहितेमुळे आणि हिंसाचारामुळे औद्योगिक विवाद देखील होतात. अनुशासनसंहिता आणि हिंसाचार रोखण्यासाठी व्यवस्थापनांकडून ताळेबंदीचा अवलंब केला जातो.

६.८ औद्योगिक विवादांचे परिणाम (CONSEQUENCES OF INDUSTRIAL DISPITES)

औद्योगिक विवादांचे परिणाम अनेकदा दूरगामी असतात. कारण ते देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनात अडथळा आणतात. औद्योगिक विवादांमुळे व्यवस्थापन आणि कामगार यांच्यात तेढ निर्माण होते. वस्तुतः ही वाईट औद्योगिक संबंधांची लक्षणे आहेत. एखादी संस्था वाईट औद्योगिक संबंधांच्या लक्षणांच्या पकडीत असल्यास. तणावपूर्ण औद्योगिक संबंधांच्या पकडीत असलेल्या एखाद्या संस्थेला केवळ विविध औद्योगिक अभियांत्रिकी तंत्रांद्वारे कोणतेही नावीन्य आणणे किंवा कोणत्याही उत्पादकता सुधारणेवर परिणाम करणे अशक्य वाटते. एखाद्या संस्थेतील खराब औद्योगिक संबंध केवळ त्यांच्यासाठी हानिकारक नसतात, तर संपूर्ण समाजाच्या हिताच्या विरोधात असतात. औद्योगिक संघर्षांचे प्रतिकूल परिणाम खालीलप्रमाणे वर्गीकृत केले जावू शकतात:

१. औद्योगिक शांततेचा भंग

२. बदलांचा प्रतिकार

३. कर्मचाऱ्यांमध्ये निराशा

४. सामाजिक तणावाची तीव्रता

५. अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम

सर्वसाधारणपणे, औद्योगिक विवाद हानीकारक, अवांछनीय आणि धोकादायक देखील असतात. ते उद्योगात अशांतता निर्माण करतात आणि मालक आणि कर्मचाऱ्यांमध्ये तणाव निर्माण करतात.

६.९ औद्योगिक विवादांमधील कल / प्रवृत्ती (TRENDS IN INDUSTRIAL DISPUTES)

औद्योगिक विवादांच्या तीव्रतेमधील कल २००१-२०११

तक्ता क्र. ६.१:

अनु.	वर्ष	विवाद	कामगारांचा सहभाग	मॅन-डे लॉस (०००)
१	२००१	६७४	९८७७७८	२३७६७
२	२००२	५७९	१०७९४३४	२६५८६
३	२००३	५५२	१८१५९४५	३०२५६
४	२००४	४४७	२०७२२२१	२३८६६
५	२००५	४५६	२९१३६०१	२९६६५
६	२००६	४३०	१८१०३४८	२०३२४
७	२००७	३८९	७२४५७४	२७१६७
८	२००८	४२१	१५७९२९८	१७४३४
९	२००९	३९२	१६२५५०५	१३३६५
१०	२०१०	४२५	१०५९६६४	१७९१२
११	२०११	९१	४८१५६	३२१

वरील तक्त्यामध्ये २००१ पासून २०११ या कालावधीतील औद्योगिक विवादांची प्रवृत्ती दिली आहे.

६.११ प्रश्न

१) औद्योगिक संघर्षाची व्याख्या देवून प्रकार विशद करा.

२) पूढील बाबींवर टिपा लिहा.

i) संप

ii) टाळेबंदी

iii) अनुपस्थिती

iv) कर्मचारी परिवर्तन

३) औद्योगिक विवादांची करणे, परिणाम व प्रवृत्ती / कल स्पष्ट करा.

*****

मॉडयुल ४ : भारतातील औद्योगिक संबंधांमधील राज्यांची भूमिका

७

भारतातील औद्योगिक संबंधांमधील राज्यांची भूमिका - १

घटक संरचना

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ भारतातील श्रम धोरण: सुधारणापूर्व आणि नंतरची परिस्थिती

७.३ जागतिकीकरणाचा प्रभाव

७.४ त्रिपक्षीय

७.५ औद्योगिक संबंधांवर परिणाम करणारे कामगार कायदे: औद्योगिक विवादांचे निराकरण करण्यासाठी वैधानिक आणि गैर-वैधानिक उपाय

७.६ सारांश

७.७ प्रश्न

७.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- भारतातील कामगार धोरणांमध्ये पूर्व आणि नंतरच्या सुधारणांचा अभ्यास करणे.
- जागतिकीकरण, त्रिपक्षीय आणि औद्योगिक संबंधांवर परिणाम करणाऱ्या कामगार कायद्याच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

७.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

राज्य आणि औद्योगिक संबंधांची भूमिका ही तुलनात्मक दृष्टिकोन (युरोपियन युनियन, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, इटली, जपान, चीन, अमेरिका, ब्राझील, दक्षिण आफ्रिका आणि भारत) वापरून जागतिक औद्योगिक संबंधांच्या सामान्य चौकटीचा पुनर्विकास करते. आव्हाने आणि भविष्यातील संभाव्यता लक्षात घेऊन राज्यासाठी नवीन कार्यक्रम संरचित करणे हे अतिशय महत्वाचे आहे. औद्योगिक संबंधांचे नवे युग जे अलीकडच्या दशकात हळू-हळू बदलत आहे आणि हे नवे युग अशा टप्प्यावर पोहोचले आहे की, त्याचे पद्धतशीरपणे परीक्षण आणि विश्लेषण केले जाऊ शकते, कारण आर्थिक संकटानंतर "रेंगाळणारे पुनर्नवीकरण" हा घटक प्रकर्षाने पुढे आला आहे. २००८ च्या अत्यावश्यक आर्थिक संरचनेमध्ये राज्यांच्या हस्तक्षेपांना पुनरुज्जीवित केले आहे. जागतिकीकरणाच्या संकल्पनेनुसार, अर्थव्यवस्थेचे आंतरराष्ट्रीयीकरण आणि वाढत्या स्पर्धात्मक दबावामुळे औद्योगिक संबंध नवीन दिशेने विकसित होत आहेत.

औद्योगिक संबंध हे अभ्यासाचे ते व्यासपीठ आहे ज्या ठिकाणी प्रशासन आणि संस्थेचे कर्मचारी यांच्यातील संबंधांचे परीक्षण केले जाते आणि त्याशिवाय विविध औद्योगिक विवादांचे निराकरण करण्यासाठीची संधी या ठिकाणी उपलब्ध होते. ही कल्पना एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगिक क्रांतीमुळे विकसित झाली. एखाद्या उद्योगाकडे आर्थिक क्रियाकलाप म्हणून पाहिले जाऊ शकते, कारण यामध्ये उत्पादन, निर्मिती किंवा वस्तूंची प्रक्रिया किंवा सेवा किंवा प्रशासन यांचा समावेश होतो आणि हे सर्व कामगारांच्या गटांद्वारे साध्य केले जाते. संबंध म्हणजे कामाच्या ठिकाणी कामगार आणि नियोक्ता यांच्यातील संबंध आणि संप्रेषण (दळणवळण) होय.

७.२ भारतातील श्रम धोरण: सुधारणापूर्व आणि नंतरची परिस्थिती (LABOUR POLICY IN INDIA: PRE AND POST-REFORM SCENARIO)

भूमी, भांडवल आणि संयोजकाबरोबर श्रम हा उत्पादनाचा एक महत्वाचा घटक आहे आणि श्रम बाजार ही अशी बाजारपेठ आहे जिथे कामगार नोकऱ्यांसाठी स्पर्धा करतात आणि उद्योगसंस्था कामगारांसाठी स्पर्धा करतात. नव सनातनवादी विचारवंत असे गृहीत धरतात की, भांडवल आणि श्रम हे एकमेकांसाठी पर्यायी घटक म्हणून काम करू शकतात म्हणजेच ते लवचिक आहेत असे म्हणणे योग्य राहील. तथापि, हे समजून घेतले पाहिजे की, उत्पादनासाठी वापरला जाणारा श्रम हा घटक भांडवलापेक्षा बराच वेगळा असतो. श्रमशक्ती ही आर्थिकदृष्ट्या गरिबांकडे असते आणि हे लोक उत्पादनक्षम रोजगाराद्वारे त्यांच्या मूलभूत किमान गरजा पूर्ण करण्यासाठी आपली श्रमशक्ती विकतात. पण जेव्हा या श्रमशक्तीच्या जागी भांडवल हा घटक पर्याय म्हणून समोर येतो, तेव्हा त्याचा परिणाम बेरोजगारी किंवा रोजगाराच्या स्थितीवर होतो. म्हणूनच असे म्हणता येईल की, जरी अर्थव्यवस्था उच्च वृद्धीच्या मार्गावर असली तरीही (म्हणजे भांडवलाच्या अधिक उपयोजनामुळे), जर त्या राष्ट्राच्या श्रमशक्तीला कोणतेही 'अर्थपूर्ण' प्रदान केले गेले नाही, तर उच्च आर्थिक विकासाचा कोणताही हेतू साध्य होणार नाही. श्रमशक्तीचा कामगारांच्या जीवनावर थेट परिणाम होतो हे लक्षात घेता, श्रमिक बाजारातील सुधारणांचा मुद्दा एकंदरीत एक अतिशय संवेदनशील मुद्दा आहे, ज्याचा एक प्रकारे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो.

श्रम बाजार सुधारणा करण्यासाठी बाजारातील वेगवेगळ्या श्रम संस्था एकत्र येऊन त्यासाठी प्रयत्न करतात, ज्यामध्ये विविध कायदे, नियम आणि अटी यांचा समावेश होतो आणि याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम श्रम मागणी, श्रम पुरवठा, मजुरी इत्यादींवर होतो. मुळात कामगार हक्कांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षिततेसाठी आणि मालकांच्या हातून कामगारांचे शोषण रोखण्यासाठी हे कायदे आणि नियम अभिप्रेत असतात. अलीकडील वर्षांत, श्रम बाजार सुधारणांच्या मुद्द्याने भारतातील धोरणात्मक चर्चेचा केंद्रबिंदू घेतला आहे आणि दोन्ही पक्षांकडून या सुधारणांच्या बाबतीत तर्कवितर्क लढवले जात आहेत.

(१) **शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ मधील सुधारणा:** हा कायदा उद्योग आणि तरुणांना अधिक सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी डिसेंबर २०१४ मध्ये सुधारित करण्यात आला. वस्तुनिर्माण क्षेत्रातील सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगात (MSME) काम करणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना प्रोत्साहन देण्यासाठी शिकाऊ प्रोत्साहन योजना सुरू

करण्यात आली. सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगामधील क्षेत्रातील मोठ्या रोजगार क्षमता लक्षात घेता, या सुधारणेमुळे कामगारांची उत्पादकता वाढू शकते आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊन कार्यक्षमतेत वाढ होऊ शकते.

(२) श्रम सुविधा पोर्टल: ही एक एकीकृत कामगार पोर्टल योजना आहे, जी तक्रारींचे वेळेवर निराकरण करण्यासाठी आणि औद्योगिक विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. या पोर्टलच्या मुख्य वैशिष्ट्यांमध्ये खालील घटक समाविष्ट होतात:

(i) ऑनलाइन नोंदणी सुलभ करण्यासाठी विशेष कामगार ओळख क्रमांक (LIN);

(ii) उद्योगांद्वारे १६ स्वतंत्र परताव्याऐवजी स्वयं-प्रमाणित आणि सरलीकृत एकल ऑनलाइन परतावा भरण्यास मदत करण्यासाठी स्व-प्रमाणन;

(iii) भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पारदर्शक कामगार तपासणी योजना. जोखीम-आधारित निकषांनुसार तपासणी संगणकीकृत प्रणालीद्वारे केली जाईल आणि तपासणी अहवाल कामगार निरीक्षकांद्वारे ७२ तासांच्या आत अपलोड केले जातात.

(३) कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) अंतर्गत पंचदीप प्रकल्प: नियोक्ते आणि विमाधारक व्यक्तींना सेवांमध्ये कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी अंतर्गत आणि बाह्य प्रक्रियांचे डिजिटायझेशन करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

(४) युनिव्हर्सल खाते क्रमांक (UAN) आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) अंतर्गत माहितीचे डिजिटायझेशन: EPF सदस्यांच्या माहितीचे डिजिटायझेशन आणि सदस्य खात्यांची सुवाह्यता सुलभ करण्यासाठी प्रत्येक सदस्याला युनिव्हर्सल खाते क्रमांक (UAN) चे वितरण केले जाते. आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी UAN ला बँक खाते, आधार कार्ड आणि इतर KYC तपशीलांसह जोडले जाते. ईपीएफ खात्यांमध्ये थेट प्रवेश केल्याने सदस्यांना मागील खात्यांमध्ये प्रवेश आणि एकत्रीकरण करता येते, तसेच हे खाते नियंत्रित करणे अतिशय सुलभ होते.

(५) राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना (RSBY): असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ अंतर्गत ही असंघटित कामगारांसाठीची एक योजना आहे. ही एक स्मार्ट कार्ड-आधारित रोकडरहित आरोग्य विमा योजना आहे, ज्यामध्ये प्रसूती फायद्यांचा समावेश आहे, ज्यामध्ये ३०,००० रुपयांचे संरक्षण उपलब्ध आहे. असंघटित क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) कुटुंबांना कुटुंब फ्लोटर आधारावर प्रति कुटुंब दरवर्षी टप्प्याटप्प्याने सर्व असंघटित कामगारांसाठी राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजनेसचा विस्तार करण्याचा प्रस्ताव आहे.

(६) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI), शिकाऊ योजना आणि सर्व NCVT प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे मूल्यमापन/प्रमाणीकरण यांच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी राष्ट्रीय व्यावसायिक प्रशिक्षण-व्यवस्थापन माहिती प्रणाली (NCVT-MIS) पोर्टल विकसित केले गेले आहे.

(७) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) अंतर्गत: ४२.३ दशलक्ष EPF सदस्यांच्या संपूर्ण माहितीचे डिजिटायझेशन आणि प्रत्येक सदस्याला युनिव्हर्सल खाते क्रमांक (UAN) चे वाटप, जे सदस्य खात्यांची सुवाह्यता सुलभ करते. आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी UAN ला बँक खाते, आधार कार्ड आणि इतर KYC तपशीलांसह जोडले जाते. ईपीएफ खात्यांमध्ये थेट प्रवेश केल्याने सदस्यांना मागील खात्यांमध्ये प्रवेश आणि एकत्रीकरण करता येते. ऑनलाइन निवृत्तीवेतनधारक त्यांचे खाते आणि वितरण तपशील ऑनलाइन पाहू शकतात. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि विविध तरतुदी (EPF&MP) कायद्यांतर्गत वैधानिक वेतन मर्यादा रु. १५,००० दरमहा पर्यंत वाढवण्यात आली आणि किमान निवृत्तीवेतन रु. १,००० एवढे करण्यात आले. हे बदल सप्टेंबर २०१४ पासून कर्मचारी निर्वाह निधी योजना-१९९५ अंतर्गत निवृत्तीवेतनधारकांसाठी करण्यात आले आहेत.

(८) असंघटित कामगारांसाठी: राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना (RSBY) ही असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा २००८ अंतर्गत एक योजना आहे. ही एक स्मार्ट कार्ड-आधारित रोकडरहित आरोग्य विमा योजना आहे, ज्यामध्ये मातृत्व लाभाचा समावेश आहे, या योजनेच्या मार्फत असंघटित क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) कुटुंबांना रु. ३०,००० प्रति वर्ष एवढा कव्हर दिला जातो, टप्प्याटप्प्याने सर्व असंघटित कामगारांसाठी राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजनेचा विस्तार करण्याचा प्रस्ताव आहे

(९) राष्ट्रीय जीविका सेवा पोर्टल: सरकारला आपल्या नागरिकांसाठी मोफत रोजगार सेवा चालू ठेवणे बंधनकारक असते. जुलै २०१५ मध्ये राष्ट्रीय जीविका सेवा (एनसीएस) पोर्टल सुरु केल्याने रोजगारात लक्षणीय वाढ होईल अशी अपेक्षा आहे. एनसीएस एक डिजिटल पोर्टल म्हणून कार्यान्वित आहे जे नोकरी शोधणारे आणि नियोक्ते यांना गतिशील, कार्यक्षम आणि नोकरीच्या जुळणीसाठी देशव्यापी ऑनलाइन व्यासपीठ प्रदान करते.

(१०) अधिलाभांश देय (सुधारणा) अधिनियम २०१५: डिसेंबर २०१५ मध्ये पारित झालेल्या कायद्याने अधिलाभांश देय अधिनियम १९६५ च्या अधिलाभांश देयाची पात्रता रु. १०,००० वरून रु. २१,००० प्रति महिना केली. या निर्णयाने कर्मचाऱ्यांचे केवळ अधिलाभांश देयच वाढविले नाही तर त्यांना अधिक पात्र देखील बनविले.

(११) राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP) योजना: २०१५ मध्ये, भारत सरकारने राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP) योजना सुरू केली ज्या अंतर्गत ९-१४ वर्षे वयोगटातील कामातून सुटका/काढलेल्या मुलांची NCLPमध्ये विशेष प्रशिक्षणात नोंदणी केली जाते. या ठिकाणी ते औपचारिक शिक्षण व्यवस्थेत मुख्य प्रवाहात येण्यापूर्वी सेतू शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, मध्यान भोजन, विद्यावेतन, आरोग्य सेवा इ. ५-८ वर्षे वयोगटातील मुले सर्व शिक्षा अभियान (SSA) च्या जवळच्या समन्वयाने औपचारिक शिक्षण प्रणालीशी थेट जोडली जातात. सरकारने बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम, १९८६ मध्ये एक दुरुस्ती देखील

प्रस्तावित केली आहे, ज्याचा उद्देश १४ वर्षांखालील मुलांच्या रोजगारावर पूर्ण बंदी घालणे आणि मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या अधिनियमा अंतर्गत त्यांनी शिक्षण घेतले पाहिजे असे अपेक्षित आहे. या दुरुस्तीमध्ये नियोक्त्यांना कठोर शिक्षेच्या तरतुदींचाही समावेश आहे.

७.३ जागतिकीकरणाचा परिणाम (IMPACT OF GLOBALISATION)

भारतीय उद्योगांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे हे उदारीकरणाचे एक उद्दिष्ट आहे. यासाठी, भारत सरकारने तीन प्रकारच्या सुधारणांचा प्रस्ताव मंडला आहे: पहिला, औद्योगिक नियंत्रणांचे जटिल जाळे, औद्योगिक परवाना प्रणाली नष्ट करणे; दुसरा, विदेशी व्यापार आणि चलन व्यवहारांचे उदारीकरण आणि तिसरा, थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय) प्रवाह सुलभ करण्यासाठी अनेक उपायांची योजना करणे. हे उपाय १९९१ मध्ये सुरू करण्यात आले होते आणि उदारीकरण प्रक्रिया अजूनही सुरू आहे. बाजार प्रवेश आणि परवानाविषयक अडथळे दूर केल्याने भारतीय उद्योगसंस्था आंतरराष्ट्रीय स्पर्धेला सामोरे जाईल, त्यांची कार्यक्षमता आणि उत्पादकता सुधारण्यास मदत होईल, नवीन प्रक्रिया आणि उत्पादने तयार केली जातील. भारतीय उद्योगसंस्थांना जागतिक बाजारपेठेसमोर आणण्याच्या उद्देशाने व्यापार सुधारणा त्यांना चांगल्या दर्जाच्या वस्तूंचे उत्पादन करण्यास भाग पाडतील. आयात निर्बंध आणि चलन व्यवहारामुळे ते अधिक चांगल्या दर्जाचे साहित्य, घटक आणि तंत्रज्ञान आयात करू शकतील. एफडीआय प्रवाहामुळे तंत्रज्ञान आणि उत्पादकता वाढेल आणि भारतीय उद्योगसंस्थांची उत्पादकता सुधारेल.

जागतिकीकरण औद्योगिक संबंध प्रणालींना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे प्रभावित करते आणि त्याच्या आजूबाजूच्या आर्थिक घटकांवरदेखील याचा प्रभाव पडतो. उदाहरणार्थ, बाजारपेठेचे आंतरराष्ट्रीयीकरण, भांडवल आणि कामगारांची मुक्त हालचाल, वाढती स्पर्धा आणि बाजारपेठांचे महत्त्व जागतिक औद्योगिक संबंध प्रणालींवर परिणाम करते. हे देशांमधील आर्थिक परस्परावलंबनाला गती देत असतात, यामुळे जागतिक औद्योगिक संबंधांचे एकत्रीकरण होऊ शकते. जास्तीत जास्त संस्थांनी त्यांचा व्यवसाय जागतिक स्तरावर नेण्यास सुरुवात केल्याने, कामाची मानके आणि वेतन समतोलीत होऊ लागते आणि वेगवेगळ्या देशातील कार्यसंस्कृतीतील फरकांमुळे उद्योगसंस्थांना त्यांच्या भरती धोरणांमध्ये बदल करावे लागतात. विकसित देश कामगारांची मागणी आणि पुरवठ्यातील तफावत भरून काढण्यासाठी विकसनशील देशांकडून अधिक कामगार आयात करण्याचा विचार करतात. कामगारांच्या कमतरतेमुळे त्यांची आर्थिक वाढ, आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता आणि उत्पादकता कामगिरी हे घटक धोक्यात येऊ शकतात.

सकारात्मक परिणाम:

परवाना देणे, उद्योगांवरील सरकारी निर्बंध हटवणे आणि परदेशी गुंतवणुकीचे उदारीकरण यामुळे सरकारकडून मंजूरी मिळविण्यासाठी औपचारिक प्रक्रियेमध्ये खर्च होणारा वेळ आणि पैसा कमी झाला आहे. यामुळे उद्योगसंस्थांचे लक्ष वास्तव उत्पादनाच्या व्यवसायाकडे वळले आहे आणि त्यामुळे प्रकल्पांचा खर्च अल्प झाला आहे. निर्यात वाढली

असून व्यापाराचे प्रमाणही वाढले आहे. परकीय गुंतवणुकीच्या क्षेत्रातील धोरणांमुळे परकीय भांडवलाचा प्रवाह विशेषत: इलेक्ट्रिकल उपकरणे, सेवा आणि दूरसंचार यांसारख्या क्षेत्रांमध्ये आकर्षित झाला आहे. भारतीय उद्योग आणि वित्तीय संस्थांनी परदेशात गुंतवणूक केली आहे. अनेक भारतीय उद्योगसंस्थांनी परदेशी उद्योगसंस्थांसोबत संयुक्त उपक्रम योजले आहेत, त्यामुळे ते आंतरराष्ट्रीय स्तरावर अजूनच स्पर्धात्मक होत आहेत. SEZ (विशेष आर्थिक क्षेत्र) स्थापन करून भारत आपली निर्यात अभिमुखता वाढवत आहे आणि विलीनीकरण तसेच अधिग्रहणाद्वारे ते त्यांचे आंतरराष्ट्रीय अस्तित्व तयार करत आहेत. वाढती स्पर्धा आणि परदेशी ज्ञानाचा ओघ यामुळे औद्योगिक कामगार अधिक कार्यक्षम आणि कुशल झाले आहेत. औद्योगिक उत्पादकता वाढली आहे, जी वाढीव औद्योगिक वेतनामध्ये दिसून येते तसेच औद्योगिक अडचणींच्या घटना कमी झाल्या आहेत. या स्पर्धात्मक परिस्थितीमध्ये, भारतीय उद्योगांनी उत्पादित केलेल्या वस्तु, स्पर्धात्मक किंमतीत विकल्या गेल्यामुळे भारतीय ग्राहकांना उच्च दर्जाचे समाधान मिळते. प्राधान्य कर्ज, सूक्ष्म वित्त आणि इतर प्रकारचे कर्ज उपलब्ध करून दिल्याने लघु उद्योग क्षेत्र अधिक मजबूत होत आहे. काही लघुउद्योगांचे रूपांतर मध्यम स्तरावरील उद्योगांमध्ये झाले आहे.

नकारात्मक परिणाम:

अर्थव्यवस्था ही परदेशी गुंतवणुकीसाठी खुली असताना काही क्षेत्रे आधीच चांगली प्रस्थापित होती, ज्यामुळे बहुराष्ट्रीय उद्योगसंस्थांवर प्रभुत्व मिळवून त्यांच्या संसाधनांचे शोषण होत होते आणि त्यांचे स्वतःचे संशोधन आणि विकासाचे प्रयत्न रोखले जाऊन अडथळे निर्माण होत होते. तथापि, परदेशी तंत्रज्ञानाचा वापर भारतीय परिस्थितीशी जुळवून घेणारा असेलच याची शाश्वती नाही. कधीकधी बहुराष्ट्रीय उद्योगसंस्था त्यांच्या उपउद्योगसंस्थांमध्ये जाणीवपूर्वक कमी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरतात. बाजारपेठेत अत्याधिक स्पर्धा असल्यामुळे देशांतर्गत उद्योगसंस्थांवर उत्पादकता वाढवण्यासाठी, उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी खूप दबाव येतो. वाढते शहरी औद्योगिक वेतन हे ग्रामीण वेतनापेक्षा खूप जास्त आहे आणि यामुळेच उत्पन्नात असमानता येते. अनियंत्रित उपभोक्तावादाची वाढ आणि ग्राहक म्हणून भरपूर प्रमाणात समस्या उद्भवतात. व्यवसाय केवळ खाजगी नफ्याने प्रेरित असतात. जागतिकीकरणामुळे वस्तुतः उत्पादनातील भांडवलाची तीव्रता वाढली आहे आणि याचा रोजगारावर विपरीत परिणाम झाला आहे, कारण कामगारांची जागा यंत्रासमग्रीने घेतली आहे. जागतिकीकरणामुळे देशांतर्गत उद्योगसंस्थांना किंमतीतील चढउतार, नफ्याची अस्थिरता आणि मागणी आणि पुरवठ्याची अनिश्चितता यांसारख्या जोखमींना तोंड द्यावे लागत आहे.

७.४ त्रिपक्षीयता (TRIPARTISM)

१९५७ ते १९६५ या कालावधीत सरकारला कामगार धोरण एकत्रित करण्याची गरज भासली. कामगार क्षेत्रात त्रिपक्षीयता हा घटक दृढ झाला. दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनांमध्ये कामगार कायदे लागू करण्यात आले आणि तीन संहिता स्वीकारण्यात आल्या. या तीन संहिता व्यवस्थापन आणि संघटनांच्या शिस्तीच्या संहितेशी संबंधित होत्या.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत (१९५६-६१) कामगारांच्या व्यवस्थापनासह वाढलेल्या संबंधावर भर देण्यात आला. त्यात म्हटले आहे की, प्रतिनिधी संघटनांना वेतन, भत्ते आणि सेवांच्या इतर अटी व शर्तींच्या संदर्भात व्यवस्थापन, विवादांचे प्रकरण हाताळण्याचा एकमात्र अधिकार असावा. संघटनेचे पदाधिकारी म्हणून बाहेरील लोकांच्या संख्येवर निर्बंध घालण्यात आले आणि पदाधिकाऱ्यांना बाहेरील लोकांपासून प्रभावित होण्यापासून संरक्षण देण्याचे आवाहन केले गेले. स्वैच्छिक लवादाच्या कामगारांच्या मागणीला प्रतिसाद म्हणून, दुसऱ्या योजनेत विवादांचे निराकरण करण्यासाठी ऐच्छिक लवादाचा वापर करण्याची मागणी करण्यात आली. केंद्र सरकारने औद्योगिक विवाद कायद्यात सुधारणा करून कलम १०अ समाविष्ट केले, ज्यात विवादांचा ऐच्छिक लवादाकडे संदर्भ देण्याची तरतूद केली आणि लवाद कायदा, १९४० ला ऐच्छिक लवादापासून वेगळे केले. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १०,००० किंवा त्याहून अधिक कामगार असलेल्या उद्योग आणि व्यावसायिक आस्थापनांना समाविष्ट करण्यासाठी विस्तारित करण्यात आला. कर्मचारी राज्य विमा कायद्याअंतर्गत कामगारांच्या कुटुंबांना फायदा देण्याचा प्रस्ताव होता. उद्योगाच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी संयुक्त व्यवस्थापन परिषद सुरू करण्यात आली.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत (१९६१-६६) कामगार धोरणाच्या बाबतीत पुढील घटकांचा समावेश होता:

१. १९५८ मध्ये तीन संहितांचे पुनरुज्जीवन आणि सुधारणा करणे.

२. निर्णय बदलण्यासाठी ऐच्छिक लवादावर भर देणे.

३. व्यवस्थापनातील कामगारांच्या सहभागावर भर देणे.

४. कामगारांच्या शैक्षणिक कार्यक्रमांची सक्रिय अंमलबजावणी करणे.

५. पूर्वीच्या १५० वरून २० काम करणाऱ्या आस्थापनांपर्यंत कायद्याचे व्याप्तिक्षेत्र वाढवून ३ दशलक्ष कामगारांच्या कुटुंबांपर्यंत ESI योजनेची व्याप्ती वाढवणे.

या धोरणात्मक पैलूंनी कामगारांना समानतेची आणि योग्य दर्जाची भावना दिली आणि “संपत्तीच्या निर्मितीमध्ये समान भागीदार” या घोषणेला वास्तववादी आवाज दिला. १९६६ मध्ये राष्ट्रीय सुरक्षा परिषद स्थापन करण्यात आली. अधिलाभांशाचा भरणा नियमित करण्यासाठी अधिलाभांश आयोगाची स्थापना करण्यात आली.

१९१९ मध्ये भारत हा आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा सदस्य झाल्यामुळे श्रम क्षेत्रात त्रिपक्षवाद रूढ झाला. भारतातील औद्योगिक संबंध धोरणे व तत्त्वे राष्ट्रीय आणि औद्योगिक स्तरावर त्रिपक्षवाद सल्लामसलतींद्वारे विकसित करण्यात आला आहे. श्रम धोरणातील निर्णय, संबंधित दोन मुख्य पक्षांच्या सहभागाशिवाय लादता येत नाहीत, हे लक्षात आल्याने त्रिपक्षवाद संस्थात्मक झाला. सरकार, कामगार संघटना आणि औद्योगिक संघटना हे त्रिपक्षीयय स्तंभ आहेत. सध्या राष्ट्रीय स्तरावर ४४ त्रिपक्षीयय समित्या आहेत. अनेक त्रिपक्षीयय बैठका वेळोवेळी घेतल्या जातात, या बैठकांमध्ये राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळातील अडचणी, राष्ट्रीय नूतनीकरण निधी आणि कामगार तर्कसंगतीकरण या

घटकांवर निर्णय घेतले जातात. राज्यस्तरावर ठराविक मुद्द्यांवर वेळोवेळी त्रिपक्षीयय बैठका घेतल्या जातात.

७.५ औद्योगिक संबंधांवर परिणाम करणारे कामगार कायदे: औद्योगिक विवादांचे निराकरण करण्यासाठी वैधानिक आणि गैर-वैधानिक उपाय (LABOUR LEGISLATION AFFECTING INDUSTRIAL RELATIONS: STATUTORY AND NON-STATUTORY MEASURES TO SETTLE INDUSTRIAL DISPUTES)

भारतातील औद्योगिक संबंधांवर प्रभाव टाकणारे महत्त्वाचे कायदे म्हणजे व्यापार संघटना कायदा १९२६, औद्योगिक विवाद कायदा १९४७, औद्योगिक रोजगार (स्थायी आदेश) कायदा १९४६, कारखाना कायदा १९४८ आणि कामगार भरपाई कायदा १९२३ होय.

१. व्यापार संघटना कायदा १९२६:

व्यापार संघटना कायदा १९२६ मध्ये मंजूर झाला आणि ०१ जून, १९२७ पासून लागू झाला. या कायद्यात १९७० मध्ये सुधारणा करण्यात आली जेणेकरून तो जम्मू आणि काश्मीरमध्ये लागू होईल आणि ही दुरुस्ती ०१ सप्टेंबर १९७१ पासून लागू झाली. भारतातील सर्व व्यापारी संघटना या कायद्याच्या अंतर्गत येतात. हा कायदा मुळात संघटना पुढाऱ्यांच्या संरक्षणासाठी लागू करण्यात आला होता. कामगार संघटनांच्या नोंदणीसाठी कायद्यात १९२९ मध्ये सुधारणा करण्यात आली. या कायद्याच्या अंतर्गत निर्माण, नोंदणीच्या अटी, नोंदणीचे फायदे आणि युनियन नेत्यांना दिवाणी आणि फौजदारी दोन्ही कायद्यांपासून मिळणाऱ्या प्रतिकारशक्ती निर्मिती, प्रक्रिया, नोंदणी या घटकांची तरतूद आहे. भारतीय व्यापार संघटना कायद्याच्या व्याख्येनुसार, "कोणतेही संयोजन, मग ते तात्पुरते किंवा कायमस्वरूपी, प्रामुख्याने कामगार आणि कामगार यांच्यातील संबंधांचे नियमन करण्याच्या उद्देशाने, कामगार आणि नियोक्ते यांच्यातील किंवा नियोक्ता आणि नियोक्ता यांच्यातील किंवा कामगारांवर प्रतिबंधात्मक अटी लादण्यासाठी तयार केले गेले ज्यामध्ये दोन किंवा अधिक कामगार संघटनांच्या कोणत्याही महासंघाचा समावेश होतो." ही वेतन प्राप्त करणाऱ्यांची एक संघटना आहे, जी व्यापार संघटना या कायद्याने बांधील असलेल्या त्यांच्या व्यावसायिक हितसंबंधांच्या रक्षणासाठी सामूहिक कृती करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आली आहे. संघटन म्हणजे कोणत्याही प्रकारच्या लोकांचे एकत्रीकरण आणि हे एकत्रित झालेले लोक कामगारच असतील असे नाही तर ते वेगवेगळ्या क्षेत्रातील लोक असू शकतात. कामगार संघटना ही कामगारांची एक संघटना आहे. व्यापार वादविवादाची व्याख्या ही पुढीलप्रमाणे करता येईल- "नियोक्ता आणि कामगार यांच्यातील किंवा कामगार आणि कामगारांमधील किंवा नियोक्ता आणि नियोक्ता यांच्यातील कोणताही विवाद जो रोजगार किंवा बेरोजगारी किंवा रोजगाराच्या अटी किंवा कामगारांच्या अटींशी संबंधित असतो" [कलम २(g)].

२. औद्योगिक विवाद अधिनियम १९४७:

औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ हा भारतातील औद्योगिक निर्णयाशी संबंधित मूलभूत कायदा आहे. हा कायदा औद्योगिक विवाद आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी मूलभूत कायदेशीर चौकट प्रदान करतो. औद्योगिक कर्मचाऱ्यांची परिस्थिती सुधारणे आणि औद्योगिक क्षेत्रात शांतता आणि सुसंवाद निर्माण करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. या कायद्याच्या अंतर्गत व्यवस्थापन आणि कामगार यांच्यातील संघर्ष कमी करणे आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करणे हे देखील समाविष्ट केले आहे. काही उद्योगांमधील विवादांचे निराकरण आणि विवाद रोखण्यासाठी सर्वसमावेशक तरतुदी करण्यात आल्या आहेत. ०१ एप्रिल, १९४७ रोजी अंमलात आलेल्या कायद्याने काही प्रकरणांमध्ये औद्योगिक विवादांचे अनिवार्य सामंजस्य आणि निर्णयाचे तत्त्व लागू केले आणि पुढील दोन नवीन संस्थांची स्थापना केली: कामगार समिती आणि अधिकरण.

हा कायदा औद्योगिक विवादांना "नियोक्ता आणि नियोक्ता यांच्यातील किंवा नियोक्ता आणि कामगारांमधील किंवा कामगार आणि कामगार यांच्यातील कोणताही विवाद किंवा फरक जो रोजगार किंवा गैर-रोजगार किंवा रोजगाराच्या अटींशी किंवा कोणत्याही व्यक्तीच्या श्रमाच्या अटींशी संबंधित आहे [कलम २ (के)]. जेव्हा कोणताही नियोक्ता एखाद्या वैयक्तिक कामगाराच्या सेवा काढून टाकतो, बडतर्फ करतो, छाटतो किंवा अन्यथा समाप्त करतो, त्या कामगार आणि त्याच्या नियोक्त्यामधील कोणताही विवाद किंवा फरक त्याच्याशी संबंधित किंवा उद्भवलेला असतो, अशा प्रकारची मुक्तता, बडतर्फी, छाटणी किंवा समाप्ती हा औद्योगिक विवाद असल्याचे मानले जाते. असे असूनही, इतर कोणताही कामगार किंवा कामगारांची कोणतीही संघटना या वादाचा पक्ष नसतो. [कलम २ (के), २ अ].

या कायद्यानुसार उद्योग म्हणजे "नियोक्ता आणि कामगार यांच्यातील सहकार्याने चालणारा कोणताही पद्धतशीर क्रियाकलाप होय (मग अशा कामगारांना अशा नियोक्त्याने थेट किंवा कंत्राटदारासह कोणत्याही एजन्सीद्वारे किंवा द्वारे नियुक्त केले असले तरीही). मानवी गरजा किंवा इच्छा (गरजा किंवा इच्छा ज्या केवळ आध्यात्मिक किंवा धार्मिक स्वरूपाच्या नसतात) पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून वस्तू किंवा सेवांचा- (अ) अशा प्रकारचा क्रियाकलाप करण्यासाठी कोणतेही भांडवल गुंतवले गेले आहे किंवा नाही (ब) असा उपक्रम कोणताही फायदा किंवा नफा मिळवण्याच्या उद्देशाने चालवला जातो आणि त्यात (i) गोदी कामगार कायदा, १९४८ अंतर्गत स्थापन केलेल्या गोदी कामगार मंडळाच्या कोणताही क्रियाकलाप आणि (ii) विक्री किंवा व्यवसायाच्या जाहिरातीशी संबंधित कोणताही क्रियाकलाप किंवा दोन्ही आस्थापनेद्वारे चालवले जातात परंतु एकात्मिक कृषी परिक्रमा, इस्पितळ किंवा दवाखाने, शैक्षणिक, वैज्ञानिक, संशोधन किंवा प्रशिक्षण संस्था वगळता इतर कोणत्याही कृषी परिक्रमांचा समावेश नाही, खादी किंवा ग्रामोद्योग, कोणतीही घरगुती सेवा इत्यादी देखील यात समावेश नाही.

या कायद्यांतर्गत विवादांचे प्रतिबंध किंवा निराकरण करण्यासाठी प्राधिकरणांमध्ये (१) तक्रार निवारण प्राधिकरण, (२) कार्य समिती (३) सामंजस्य अधिकारी, (४) सलोखा मंडळ, (५) चौकशी न्यायालय, (६) कामगार न्यायालय, (७) न्यायाधिकरण, (८) राष्ट्रीय न्यायाधिकरण आणि (९) लवाद. कामगार न्यायालय, न्यायाधिकरण आणि राष्ट्रीय

